14-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
NTK/ KTG/ D/ 10:30

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**<u>सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याबाबत</u>**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहासमोर इतका महत्वाचा विषय असतानाही सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांकरिता स्थगित करण्यात यावे अशी मी विनंती करते.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने जी चर्चा होणार आहे त्यातील मुद्यांची नोंद मी घेणार आहे.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण मुद्यांची नोंद घेणार असलात तरी सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी 10.45 पर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 10.31 ते 10.45 पर्यंत स्थगित झाली. )

-----

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिकासभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम

**मु.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हुसेन दलवाई, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, उल्हास पवार, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री विनोद तावडे, जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री रामनाथ मोते, कपिल पाटील, परशुराम उपरकर, संजय दत्त, भगवान साळुंखे, किरण पावसकर, चरणसिंग सप्रा, चंद्रकांत पाटील, रामदास कदम, राजन तेली, धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु...)

**तालिका सभापती** : शैक्षणिक धोरणात वारंवार होणा-या बदलामुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम या विषयावरील काल अपूर्ण राहिलेली चर्चा पुढे सुरु करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांच्या भाषणानंतर संबंधित मंत्री उत्तर देतील. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे हे आता भाषण करतील.

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणामध्ये वारंवार होणारे बदल, तसेच तीन-चार वर्षापासून 11वीच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये उडालेला गोंधळ, बदलता अभ्यासक्रम यामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यामध्ये गैरसमज आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले होते. सर्वजण चिंतीत होते. प्रत्येक पालकाला वाटते की आपल्या मुलाला चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे, चांगल्या कॉलेजातून तो शिकला पाहिजे. परंतु शासनाच्या बदलत्या धोरणामुळे अनेक विद्यार्थी आणि त्यांचे पालक चिंतीत होते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. वसंतराव खोटरे...

परंतु काल "उत्कृष्ट पाच" (बेस्ट ऑफ फाईव्ह)च्या संदर्भात सुप्रीम कोटाने राज्य शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे ही चिंता काहीशी दूर झाल्यासारखी वाटते. बेस्ट ऑफ फाईच्या संदर्भात उच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या विरोधात निर्णय दिल्यामुळे राज्य शासनाने सुप्रीम कोर्टात अपील केले आणि सुप्रीम कोर्टाने राज्य शासनाच्या बाजूने निर्णय दिल्यामुळे मी प्रथमत: राज्य शासनाचे अभिनंदन करतो. या निर्णयामुळे राज्य शासनाने हुरळून जाऊ नये. कारण हा निर्णय फक्त एक वर्षापुरता मर्यादित आहे. त्यामुळे याबाबतीत राज्य शासनाला आणखीन जास्त काळजी घ्यावी लागेल. कारण सीबीएसई आणि आयसीएसई ही दोन परीक्षा मंडळे गप्प बसणार नाहीत. म्हणून याबाबतीत शासनाने जागरुक राहून आपल्या बोर्डाच्या विद्यार्थ्यांना न्याय कसा मिळेल हे पाहिले पाहिजे. आपले परीक्षा मंडळ कार्यक्षम आहे. आपल्या परीक्षा मंडळाचा सिलॅबस आणि विषय हे 1972 पासून लागू झालेले आहेत. राज्य मंत्रिमंडळामध्ये श्री. शरद पवार असताना 1972मध्ये 10+2+3 हा पॅटर्न सुरु झाला. त्यावेळी विज्ञान, गणित आणि समाजशास्त्र हे तीन महत्वाचे विषय होते. समाजशास्त्रामध्ये इतिहास, भूगोल आणि नागरिक शास्त्र हे तीन विषय होते. परंतु या महत्वाच्या विषयांना फाटा देऊन गणित आणि विज्ञान सारख्या विषयांना ऐच्छिक विषयामध्ये टाकून विद्यार्थ्यांवर अन्याय केलेला आहे. आज सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाचे विद्यार्थी जास्त मार्क्स मिळवून पास होतात. ते विज्ञान आणि गणित या विषयात बोर्डाच्या परीक्षेमध्ये नापास झालेले असले तरी त्यांना महाविद्यालयातून विज्ञान शाखेत प्रवेश मिळतो. हे सर्वार्थाने चुकीचे आहे. आता सुप्रीम कोर्टाने जरी आपल्या बाजूने निकाल दिलेला असला तरी पुढे आपल्या विद्यार्थ्याला न्याय मिळणार नाही. जोपर्यन्त सर्व परीक्षा मंडळामध्ये एकच सिलॅबस, एकच अभ्यासक्रम, एकच परीक्षा पध्दती राहाणार नाही तोपर्यन्त विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही. म्हणून महाराष्ट्रामध्ये एकच अभ्यासक्रम, सिलॅबस आणि परीक्षा पध्दती अस्तित्वात असली पाहिजे. सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाना शासनाने ठणकावून सांगितले पाहिजे की त्यांनी त्यांच्या शाळा, कॉलेजेस चालवावीत, परंतु राज्य शासनाने जो अभ्यासक्रम स्वीकारलेला आहे तोच अभ्यासक्रम त्यांनीही स्वीकारला पाहिजे. असे केले तरच प्रत्येक विद्यार्थ्याला न्याय मिळेल.

ऑप्शनमध्ये अनेक विषय आहेत. त्या विषयांचे मार्क्स कोणी कसे देतात हे आपण सांगू शकत नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 10:50

श्री.वसंतराव खोटरे.....

म्हणून एसएससी बोर्डाचे जे विषय आहेत ते अतिशय महत्वाचे आहेत. परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी 25 गुणांची सवलत देण्यात आली आहे. क्रीडा विषयासाठी गुण देण्यात येणार आहेत. यामुळे कोणाचेही भले झालेले नाही. ही सवलत म्हणजे चॉकलेट आहे. लहान मुलांना आपण सांगत असतो की, चॉकलेट खाऊ नका. त्यामुळे दात खराब होतात. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने ही चॉकलेटची सवलत बंद करावी अशी माझी विनंती आहे. त्या मुलांची विद्वत्ता कोणावर अवलंबून नाही. त्यांची बौध्दिक क्षमता, त्यांचे कष्ट, त्यांची मेहनत यावर त्यांचे भवितव्य अवलंबून असते. 100 गुणांपैकी 99, 98 गुण मिळविले जातात, त्यामुळे हुरळून जाऊ नये. नोकरी मिळविण्यासाठी याचा उपयोग होत नाही. नोकरी मिळविण्यासाठी बौध्दिक क्षमता कामी येत असते. एका बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये एका विद्यार्थीनीने मुलाखत दिली. त्या मुलीला विचारण्यात आले की, तू यापूर्वी कुठे मुलाखत दिली होती का? तिने 'होय' म्हणून सांगितले. तुझी निवड झाली होती का? तिने 'नाही' असे उत्तर दिले. त्या मुलीची निवड करण्यात आली. कारण तिने आत्मविश्वासाने उत्तरे दिली होती. बौध्दिक क्षमता, आत्मविश्वास, जिद्द या मुद्यावर तिचे सिलेक्शन झाले. हा आत्मविश्वास आजच्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावयाचा असेल तर आज राज्यात एकाच प्रकारची शिक्षण पध्दती असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठा बदल करणे आवश्यक आहे. आज शिक्षण विभागातील अनेक पदे रिक्त आहेत. परीक्षा मंडळाचे अध्यक्ष पद रिक्त आहे. परीक्षा मंडळाला सचिव नाहीत. शिक्षणाधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे सर्वत्र गोंधळ निर्माण झाला आहे. बेस्ट फाईव्ह, सीबीएसई, आयसीएसई याबाबत आमच्या शिक्षणाधिकाऱ्यांना काहीही माहिती नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. शिक्षणाधिकाऱ्यांना मी विचारले की, बेस्ट फाईव्हमध्ये म्हणजे काय आहे? किती गुण गृहित धरले जाणार आहेत? कोणते पाच विषय निवडायचे आहेत? याची त्यांना माहिती नाही. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचे ते समाधान करु शकत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांनाही प्रशिक्षण देण्याची गरज आहे. शिक्षण विभागामध्ये कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. कार्यक्षम अधिकारी नसतील तर शिक्षण क्षेत्राचा खेळखंडोबा होणार आहे. शिक्षण विभागातील अनेक अधिकारी निलंबित झालेले आहेत. अनेक अधिकाऱ्यांवर अँटी करप्शन विभागाने खटले दाखल केले आहेत. असे असतानाही या अधिकाऱ्यांचा पदोन्नतीच्या यादीमध्ये

..2..

श्री.वसंतराव खोटरे.....

समावेश झालेला आहे. विदर्भामध्ये अनेक कार्यक्षम अधिकारी आहेत. त्यांची शासनाने अन्यत्र बदली केली आहे. यापूर्वी शिक्षण विभागाला चिपळूणकर यांच्यासारखे उत्कृष्ट अधिकारी लाभले होते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने शिक्षण विभागाला चांगली दिशा दिली होती. त्यामुळे यापुढे शिक्षण विभागात चांगल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, शिक्षणाचा अधिकार हा एक महत्वाचा विषय आहे. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्याबाबत केंद्र शासनाने कायदा मंजूर केला असून महाराष्ट्र शासनाने त्या कायद्यास अनुसरुन दिनांक 10 मे, 2010 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयाची माहिती अद्याप शिक्षणाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे ........

आम्ही याबाबत बैठकही घेतली होती पण अजून आम्हाला ती माहिती मिळाली नाही. या अधिकारामध्ये समता, सामाजिक न्याय, लोकशाहीमध्ये न्यायाची समानता ही सर्व मूल्ये मुलांना प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधता येऊ शकतात. परीक्षांच्या बाबतीत समानता नाही परंतु परीक्षा नसतील तर ही मूल्ये साधली जाऊ शकत नाही. म्हणून या कायद्यान्वये आपण आठवीपर्यंत परीक्षा न घेण्याचा जो निर्णय घेतला त्यामुळे पालकांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. कारण परीक्षाच घेतल्या नाहीत तर मुलांचे मूल्यमापन कसे होणार आहे ? मुलगा अभ्यासात कोठे आहे हे समजणारच नाही. तसेच कोणत्याही विद्यार्थ्याला नापास करता येणार नाही, ज्या संस्थेने अथवा मुख्याध्यापकांनी नापास केले त्या संस्था अथवा मुख्याध्यापकांवर दंडाचीही तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला तर त्या विषयाची त्याची तयारी करण्यासाठी देखील शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. पण हे प्रयत्न कोणी करावयाचे यासंबंधीच्या स्पष्ट सूचना कोणत्याही शिक्षकांना अथवा मुख्याध्यापकांना नाहीत. म्हणून माझी अशी सूचना आहे याबाबतचे स्पष्ट आदेश विद्यार्थी तसेच पालकांपर्यंत गेले पाहिजेत. शासनाचे धोरण चांगले असते त्याबद्दल माझे काहीच म्हणणे नाही. कारण शासनाने अकरावी व बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण मिळावे म्हणून निर्णय घेतलेला आहे तसेच अकरावी व बारावीचे वर्ग उघडण्याची सुध्दा परवानगी दिली. त्याचबरोबर मी असेही सांगू इच्छितो की, राज्यात अशी बरीच हायस्कूल्स आहेत, ज्युनियर कॉलेजेस आहेत की जेथे अजूनही पाच-पाच वर्षांपासून प्राध्यापकांची नेमणूक झालेली नाही. अशा शाळांचे निकाल मात्र 100 टक्के लागतात हा काय प्रकार आहे हा संशोधनाचा विषय आहे. मी अशा शाळांची नावे सुध्दा सांगू शकतो. पण महत्वाचा मुद्दा असा आहे की, शिक्षणाधिकाऱ्यांनी अशा शाळांची तपासणी करावी असे त्यांना कधीच वाटले नाही काय. शिक्षक नसताना देखील 100 टक्के निकाल लागत असेल तर आमच्या खेड्यातील मुले शेवटी अडाणीचे अडाणीच राहतील, त्यांना पुढे काहीच येणार नाही. काही ठिकाणी मात्र अजूनही प्रयोगशाळा नाहीत, शाळेला इमारती नाहीत, वाचनालये नाहीत तरी असा 100 टक्के निकाल लागतो ही वस्तुस्थिती आहे. ही बाब महाराष्ट्र बोर्डाच्या अध्यक्षांनी सुध्दा निदर्शनास आणून दिली परंतु संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई झालेली नाही, हे गंभीर आहे.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे .......

विना अनुदानित व कायम विना अनुदानित तत्वावर शासनाने अकरावी व बारावीचे वर्ग उघडण्याची परवानगी दिली परंतु अशा शाळांमधील कॉपींग सेंटरचा विचार करता सर्वच विद्यार्थी पास होतात आणि अशा शाळांमध्ये येण्यासाठी 100 किलोमीटर अंतरावरुन देखील मुले येण्यास उत्सुक असतात. त्याचा परिणाम असा झाला की, दुसरीकडच्या अनुदानित शाळांमधील तुकड्या बंद पडून त्यातील शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. या अनुषंगाने सुध्दा शासनाने योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. तसेच मी ज्या ज्या सूचना केल्या त्या अनुषंगाने योग्य असा विचार करावा व तसे निर्णय घ्यावेत अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त ) :सभापती महोदय, सभागृहामध्ये काल पासून बेस्ट ऑफ फाईव्ह आणि शिक्षणाचा दर्जा यासंदर्भात चर्चा सुरु आहे. या चर्चेच्या संदर्भात मी माझे काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी हा विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. पूर्वी असे म्हटले जायचे की, महाराष्ट्रातील शिक्षणाला पूर्वी एक वेगळे वलय होते, शिक्षण एका वेगळया रस्त्याने चालले आहे व महाराष्ट्रात जी मंडळी शिक्षण घेत आहेत ती कधीही मागे पडणार नाही असे बोलले जात असे. महाराष्ट्रात ज्या मुलांनी शिक्षण घेतलेले आहे ती मुले कधीही मागे पडणार नाही असे चित्र त्यावेळी होते. परंतु काही ठराविक माणसांना आपली मुले परदेशात शिकावी म्हणून वेड लागले होते. महाराष्ट्रात शिक्षण घेतले म्हणजे आपल्या मुलांना काही फ्यूचर राहणार नाही असे या लोकांना वाटू लागल्यापासून आपल्या शिक्षणाला उतरती कळा सुरु झाली. महाराष्ट्रात शिल्लक राहिले नाही असे या मंडळींना वाटू लागले. तेव्हा पासून आपण स्पर्धेमध्ये उतरलो. मराठीचा मुद्दा बाजूला घेऊन एसएससी बोर्ड म्हणजे काहीच नाही, एसएससी बोर्डाला काही किंमत आहे काय,महाराष्ट्रातील एसएससच्या बोर्डामधून किंवा बारावीच्या बोर्डामधून आपली मुले शिकली तर त्यांचा काही प्रकाश पडणार नाही असे काही ठराविक लोकांना वाटू लागले. खरे म्हणजे या प्रकाराला सन 1994-95 पासून सुरुवात झाली. तेव्हापासून सीबीएससी आणि आयसीएसईच्या शाळांनी आपल्या एसएससी बोर्डावर आणि बारावीच्या बोर्डावर आक्रमण केले व ते तुम्हा आम्हाला आणि बोर्डाला नामोहरम करण्यासाठी निघाले आहेत.

महाराष्ट्रात जशी श्रीमंत लोकांची मुले शिक्षण घेतात तशी सर्वसामान्य लोकांची मुले सुध्दा शिक्षण घेत असतात. 1994 ते आतापर्यंतच्या आपल्या शैक्षणिक वाटचालीकडे पाहिले तर आपण खरोखर आपल्या मुलांना काही शिकवतो आहे काय हा महत्वाचा मुद्दा आपल्याला मान्य करावा लागेल. मी विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम केलेले आहे त्यामुळे शिक्षणाची आजची काय परिस्थिती आहे हे मला चांगल्या प्रकारे माहिती आहे. ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील मुलांच्या शिक्षणाची आज काय अवस्था आहे ? ग्रामीण भाग सोडून द्या परंतु मुंबई आणि मुबई उपनगरामध्ये शिक्षण घेणा-या मुलांची काय अवस्था आहे ? उपनगर आणि गिरणगाव मध्ये शासनाच्या शाळेमध्ये शिक्षण घेणा-या मुलांची अतिशय दैनावस्था आहे. आज या मुलांच्या शिक्षणासाठी अनुदानावर शासन करोडो रुपये खर्च करीत असते

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ......

परंतु या विद्यार्थ्यांच्या पदरात आपण काही दिले का असा विचार केला तर उत्तर "नाही" असे सापडते. या विद्यार्थ्यांना आपण कोणते शिक्षण दिले याचा विचार केला तर त्याला चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले नाही असेच आपल्याला महणावे लागेल. त्यामुळे या सर्वांना महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण जबाबदार आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या धोरणामध्ये या वैचारिक पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याची वेळ बेस्ट ऑफ फाईव्ह आणि इतर गोष्टीमुळे आलेली आहे. आपले बारावीचे स्वत:चे बोर्ड आहे. 1995-96 पासून आपण स्पर्धा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. हे करीत असतांना सीबीएसईची परीक्षा देण्याची काही गरज होती काय हा देखील वादातीत मुद्दा महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणामध्ये निर्माण झाला आहे. स्पर्धा परीक्षा दिल्या खेरीज बारावी सायन्स घेऊन जो विद्यार्थी परीक्षेला बसतो त्या विद्यार्थ्याने फिजीक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी विषय घेतले व तो विद्यार्थी स्पर्धा परीक्षामध्ये कमी मार्कांने पास झाला आणि त्या विद्यार्थ्याला बारावीच्या परीक्षेत कितीही मार्क्स मिळाले तरी त्यास ॲडमिशन मिळत नाही त्यामुळे याबाबत आपण काही विचार करणार आहोत की, नाही ? माझ्या मनात आयसीएसई आणि सीबीएसई च्या विद्यार्थ्यांबद्दल आकस नाही. मी सातवी पर्यंत मुंबई महापालिकेत शिक्षण घेतले व हायस्कूलपर्यंतचे शिक्षण परळ येथे घेतले व पुढील महाविद्यालयीन शिक्षण ठाण्याच्या बेडेकर कॉलेजमध्ये घेतले. त्यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षक चांगल्या प्रकारे शिक्षण देत असत. परंतु आजचे शिक्षणाचे चित्र काय आहे हे तुम्हा आम्हाला चांगले माहीत आहे. त्यामुळे आज आपल्याला जे काही शिक्षण मिळत आहे ते आपण बदलणार आहोत की, नाही हा खरा प्रश्न आहे. काल बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात आपल्या बाजूने निकाल लागल्याबरोबर फटाके वाजून, पेढे वाटून आनंद साजरा केला.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

परंतु, हा आनंद क्षणिक आहे, असे मला वाटते. ऑक्टोबर नंतर या विषयाची सुनावणी होणार आहे. कोर्टामध्ये वाद-विवाद करण्यासाठी मोठी वकील मंडळी बसली आहेत. कोर्टाचा निकाल काय लागेल हे सांगता येत नाही. सरकार बदलले की, धोरण बदलते असे म्हणतात. त्यामुळे लोकांचे काय हाल होतील याकडे लक्ष न देता आपली प्रगती आणि प्रसिद्धी कशी मिळेल यावर आम्ही सगळे खूश असतो. मात्र, हा खूशपणा सामान्य लोकांपर्यंत पोचत नाही. कोर्टाचा अंतरिम आदेश ऑक्टोबर पर्यंत आहे. पण त्याच्यापुढे काय ? आय.ए.एस.अधिकारी हा शिक्षण विभागाचा सचिव म्हणून आपण नेमतो. तो सर्वज्ञ असतो असे म्हटले जाते. या सर्वज्ञांनी काय केले ? त्याच्या अधिकाऱ्यांनी काय केले आहे ? याबद्दलची माहिती जाणून घेण्यासाठी हे अधिवेशन संपण्याच्या आधी सर्वांना एकत्रितपणे चर्चेसाठी बोलवावे. ज्यांनी ज्यांनी या चर्चेत भाग घेतला त्यांना बोलवावे असा आग्रह मी धरणार नाही. आपल्याला जर बोलवता आले तर आम्हा सर्वांना चर्चेला बोलवावे. यातून आपण काही तरी चांगले निष्पन्न करा. नाही तर बैल गेला आणि झोपा केला असे होईल. आपण बेस्ट ऑफ फाईव्हचे सूत्र स्वीकारले. त्यादृष्टीने शिक्षण दिले जाते काय ? याचा देखील विचार व्हायला पाहिजे. तो झाला नाही तर ते शून्य आहे.

सभापती महोदय, दुसरे मला असे सुचवावयाचे आहे की, विक्रोळी येथे उदयाचल नावाची शाळा गोदरेज चालविते. आपले जे शिक्षणतज्ज्ञ आहेत, त्यांना तेथे प्रशिक्षणासाठी पाठवावे. ही खाजगी शिक्षण संस्थेची शाळा आहे. पण कोणाकडूनही डोनेशन घेत नाही. फक्त विद्यार्थ्यांची बुद्धी तपासून शाळेमध्ये प्रवेश दिला जातो व त्याच्या बुद्धी प्रमाणे गुण दिले जातात. या शाळेतील विद्यार्थी कुठल्याही विषयात मागे पडत नाही. शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे अनेकजण आहेत. आपले जे शिक्षणतज्ज्ञ आहेत त्यांना गोदरेजच्या सदर शाळेत प्रशिक्षणासाठी पाठवावे अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे. येथे गेल्यावर शिक्षण म्हणजे काय असते हे समजून येते. गणित, विज्ञान, भाषा विषय काय असतो ते कळते. मराठीच्या नावाने गळा काढणाऱ्यांना आणि इंग्रजीला विरोध करणाऱ्यांना हे समजणार नाही. आम्ही आमच्या मुलांना काय देणार आहोत ? याचा विचार केला पाहिजे. आज प्रगत महाराष्ट्राचे शैक्षणिक धोरण काय असणार आहे ?

श्रीमती अलका देसाई....

सभापती महोदय, मी युनिव्हर्सिटीसंबंधी देखील बोलणार आहे. युनिव्हर्सिटी आज वशिल्याचे रणांगण झाले आहे. वशिल्याचे तट्टू म्हणून आम्ही तेथे काम करणार आहोत. त्या रस्त्यानेच युनिव्हर्सिटी चालली आहे. शेवटी, गोदरेज सारख्या शैक्षणिक संस्थेच्या शाळेमध्ये आपण जावे. विद्यार्थ्यांना कशा प्रकारे शिकवावे, शैक्षणिक धोरण कसे ठरवावे हे तेथे जाऊन पहावे अशी मला विनंती करावयाची आहे. एवढे बोलून मी माझे विचार संपविते. धन्यवाद.

.................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी शिक्षणासंबंधी जो प्रस्ताव आणला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

काल पासून या विषयावर चर्चा सुरू आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी या विषयासंदर्भात चर्चेच्या अनुषंगाने जे मुद्दे मांडले आहेत त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. अगदी कमी वेळामध्ये मी मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, या प्रस्तावाचा आपण विचार केल्यास दोन मुद्दे चर्चेसाठी आहेत. पहिला मुद्दा म्हणजे अकरावीच्या प्रवेशाबाबत शासन गेल्या तीन-चार वर्षापासून निर्णय घेत आहे त्यास केंद्रीय बोर्डाशी संलग्न असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून आणि काही इतर व्यक्तींकडून सातत्याने आव्हान दिले जात आहे. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, गेल्या तीन-चार वर्षात शासनाने जे निर्णय घेतले त्यास अपयश आलेले आहे किंवा शासनाने घेतलेला निर्णय न्यायालयात टिकू शकला नाही. माझा बेसिक मुद्दा असा आहे की, शासनाने 90:10 चा कोटा ठरविला, पर्सेन्टाईलचे तत्व लागू केले तर यावर्षी "बेस्ट ऑफ फाईव्ह"चा निर्णय घेतला. यापूर्वी देखील या विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश कसे द्यावेत ही समस्या होती. एस.एस.सी.बोर्डाचे विद्यार्थी आणि केंद्रीय बोर्डाचे विद्यार्थी यांना अकरावीत प्रवेश देताना कोणते तत्व अनुसरावे या संदर्भात दिनांक 26 जून 1997 चा शासन निर्णय आहे. हा आदेश सुध्दा मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार काढण्यात आलेला आहे. हा शासन निर्णय अधिकाऱ्यांनी विचारपूर्वक निर्णय घेऊन काढला होता, तर तो शासन निर्णय का बदलावा लागला ? हा शासन निर्णय रद्द करण्यात आला का, असल्यास तो का रद्द करण्यात आला, रद्द करण्याची कारणे काय आहेत ? या शासन निर्णयातील तत्व लागू करुन अकरावीच्य प्रवेशाची समस्या आपणास सोडविता आली नसती काय ? या सर्व प्रश्नांचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, अकरावीच्या प्रवेशाबाबत काल सर्वोच्च न्यायालयात निर्णय लागला. दिनांक 16 जुलै, 2010 पासून अकरावीच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरु होईल. आपणास हे सर्व का करावे लागले तर केंद्रीय बोर्डाशी संलग्न शाळा आणि एस.एस.सी.बोर्डाशी संलग्न शाळांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा घोळ निर्माण होऊ लागला म्हणून हा निर्णय घ्यावा लागला. आपण कोणासाठी निर्णय घेत आहोत ? केंद्रीय बोर्डाशी संलग्न असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेतली आणि एस.एस.सी.बोर्डाशी संलग्न असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेतली तर एस.एस.सी.बोर्डाशी संलग्न असलेल्या शाळातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. 90 टक्के विद्यार्थ्यांचा अत्यंत महत्वाचा विषय आणि 10 टक्के विद्यार्थ्यांसाठी किंवा त्यापेक्षा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

कमी असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी संपूर्ण राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना वेठीस धरीत आहोत याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. अकरावीच्या प्रवेशाची समस्या किती विद्यार्थ्यांच्या संदर्भात आहे म्हणून राज्याला "बेस्ट ऑफ फाईव्ह" किंवा पूर्वी घेतलेला पर्सेन्टाईचा निर्णय घ्यावा लागला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे बेस्ट ऑफ फाईव्हशी काही देणे घेणे नाही. आपण हे सूत्र फक्त प्रवेशासाठी ठरविले आहे. या निर्णयाचा आमच्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही कामासाठी त्याचा उपयोग होणार नाही. शासनाने हे सर्व अकरावीच्या प्रवेशासाठी केले असेल तर आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा ज्यांचा या प्रवेश प्रक्रियेशी काही संबंध नाही, ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेत ते येणार नाहीत. तेव्हा ऑन लाईन प्रवेशाच्या बाहेर असलेल्या विद्यार्थ्यांना आपण एक महिना उशिरा प्रवेश देणार आहोत. त्यांचे एक महिन्याचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे याचा शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, धोरणात्मक निर्णय घेताना शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. अन्य विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतात हे आम्ही समजू शकतो, परंतु शिक्षण क्षेत्रातील विशेषत: मंत्रालय स्तरावर काम करणारे अधिकारी यांची एका विभागात तीन वर्ष काम केल्यानंतर बदली करण्यात येते. शिक्षण विभागातील अधिकारी अतिशय सक्षमपणे काम करीत असतो त्याची बदली तीन वर्षानंतर गृह विभागात किंवा अन्य विभागात करण्यात येते आणि गृह विभागातील अधिकाऱ्याची शिक्षण विभागात बदली करण्यात येते.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

श्री.गुठे नावाचे जे चांगले अधिकारी आहेत ते सध्या शिक्षण विभागात काम करीत असले तरी काही वर्षानंतर ते दुस-या विभागात काम करतील. त्याचबरोबर डॉ.सुवर्णकार या शिक्षण विभागात न राहता काही दिवसानंतर दुस-या विभागात जातील.अशा प्रकारे मंत्रालय स्तरावर शालेय शिक्षण विभागात काम करणारे जे चांगले व सक्षम अधिकारी आहेत त्यांना चांगला अनुभव आहे , त्यांच्याकडे काही विचार आहेत, हे सर्व अधिकारी शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत . शालेय शिक्षणाचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने त्यांचा उपयोंग करुन घ्यावा व त्या दृष्टीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अकरावीच्या प्रवेशासाठी बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय शासनाने घेतला असून सुप्रीम कोर्टानेसुध्दा त्याला मान्यता दिली आहे. परंतु भविष्यात मात्र असा प्रकार पुन्हा उद्‌भवणार नाही आणि विद्यार्थ्याला वेठीला धरले जाणार नाही या दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, केन्द्रीय बोर्डाच्या शाळा आणि आपल्या शाळा यातील अभ्यासक्रम वेगळा आहे. त्यांची पाठयपुस्तके, गुणदान पध्दती,मूल्यांकन पध्दती वेगळी आहे इतकेच नव्हे तर त्यांच्या विषयाचे ग्रुप्स देखील वेगवेगळे आहेत.कमाल गुणांची संख्या वेगवेगळी आहे.प्रॅक्टीकल, लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा यामध्ये देखील तफावत आहे. ही तफावत दूर करण्याच्या संदर्भात शासन प्रयत्न करीत आहे परंतु राज्यातील एस.एस.सी. बोर्ड एकाच वेळेस लाखो विद्यार्थ्याच्या परीक्षा घेत आहे. एकाच वेळेस एकच प्रश्नपत्रिका असतांना एस.एस.सी. बोर्ड सुरळीतपणे परीक्षा घेत असते काही वेळेस एखाद्या ठिकाणी तुरळक प्रकार घडला असेल परंतु त्याचा अपवाद सोडला तर संपूर्ण देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर इतके चांगल्या प्रकारे काम करणारे बोर्ड असू शकणार नाही. एखाद्या ठिकाणी या बोर्डापेक्षा सुध्दा जास्त चांगल्या प्रकारे काम करणारे बोर्ड असूही शकेल परंतु त्या बोर्डाच्या विद्यार्थ्याची संख्या आणि आपल्या बोर्डाच्या विद्यार्थ्याची संख्या विचारात घेतली तर आपले एस.एस.सी.बोर्ड अत्यंत प्रभावीपणे काम करीत आहे असेच म्हणावे लागेल.म्हणूनच राज्य सरकारने शैक्षणिक धोरण ठरवत असतांना सी.बी.एस.ई.च्या विद्यार्थ्याचा विचार न करता या राज्यातील 90 टक्के विद्यार्थ्याचा विचार करुनच धोरण ठरविले पाहिजे आणि भविष्यात अशा प्रकारचा विषय पुन्हा निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यश्कता आहे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री.रामनाथ मोते..

सभापती महोदय,यानंतर मला दुसरा महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे.केन्द्र सरकारने िविद्यार्थ्याना सक्तीचे आणि हक्काचे शिक्षण देण्यासबंधी 2009 साली कायदा मंजूर केला आहे.त्या कायद्याची अंमलबजावणी राज्यात 1 एप्रिल 2010 पासून सुरु झालेली आहे. केन्द्र सरकारच्या कायद्यातील कलम 38 (4) नुसार या कायद्याच्या अनुषंगाने नियमावली तयार करण्यासाठी , त्यावर विचारविनिमय करण्यासाठी या कायद्यातील मसुद्यावर या सभागृहात चर्चा व्हावयास पाहिजे. गेल्या दोन दिवसापासून आपण अकरावीच्या प्रवेशासबंधीं चांगली चर्चा करीत आहोत या ठिकाणी.अनेक सन्माननीय सदस्य आपले विचार मांडत आहेत, अनुभव सांगत आहेत आणि काही सूचना करीत आहेत.या शिक्षण क्षेत्रात काम करणारी जी मंडळी आहे, ज्यांना शिक्षण क्षेत्रातील अनुभव आहे आणि वर्षानुवर्षे समर्पित भावनेने जी मंडळी काम करीत आहे तसेच काही अनुभव अधिकारी आहेत त्यांच्याकडील विचारांची देवाणघेवाण झाली तर त्यातून शासनाला चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन मिळू शकेल. या मार्गदर्शनापैकी कोणती बाब स्वीकारावयाची आणि कोणती स्वीकारावयाची नाही, कोणाचा मुद्दा घ्यावयाचा आाणि कोणाच्या मुद्याचा आदर करावयाचा हे ठरविण्याचा अधिकार शासनाला आहे. परंतु या विषयावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते.काल आणि आज जी चर्चा झाली आहे त्या चर्चेतून शासनासमोर काही मुद्दे आलेले आहेत.त्यातून शासनाला निर्णय घेणे वा धोरण ठरविणे सोपे जाणार आहे.अशा प्रकारे सक्तीचे आणि हक्काचे शिक्षण या संबंधी केन्द्र सरकारने जो कायदा केलेला आहे त्याबाबतीत देखील सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे तो विषय सभागृहासमोर चर्चेला येण्याची आवश्यकता आहे इतकेच नव्हे तर त्याबाबतीत एक तज्ज्ञ समितीसुध्दा नेमण्यात आली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. त्या बाबतीत नियम तयार करीत असतांना त्यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे.तसेच आपल्या राज्याने काही नवीन धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे.परंतु अशा प्रकारे काहीही झालेले नाही. उलट दुस-या बाजूला शासन दररोज एक एक जी.आर.काढत आहे.त्यामुळे दररोज प्रशासकीय आदेश बाहेर पडत आहेत परंतु केन्द्र सरकारच्या कायद्यान्वये जे काही इन्फ्रास्ट्रक्चर अपेक्षित आहे, विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक लागणार आहेत त्या बाबतीत शासनाने कोणते धोरण ठरविलेले आहे ? फक्त परिपत्रके काढून तो विषय संपणार नाही. उलट त्यासाठी आर्थिक निधीची तरतूद करावी लागेल. परंतु केन्द्र सरकारच्या सक्तीचे आणि हक्काचे शिक्षण कायद्याच्या संदर्भात पुरवणी मागण्यामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. (नंतर श्री.सरफरे

`

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

म्हणून त्यासाठी हे राज्य शासन तरतूद करणार आहे की नाही? या शाळांना शिक्षक नेमावे लागत आहेत त्यांचा खर्च कसा भागविणार आहेत. कालच शासनाने एक परिपत्रक काढले त्यानुसार जर प्रशिक्षित शिक्षक आपल्याला मिळाले नाहीतर अप्रशिक्षित शिक्षक नेमण्यात यावेत असे सांगण्यात आले आहे. सभापती महोदय, आज राज्यामध्ये हजारो शिक्षक 1500 रुपये वेतनावर काम करीत आहेत. हे सर्व मागासवर्गीय शिक्षक असून ते 1500 रुपये वेतन घेऊन काम करीत आहेत. एका बाजूला आपण अप्रशिक्षित शिक्षक नेमण्यास सांगत आहात त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला 1500 रुपये वेतनावर वर्षानुवर्षे हे मागासवर्गीय शिक्षक काम करीत असतांना या सर्व शिक्षकांना एकाचवेळी प्रशिक्षण देण्याची शासनाकडे सोय नाही किंवा शासनाची क्षमता नाही. त्यामुळे आज आपल्याकडे असलेल्या या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आपण करणार नसाल तर हजारो अप्रशिक्षित शिक्षक नेमण्याचे आदेश आपण काढले आहेत त्यांच्या प्रशिक्षणाची सोय आपण करणार आहात काय? ती करु शकला नाहीतर 5 वर्षाची सेवा केल्यानंतर त्यांना सेवेतून काढून टाकण्याचा आपण जो निर्णय घेतला आहे त्याबाबत सुध्दा विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने आपण आज इयत्ता आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा रद्द केलेल्या नाहीत, आपण त्यांना उत्तीर्ण करणार आहात. फक्त त्यांच्या गुणपत्रिकेवर अनुत्तरीत म्हणून ठप्पा मारला जाणार नाही. म्हणून त्यांनी वर्षभर केलेल्या कामकाजाचे मूल्यमापन, त्यांचे आकस्मिक मूल्यमापन आपण करणार आहात. त्यामध्ये या परिक्षांच्या माध्यमातून बदल करणे अपेक्षित आहे त्यासाठी शासनाला बदल करावा लागेल. आणि म्हणून शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने शिक्षण पध्दतीमध्ये कोणते बदल करणे आवश्यक आहेत, शिक्षकांकडून आपल्याला काय अपेक्षित आहे या संदर्भात एस.सी.आर.टी. ने धोरण ठरविणे आवश्यक आहे. परवाच्या दिवशी मी या संदर्भात शासनाच्या अधिकाऱ्यांशी बोललो असता त्यांनी शासनाकडे यासंबंधीचा प्रस्ताव पाठविला असून शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होईल असे सांगण्यात आले. तेव्हा याबाबत तातडीने निर्णय झाला पाहिजे.

सभापती महोदय, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने मला शासनाला विनंती करावयाची आहे की, गेल्या 7-8 वर्षापासून राज्यामध्ये मराठी माध्यमांच्या शाळा सुरु आहेत. त्यांनी आपल्याकडे परवानगीसाठी अर्ज केलेला असतांनाही आपण अजून त्यांना परवानगी दिलेली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

त्या शाळा बंद करुन त्यांना लाखो रुपयांचा दंड ठोठावण्याची नोटिस पाठविण्यात आली आहे त्या संदर्भात सुध्दा विचार करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात एकतर्फी निर्णय न घेता आपण त्यांना संधी द्यावी, त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. अशाप्रकारच्या शाळा राज्यामध्ये गेल्या 7-8 वर्षापासून सुरु आहेत त्यांनी इन्फ्रास्ट्रक्चर तयार केले आहे,त्यामध्ये गुंतवणूक केली आहे. राज्याच्या ग्रामीण भागामध्ये या शाळा आवश्यक असतील तर त्यांना मान्यता देण्याबाबत विचार करावा अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याकरिता दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : या महत्वाच्या विषयावर अनेक माननीय सदस्यांनी बोलण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रत्येक माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेवून 5 ते 6 मिनिटांमध्ये आपले विचार संपविले तर सर्व माननीय सदस्यांना आपल्याला संधी देता येईल. आता माननीय सदस्य श्री. किरण पावसकर बोलतील.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये महाराष्ट्रातील काही ज्वलंत प्रश्नांवर नेहमी चर्चा होत असते. त्यामध्ये प्रामुख्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असेल, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचा प्रश्न असेल, वीजेच्या भारनियमनाचा प्रश्न असेल या सर्व प्रश्नांपेक्षा सध्या बेस्ट ऑफ फाईव्हचा प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा झालेला आहे. त्याबद्दल मी या सरकारला खरोखरच धन्यवाद देण्यासाठी उभा आहे.

या देशामध्ये महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, याठिकाणी रहाण्यासाठी 11 महिन्यांच्या मुदतीचे भाडयाने घर घेता येते. त्यासाठी एक करारनामा करावा लागतो. त्याचप्रमाणे कंत्राटी पध्दतीवर 11 महिन्यांसाठी कंपनीमध्ये कामगार ठेवले जातात. शासनाच्या अखत्यारीतील विमा योजनेमध्ये देखील 11 महिन्यांसाठी कामगार ठेवले जातात असे मंत्रिमहोदयांनी या सभागृहामध्ये सांगितले आहे. परंतु ज्या भावी पिढीला हा देश व हे राज्य चालवावयाचे आहे त्यांच्यासाठी सुध्दा 11 महिन्यांचे शैक्षणिक धोरण बनविणारे हे एकमेव राज्य आहे. याचे कारण प्रत्येक वर्षी 11 महिन्यानंतर आपले शैक्षणिक धोरण बदलले आहे. सन 2007-08, 2008-09 व 2009-10 या तिन्ही वर्षामध्ये अकरा-अकरा महिन्यांच्या कालावधीकरिता आपण शैक्षणिक धोरण बदलले आहे.सुरुवातीला आपली पर्सेंटाईल पध्दत अस्तित्वात आली, त्यानंतर 90:10 चा फॉर्म्युला आला आणि त्यानंतर आता बेस्ट ऑफ फाईव्हचा फॉर्म्युला आला.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर..

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, खरोखरच सरकारने असे ठरविले आहे काय की, हे शैक्षणिक धोरण 11 महिन्यासाठी असावे. कारण कालपासून बरेच सन्माननीय सदस्य या केसमध्ये आपला विजय झालेला आहे अशा पध्दतीने आपली पाठ थोपटून घेताना दिसत आहेत. खरोखरच ही काय केस आहे? हा तात्पुरता रीलिफ मिळालेला आहे. हा मार्चमध्ये झालेल्या परीक्षेसाठी रीलिफ मिळालेला आहे. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या परीक्षेच्या संदर्भात काय धोरण राबविण्यात येणार आहे? पुढच्या वर्षी पुन्हा जेव्हा इयत्ता दहावीच्या परीक्षेला विद्यार्थी बसतील तेव्हा काय धोरण राबविले जाणार आहे? कारण हे नुकसान फक्त 15 ते 16 लाख विद्यार्थ्यांचेच नाही तर एखादा मुलगा इयत्ता दहावी किंवा बारावीला गेला की, त्या विद्यार्थ्याच्या मागे सर्व यंत्रणा कामाला लागते. घरातील आई-वडील,नातेवाईक आणि त्यांच्याबरोबर शिक्षक ही सर्व यंत्रणा एक वर्ष त्याच्याबरोबर त्याला जास्तीत जास्त मार्क्स मिळण्यासाठी काम करीत असते. मला वाटते यावेळी सरकारने या सगळया सिस्टिम पायदळी तुडविल्या आहेत. हा 60 ते 70 लाख लोकांचा प्रश्न असून गेल्या दोन महिन्यापासून या शासनाने त्यांना वेठीस धरलेले आहे. शैक्षणिक धोरण तयार करावयाचे असते तर यासंबंधीचा जी.आर. 25 फेब्रुवारीला निघालेला आहे.परीक्षा मार्चमध्ये झालेल्या आहेत. त्यानंतर शासनाचे धोरण फेब्रुवारीमध्ये ठरले त्यानंतर शासन कोर्टात गेले. आणि आता पुन्हा शासन आम्ही जिंकलेले आहोत अशी आपली पाठ थोपटून घेत आहे. खरे म्हणजे सीबीएसई सारखे बोर्ड पहिल्यापासूनच उत्कृष्ठ फाईव्हमध्ये चालू आहेत. आयसीएसई बोर्डाचे लोक कोर्टात गेले. आपल्याला समानीकरण आणावयाचे असेल तर त्यासाठी काही तरी धोरण ठरवावे लागेल आणि त्या धोरणाची अंमलबजावणी करावी लागेल. पण कोणत्याही पध्दतीचे धोरण नसलेले, विद्यार्थ्यांना वेठीस धरणारे शिक्षण खाते कदाचित सरकारला आपले अस्तित्व दाखविण्यासाठी हे करीत असेल तर यापूर्वी या राज्याच्या राज्यकर्त्यांवर साखर सम्राटांचा पगडा होता आणि आता या महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांवर शिक्षण सम्राटांचा पगडा आहे असेच म्हणावे लागेल. कदाचित त्यांना सांभाळण्यासाठी किंवा आपले अस्तित्व दाखविण्यासाठी सरकारने दरवर्षी ही एक नवीन पध्दत अमलात आणलेली आहे काय?

सभापती महोदय, ग्रामीण भागातून, कोकणातून काही लोक मुंबईत आपल्या मुलाला प्रवेश घेण्यासाठी येथे येऊन बसलेले आहेत. मुलगा एसएससी पास झाल्यानंतर सगळे सांगतात की, तू

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

आत्ताच पेढा देऊ नकोय. तुला पेढा द्यावयाचा असेल तर तो प्रवेश मिळाल्यानंतर दे. कारण प्रवेश मिळेल याची खात्री नाही. सभापती महोदय, आजही काही लोक आपल्या मुलाला प्रवेश मिळवून देण्यासाठी या मुंबईत थांबलेले आहेत. आज ना उद्या आपल्या मुलाला मुंबईत प्रवेश मिळवून देऊ आणि शेतीची कामे करण्यासाठी पुन्हा कोकणात जाऊ या आशेने ते येथे थांबलेले आहेत. या परिस्थितीला कोण जबाबदार असेल तर ते सरकार आहे. याचे कारण फेब्रुवारीनंतर धोरण ठरणार आहे आणि हे धोरण कोण ठरविणार आहे? या राज्यामध्ये सरकार नावाची यंत्रणा असताना हे धोरण कोर्ट ठरविणार आहे. कोर्टामध्ये या संबंधीचा निर्णय होणार आहे. हा निर्णय शिक्षण तज्ञ घेऊ शकत नाहीत. शिक्षण मंत्री निर्णय घेऊ शकत नाहीत. याचे कारण सरकारने शिक्षण खाते चालविण्यासाठी स्वतंत्र मंत्रीही दिलेला नाही. आता असलेल्या शिक्षण मंत्र्यांकडे आणखी दुसरी खाती आहेत. भाषण करताना पुष्कळ दिग्गज नेते सांगतात की,येणारी पिढी देशाचे भवितव्य ठरविणार आहे पण या पिढीला कसे सडविता येईल अशी कार्यपध्दती व्यवस्थितपणे चालू आहे, असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, बेस्ट फाईव्हच्या बाबतीत बोलत असताना खरोखरच समानीकरण आणावयाचे असेल तर सभापती महोदय, या मुंबईमध्ये 17 बोर्ड काम करीत आहेत याची शासनाला कल्पना आहे काय?17 बोर्डातून विद्यार्थी एकत्र येत आहेत त्यांना तुम्ही समानीकरणावर आणणार आहात काय? कोणत्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावयाचा आहे? एसएससी बोर्डातील विद्यार्थ्यांना न्याय द्यावयाचा आहे की इतर बोर्डातील विद्यार्थ्यांना आमच्या बरोबर या असे सांगावयाचे आहे? काल या सभागृहामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी चांगले विचार मांडलेले आहेत. महाराष्ट्राचे शैक्षणिक धोरण ठरवताना ग्रामीण आणि शहरी या दोन्ही विद्यार्थ्यांचा आपल्याला विचार करावा लागेल. काल सभागृहामध्ये शेक्सपिअर आणि तात्यासाहेब शिरवाडकर यांच्याबद्दल चर्चा झाली. पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आजही शेक्सपिअर काय आहे याची कल्पना नाही आणि शहरातील विद्यार्थ्यांना तात्यासाहेब शिरवाडकर काय आहेत याची कल्पना नाही. या दोन्ही ठिकाणच्या विद्यार्थ्यांना तसेच ज्यांच्याबरोबर कोर्टात फाईट करीत आहोत त्या इंग्लिश मिडियमच्या विद्यार्थ्यांना शेक्सपिअर आणि तात्यासाहेब शिरवाडकर माहीत नाहीत.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

एकीकडे आपण त्यांना शाळेमध्ये येरे येरे पावसा ही कविता शिकवतो आणि दुसरीकडे आपण त्यांना रेन रेन गो अवे ही कविता सांगतो. या संभ्रमात सापडलेले सरकारचे हे शैक्षणिक धोरण आहे. याला आपल्याला कोठे तरी मार्ग दाखवावयाचा आहे. हा मार्ग जर दाखवावयाचा असेल तर येरे येरे पावसा शिकावयाचे आहे की, रेन रेन गो अवे शिकावयाचे आहे यामध्ये ऐतिहासिक आणि भौगोलिक महाराष्ट्राच्या विचारावर अशा कविता ठरल्या जातील. ज्या देशामध्ये जास्त पाऊस पडतो त्यांच्यासाठी ती कविता आहे. परंतु याचा विचार कोणत्याही परिस्थितीत शिक्षण तज्ज्ञांकडून होत नाही.

आयसीएसई, सीबीएसई आणि आयबीचा आपण विचार करतो पण त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना जे इन्फ्रॉस्ट्रक्चर दिले आहे ते आपण आपल्या विद्यार्थांना दिले आहे काय ? प्रवेश मिळण्यासाठी ते एका पात्रतेला यावयास पाहिजे हे आपल्याला कळते. त्या शिक्षकांचे पगार किती आहेत ? कदाचित तिकडचे पगार आणि फी जर वाचून दाखवली तर ती आपल्यासाठी शरमेची गोष्ट होईल. शैक्षणिक धोरण राबविणाऱ्या या सरकारसाठी त्यांच्याच एका वृत्तपत्रामध्ये छापून आलेले 2010-2010 या वर्षाचे शैक्षणिक शुल्क मी वाचून दाखवतो. ॲकॉल मॉडियाल वर्ल्ड स्कूल यांची पूर्व प्राथमिकसाठी 12 लाख 20 हजार रुपये एका वर्षाची फी आहे. बिलबॉंग हाय इंटरनॅशनल स्कूल यांची माध्यमिकची फी 1 लाख 43 हजार रुपये आहे. ओबेरॉय इंटरनॅशनलमध्ये प्रीस्कूल (प्लेग्रुप) ची वार्षिक फी 2 लाख 46 हजार रुपये असून माध्यमिकसाठी 5 लाख 78 हजार रुपये फी आहे. ही एका विद्यार्थ्याची वार्षिक फी आहे. शैक्षणिक धोरण राबविणाऱ्या आणि कोर्टामध्ये आम्ही जिंकलो म्हणून सांगणाऱ्या सरकारला मी सांगितलेली आकडेवारी चांगली लक्षात ठेवण्यासारखी आहे. डॉ. पिल्ले ग्लोबल अकॅडमीमध्ये पूर्वप्राथमिकची फी 3 लाख 94 हजार रुपये आहे आणि माध्यमिकची फी 4 लाख 77 हजार रुपये आहे. शरद पवार इंटरनॅशनल स्कूलची फी पूर्व प्राथमिक ते इयत्ता तिसरीसाठी 4 लाख 70 हजार रुपये आहे आणि नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 6 लाख 45 हजार रुपये फी आहे. धीरुबाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलमध्ये पूर्वप्राथमिक ते सातवीपर्यंतची फी 1 लाख 3 हजार रुपये आहे तर इयत्ता सातवी ते दहावीसाठी 1 लाख 9 हजार रुपये फी आहे. याबाबत आपण समानता करणार आहात काय ? यांना आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. किरण पावसकर .....

कोठे एका पातळीवर आणणार आहात ? त्यांनी दिलेले इन्फ्रॉस्ट्रक्चर आपण पुरविणार आहात काय ? आय.बी.च्या शाळेमध्ये शिक्षकाचा पगार 50 हजार ते 70 हजार रुपये असतो. पुण्यासारख्या ठिकाणी ज्याला आपण विद्येचे माहेरघर म्हणतो त्या ठिकाणी मर्सिडिज बेन्ज इंटरनॅशनल स्कूलच्या शिक्षकाला महिन्याला 70 हजार रुपये पगार आहे आणि आपला इकडचा शिक्षक दीड ते दोन हजार रुपयांवर काम करतो आणि पार्टटाईम शेतकरी म्हणून सुध्दा काम करतो. त्यांचे आपण समानीकरण करणार आहात काय ? समानीकरण करण्यासाठी आपल्याकडे काय मुद्दे आहेत ? जसे पावसाळा आल्यानंतर छत्री उघडतो त्याप्रमाणे परीक्षा आल्यानंतर आपण आपली धोरणे बदलत आहात. अशी धोरणे न बदलता त्यासाठी पूर्ण वर्षभराचा स्वत:चा गृहपाठ आधी करा आणि तो गृहपाठ करावयाचा असेल तर आपल्याकडे किती बोर्ड आहेत, त्यांना काय फॅसिलिटीज आहेत, त्यांना अकरावीमध्ये एकत्र आल्यानंतर काय परसेंटेज देऊ शकतो, त्यांना आपण कोठे प्रवेश देऊ शकतो याचा विचार करा. त्यांना या प्रवेशामध्ये आणावयाचे असेल तर शैक्षणिक धोरण राबविताना सरकारने ग्रामीण भागातून येणारे विद्यार्थी आणि शहरातील विद्यार्थी या दोघांचाही विचार केला तरच आपण त्यांचे समानीकरण करु शकतो. आता जी आपण आपली पाठ थोपटून घेत आहात की आम्ही कोर्टामध्ये गेलो आणि जिंकलो ते फक्त थोडे दिवस चालण्यासारखे आहे. हा सहा महिन्यांचा अवधी दिलेला आहे. सहा महिन्यानंतर पुन्हा आपल्याला अशाच पध्दतीने कोर्टात जावे लागेल आणि आपल्याकडे तशा प्रकारची यंत्रणा नाही. शैक्षणिक धोरण जोपर्यंत होत नाही, जोपर्यंत ठोस कार्यक्रम घेतला जात नाही तोपर्यंत हे असेच चालणार. या सभागृहामध्ये चर्चा करण्यापेक्षा या सभागृहाला नियम बदलण्याचे अधिकार आहेत, नियम बनविण्याचे अधिकार आहेत. या सभागृहामध्ये सुध्दा काही सन्माननीय सदस्य असे आहेत की, जे शिक्षण क्षेत्रावर चांगले बोलू शकतील. विधान परिषदेमध्ये शिक्षकांच्या बाबतीत आवाज उठविणारे जास्तीत जास्त सदस्य आहेत. विद्यार्थ्यांच्या बाबतीत सुध्दा ते आवाज उठवू शकतील. विद्यार्थ्यांना अकरा महिन्याच्या लीज कॉन्ट्रक्टवर घेऊन चालविणारे धोरण ताबडतोब बंद करा आणि पाच वर्ष तरी चालण्यासारखे चांगले धोरण बनवा एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, राज्याच्या शैक्षणिक धोरणावर चालू असलेल्या चर्चेमध्ये थोडक्यात काही विषयांना स्पर्श करावा म्हणून मी आपण दिलेल्या संधीचा उपयोग करुन घेत आहे. या सभागृहामध्ये बसलेल्या आपण सगळ्या सदस्यांनी त्या वेळच्या शालेय शिक्षणाची आठवण केली तर आपल्याला माहीत आहे की, साधारणपणे जूनमध्ये शाळा-कॉलेजेस सुरु होतात, एप्रिलमध्ये परीक्षा आटोपतात आणि मे महिन्यापर्यंत निकाल लागतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

निकाल म्हणजे परीक्षेचा निकाल, शासनाच्या धोरणाचा निकाल नाही. अशी ही निश्चितपणे अंगवळणी पडलेली पध्दत होती. परंतु गेल्या काही वर्षामध्ये जसा पावसाळा केव्हाही येतो त्याप्रमाणे प्रवेश केव्हा मिळणार, शाळा केव्हा सुरु होणार, कॉलेज केव्हा सुरु होणार यासंबंधी अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न सातत्याने सुरु झाल्याचा दिसतो. शिक्षण क्षेत्रात परीक्षेचे, शैक्षणिक वर्षाचे हे जे चक्र बसविले आहे त्याच्यावर शासन पक्के राहणार आहे काय किंवा त्या अनुषंगाने आपली संपूर्ण वेळापत्रक शासनाच्या धोरणात अंतर्भूत करणार काय, हा खरा प्रश्न आहे. वास्तविक पाहता दहावीच्या टप्प्यावर सर्वसाधारणपणे जी माहिती उपलब्ध आहे त्याप्रमाणे 15-16 लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याला वळण देण्याच्या टप्प्यावर आलेली ही पिढी असते. त्यांना पुढील कोणता शिक्षणक्रम घ्यावयाचा, कोणत्या शाखेमध्ये आपल्याला पुढे जायचे आणि कोठे प्रवेश घ्यावयाचा या टप्प्यावर आलेल्या मुलांचे भाव विश्व, त्यांना घडविणा-या पालकांचे, त्यांच्या घरांचे, एकूणच आपल्या पाल्याच्या भवितव्याविषयी त्याचे शैक्षणिक पर्व संपल्यानंतर सुरु होणा-या त्याच्या स्वत:च्या रोजगारासाठी किंवा उन्नतीसाठी जे क्षेत्र त्याला निवडायचे आहे त्याच्यासाठी अकरावीच्या प्रवेशाची ही महत्वाच्या टप्प्याची गोष्ट आहे. त्याचा शासनाने गंभीरपणे विचार केला पाहिजे. वास्तविक आपल्या देशातील सर्वात मोठा ॲसेटस् कोणता असेल तर आपल्याकडे उपलब्ध असलेले जे मनुष्यबळ हे आहे. हे मनुष्यबळ जेवढया परीने आणि अंगाने सक्षम करु शकू त्याच्यावर या देशाचे आर्थिक क्षेत्रात जगामध्ये असलेले स्थान यापुढील काळामध्ये नक्की होणार आहे.

असे म्हणतात की, प्रत्येक पालकाची इच्छा असते की, आपला मुलगा डॉक्टर व इंजिनिअर व्हावा. परंतु सगळेच विद्यार्थी डॉक्टर व इंजिनिअर झाले तर बाकीच्या विषयातून पुढे जाणारे विद्यार्थी कोठून आणावयाचे ? त्यामुळे या पालकांना शैक्षणिक मार्गदशर्नाची आवश्यकता आहे. पालकांसाठी शिक्षण असा वेगळाच विचार करुन त्या संदर्भातील काही माहितीपत्रकाच्या माध्यमातून यासंबंधीची माहिती देता आली तर शासन त्याचा उपयोग करु शकेल काय ? आधुनिक विज्ञानाचा, आयटीचा आणि माहितीचा किती उपयोग शिक्षणासाठी करुन घेतला जातो हाही एक महत्वाचा प्रश्न यानिमित्ताने पुढे येत आहे. एफ.एम. सारखा रेडिओ आहे. आपण नेहमी म्हणतो





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

की, अनेक गावांमध्ये एक शिक्षकी शाळा असतात, एक शिक्षक सर्व विषय शिकवित असतात, त्यांना सर्व विषयांचे ज्ञान नसते. विद्यार्थ्यांना ते ज्ञान देऊ शकले नाहीत तर ते विद्यार्थी काय शिकणार ? त्यामुळे एफ.एम.रेडिओच्या माध्यमातून या सर्व एक शिक्षकी शाळांमध्ये वेगवेगळया विषयातील तज्ज्ञांची भाषणे, त्यासंबंधीचे मार्गदर्शन देता येईल काय याचा विचार केला पाहिजे. व्हर्च्युअल क्लास रुम म्हणजे टी.व्ही.च्या माध्यमातून त्या शाळांमध्ये व्यवस्था करुन अशा विषयांचे ज्ञान देण्याची व्यवस्था करता येईल काय ? सभापती महोदय, मी एक छोटीशी गोष्ट सांगतो, मी सभागृहाचा फार वेळ घेणार नाही. मी गेले काही दिवस अमेरिकेतील शिक्षण पध्दतीचा आणि 12 ते 15 वर्षे वयोगटातील मुलांचा अभ्यासक्रम वाचत होतो. या वयोगटातील मुलांचे कोणते विषय इंटरेस्टचे असतात याची विभागणी करुन जर कोणी कायदा या विषयात पुढे जाऊ इच्छित असेल तर 13 ते 14 वर्षाच्या वयोगटातील मुलांचा कायद्याकडे कल असेल तर अशा मुलांना भावी आयुष्यात कायदे विषयक ज्ञान मिळावे, त्यांना कोर्टाचे कामकाज कसे चालते हे बघण्यासाठी शाळेत जे ऐच्छिक विषय असतात त्यानुसार कोर्टात हजर राहून तेही ज्ञान आपल्या पदरी पाडून घेण्याची व्यवस्था असते. येथे आठवीपर्यंत नापास होण्याची सोय नाही अशी चर्चा झाली आहे. पास नापास असे वर्गीकरण केल्यानंतर नापास विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली तर त्यांना पुढे रेटून नेणे अवघड होते. परंतु मूल्यांकन होणे त्यादृष्टीने आवश्यक आहे. खरे म्हणजे दहावी पर्यंतचे सर्व विषय सर्व विद्यार्थ्यांनी शिकलेच पाहिजेत. अशाप्रकारचे हे विषय आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:40

(श्री. हेमंत टकले....

ते विषय शिकल्यानंतर त्याला त्याच्या आवडीच्या विषयांची जी निवड करावयाची आहे हा नंतर विषय असणार आहे. उगाचच आपण इतर बोर्ड काय करीत आहेत, इतर ठिकाणी काय चालले आहे याकडे फारसे लक्ष न देता आपले स्वत:चे जे आहे, आपल्या मराठी माणसाचे जे आहे, मराठी भाषेचे जे आहे हे सगळे माध्यम वापरुन या सगळया गोष्टींमध्ये सक्षमता आणण्यासाठी काय करता येईल याचा शासनाने गांभीर्याने विचार करायला पाहिजे. हे शैक्षणिक वर्षाचे चक्र नियमितपणे, निसर्गाने घालून दिल्यासारखे व्यवस्थित पुढच्या काळात जाईल अशा पध्दतीचे धोरण शासनाने अवलंबवावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शैक्षणिक धोरणात वारंवार होणा-या बदलांच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा सदनामध्ये उपस्थित करण्यात आलेली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात न्यायालयामध्ये पालक जाणे हे स्वाभाविक आहे. याबाबतीत राज्य शासनाने जी भूमिका बजावयास पाहिजे होती त्याकडे मी लक्ष वेधित आहे. देशभरात 7 प्रकारची परीक्षा मंडळे आहेत. त्यामधील एसएससी बोर्ड हे राज्य सरकारच्या अधिपत्याखालील आहे. सीबीएसई, सीआयएसई, सीजीएसई, आयबी, आयसीएसई, नॅशनल ओपन स्कुलिंग बोर्ड अशी 7 बोर्ड आहेत. या 7 बोर्डांमध्ये कोऑर्डिनेशन असणे, अभ्यासक्रमामध्ये एकवाक्यता असणे, त्यांच्या परीक्षा पध्दतीमध्ये एकवाक्यता असणे, परीक्षा घेण्याच्या संदर्भातील पुढे आलेली आधुनिक संशोधने, गुणदान पध्दती, मार्किंग सिस्टिम बंद करुन आणलेली ग्रेड सिस्टिम या सर्वांमध्ये कोऑर्डिनेशन असणे जरुरीचे आहे. तसेच सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन हा जागतिकस्तरावर सर्वांना मान्य झालेला प्रकार आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या संबंधात, परीक्षा पध्दतीमध्ये कोणते बदल आणले पाहिजेत याकडे लक्ष वेधणे, त्याच प्रमाणे वर्तन परिवर्तनाधिष्ठीत मूल्यमापन करणे म्हणजे आई या विषयावर पांडित्यपूर्ण बोलणा-या व्यक्तीला जर विचारले की, तुझी आई कुठे आहे, तर तो सांगतो की गावाकडील भावाच्या घरामध्ये आहे. ती माझ्या घरात येऊ शकत नाही. अशा प्रकारे पांडित्य वेगळे आणि आचार वेगळा अशी परिस्थिती असण्या पेक्षा आचारामध्येच शिक्षण आले पाहिजे. वर्तन-परिवर्तनाधिष्ठीत मूल्यमापन अशी जी सर्व प्रिन्सिपल्स आहेत त्यावर आधारित मूल्यमापन पध्दती असली पाहिजे आणि त्याबाबतीत सर्वांमध्ये कोऑर्डिनेशन असले पाहिजे. बेस्ट ऑफ फाईव्हच्या बाबतीत 5 महिन्याकरिता कोर्टाने रिलिफ दिलेला आहे. 5 महिन्यानंतर येणा-या हिवाळी अधिवेशनामध्ये पुन्हा याच विषयावर चर्चा करण्याची वेळ येऊ नये अशी सरकारची इच्छा असेल तर मी असे म्हणेन की राज्य सरकारने पुढाकार घेऊन या सातही बोर्डांमध्ये एकवाक्यता कशी येईल हे पाहिले पाहिजे. हा मुळात फाऊंडेशन कोर्स आहे.या देशातील शिक्षण प्रणाली पाहिली तर आपल्याला दिसून येईल की, पहिल्यांदा मुलांना सर्टिफिकेट कोर्स दिला जातो, त्यानंतर डिप्लोमा कोर्स, त्यानंतर बॅचलर कोर्स, त्यानंतर मास्टर कोर्स, त्यानंतर डॉक्टरेट कोर्स आणि त्यानंतर पोस्ट डॉक्टरेट कोर्स, असे कोर्स दिले जातात. ही

..3..



MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:40

(श्री. भगवान साळुखे...

सिक्स-लेअर सिस्टिम आहे. आपली सहास्तरीय शिक्षण प्रणाली असेल आणि तिचा पहिलाच पाया हा एसएससी बोर्डाची परीक्षा असेल आणि त्यामध्ये एकवाक्यता नसेल तर त्याचे सार्वत्रिक दुष्परिणाम होतात. यासंबंधात चालू वर्षी शासनाला जीवदान मिळाले. परंतु या सर्वांमध्ये देशस्तरावर हार्मनी कशी निर्माण होईल, युनिफॉर्मिटी कशी निर्माण होईल या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. म्हणून या विषयाकडे शासनाने गांभीर्याने पहावे अशी विनंती.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी राईट टु एज्युकेशन या संदर्भात मुद्दा मांडला होता. या संदर्भातील दोन-तीन ठळक मुद्दे मी मांडणार आहे. राईट टु एज्युकेशनच्या संदर्भात सर्व माध्यमामध्ये, सर्व वर्तमानपत्रामध्ये, सर्व समाजामध्ये एक चर्चा सुरु आहे की आता आठवी पर्यन्तची परीक्षा संपली. 27 ऑगस्ट 2009 ला या देशाच्या संसदेने जो कायदा पारित केला त्यामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, मुलाला शाळेत आणायचा आहे, आणलेला टिकवायचा आहे आणि टिकलेला शिकवायचा आहे. आता पर्यन्त आपण वापरलेली शिक्षण प्रणाली ही डिडक्टीव्ह पध्दतीची होती. म्हणजे जो नापास झाला, गळून गेला त्याला तेथेच सोडला. अशी पध्दत पुढे चालणार नाही. 14 वर्षापर्यन्त तो टिकला पाहिजे अशी कल्पना आहे. त्याच्यामध्ये पहिल्या वर्गापासून ते आठवीच्या वर्गापर्यन्त क्षमता निर्धारित केलेल्या आहेत. काही मुले एक्सलण्ट तयार होतील, काही मुले बिलो-लेव्हल असतील. या सर्वांना वरच्या वर्गात न्यावयाचे आहे. ही जबाबदारी शिक्षण व्यवस्थेवर निर्धारित केलेली आहे. संसदेने पारित केलेल्या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करायची असेल तर त्याबाबतीत शिक्षकावर, शिक्षण व्यवस्थेवर आणि शासनावर जबाबदारी येते. विद्यार्थ्याला काही आले नाही तर त्याला काढून टाकले जाते. प्राथमिक शिक्षणाची कोणती मोठी समस्या असेल तर ती ड्रॉप आऊट, .....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 11:45

श्री.भगवान साळुंखे......

स्थगन होणे यासारखी कर्करोगाने बाधित असलेली प्राथमिक शिक्षण व्यवस्था दुरुस्त करण्याकरिता आठवीपर्यंतची परीक्षा समानतेच्या परिभाषेत घ्यायची आहे. याचा अर्थ परीक्षा संपली असे नाही. परीक्षा पध्दतीमध्ये बदल केलेला आहे याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. राज्य सरकारला याठिकाणी विशेष विनंती करावयाची आहे ती म्हणजे, केंद्र सरकारने प्राथमिक शिक्षणाची आर्थिक जबाबदारी बऱ्यापैकी स्वीकारलेली आहे. प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची आर्थिक जबाबदारी केंद्र सरकारने उचललेली आहे. या कायद्यामध्ये केंद्र सरकारने 6 ते 14 वर्षापर्यंतच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली आहे. आपण राज्य सरकारकडे शिक्षण कराच्या रुपाने आम्ही जो पैसा देतो, त्या माध्यमातून राज्य सरकार बजेटमध्ये प्राथमिक शिक्षणासाठी तरतूद करीत असते. तो निधी या महाराष्ट्रातील बालवाडीच्या शिक्षणाकडे वळता करावा आणि या महाराष्ट्रामध्ये बालवाडीच्या पूर्वप्राथमिक शिक्षणाची जबाबदारी पूर्ण क्षमतेने राज्य शासनाने उचलावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, कायद्यामध्ये चार प्रकारच्या शाळा नमूद केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी आपल्या भाषणात त्याचा उल्लेख केला आहे. या वर्षी या शाळा सुरु झालेल्या आहेत. त्यामध्ये अब्जाधीशांच्या शाळा, कोट्याधीशांच्या शाळा, लक्षाधीशांच्या शाळा आणि जनसामान्यांच्या शाळा वेगळ्या आहेत. यामध्ये सरकारने भरीस भर म्हणून इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रचंड प्रस्ताव मागविले. त्या प्रस्तावांना सरकारने यावर्षी मान्यता दिली तर महाराष्ट्रामध्ये प्राथमिक मराठी माध्यमाच्या, जिल्हा परिषदा, महानगरपालिकांच्या व खाजगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देणाऱ्या मराठी माध्यमाच्या शाळा आहेत त्या हळूहळू बंद पडतील. हा गंभीर धोका आज निर्माण झालेला आहे. मूळ कायदा केंद्र सरकारने मंजूर केला आहे. त्या कायद्याचा योग्य अन्वयार्थ लावणे, करेक्ट इंटरप्रिटेशन करणे आणि त्या दृष्टीकोनातून निर्णय घेतले गेले पाहिजेत. त्या कायद्याबाबत चुकीचे इंटरप्रिटेशन केले जात आहे. प्राथमिक शिक्षणाची वित्तीय जबाबदारी राज्य सरकार पूर्णपणे नाकारीत आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रामध्ये हे करणे म्हणजे तुमच्या आमच्या हातून होणारा सामुदायिक प्रकारचा गुन्हा आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयावर अनेक प्रकारच्या सूचना आलेल्या आहेत. सध्या प्रवेश प्रक्रिया या महाराष्ट्रामध्ये सुरु झालेली आहे. गेला महिनाभर महाराष्ट्रातील शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या संदर्भात चिंतातूर झालेले होते. सुप्रीम कोर्टाने या संदर्भात निर्णय दिला असला तरी शासनाचे अभिनंदन करावे अशी स्थिती नाही. समाधान यातच आहे की, विद्यार्थ्यांचे जीव टांगणीला लागले होते, संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या प्रश्नाकडे लागले होते त्यापासून त्यांची सुटका झाली. प्रवेश प्रक्रिया सुरु होत असल्यामुळे मार्ग मोकळा झाला आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशनात आणि मागील वर्षीच्या हिवाळी अधिवेशनात आम्ही माननीय शिक्षणमंत्र्यांना विनंती केली होती की, पालक आणि विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळू नका. या संदर्भात जे धोरण तयार करावयाचे आहे ते योग्य पध्दतीने तयार करण्यात यावे. प्रयोगशील धोरण बनवू नये. शिक्षणाचा खेळखंडोबा करु नये. दुर्दैवाने या महाराष्ट्रात शिक्षण या विषयाला शेवटचा क्रम दिला गेला आहे. या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शिक्षण विभागाला पूर्णवेळ मंत्री लाभलेले नाहीत. सर्वप्रथम पूर्णवेळ शिक्षणमंत्री असणे आवश्यक आहे. शिक्षण खाते हे उद्याची पिढी घडविणारे खाते आहे. दुर्दैवाने या खात्याकडे महाराष्ट्र सरकारने योग्य प्रमाणात लक्ष दिलेले नाही. त्यामुळे शिक्षणाचा खेळखंडोबा झालेला आहे. लोकांची सरकारबद्दल विश्वासार्हता राहिलेली नाही. सरकार वारंवार वेगवेगळे निर्णय घेत आहे. पर्सेंटाईल सूत्र लागू केले. ते यशस्वी होऊ शकले नाही. 90:10, 70:30 प्रमाणात प्रवेश देण्याचा निर्णय झाला, तो यशस्वी होऊ शकला नाही. म्हणून बेस्ट फाईव्हचा निर्णय लागू केला. यामुळे पालक व विद्यार्थी चिंतेत आहेत. माझी या निमित्ताने मागणी आहे की, राज्य सरकारने सर्वंकष शैक्षणिक धोरण जाहीर करावे. ज्या धोरणाचा महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांना व पालकांना निश्चितपणे उपयोग होऊ शकेल.

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. भोगले..... 11:50

श्री. संजय केळकर .......

अशा प्रकारचे सर्वकष धोरण असले पाहिजे. तसेच केवळ चारच महिने अगोदर याची तयारी न करता अगोदरपासूनच तयारी करण्याची गरज आहे. प्रवेश प्रक्रियेच्या बाबतीतही शास्त्रशुध्द धोरण कसे निर्माण करता येईल याचाही विचार करावा. अन्यथा एका बाजूला 10 लाख विद्यार्थी आपल्या एस.एस.सी. बोर्डाचे आणि दुसऱ्या बाजूला आयसीएसई व सीबीएसई बोर्डाचे 8 हजार विद्यार्थी ही दरी निर्माण होता कामा नये. दोन्ही बोर्डाची मुले ही आपलीच आहेत, आपल्याच राज्यातील असल्याने त्यांच्यामध्ये विषमता निर्माण करण्याचा अधिकार शासनाला नाही. यासंदर्भात माननीय मंत्री महोदय नेमके कोणते धोरण राबविणार आहे, कोणता निर्णय घेणार आहेत हे उत्तराच्या भाषणातून सांगितले पाहिजे. शिक्षणासंबंधी या सभागृहात अनेक वेळा चर्चा होते पण अद्यापही शासनाकडून चांगल्या प्रकारचे शैक्षणिक धोरण तयार होत नाही. आता मात्र कळस झालेला आहे, पाणी डोक्यावरुन जायला लागले आहे म्हणून शिक्षणाच्या संदर्भात नेमके धोरण जाहीर करावे.

दुसरा मुद्दा असा आहे की, सक्तीचे आणि मोफत शिक्षणासंबंधी केंद्रशासनाने जो कायदा पारित केलेला आहे तो राज्यांना बंधनकारक असला तरी त्या कायद्याची, त्या धोरणाची कशा पध्दतीने अमलबजावणी कशी करणार हे अजुनही विधिमंडळात सांगितलेले नाही. केंद्राकडून सन 2002 मध्ये असा ठराव पारित झालेला असताना त्याची अंमलबजावणी अजुनही आपल्या राज्यात होत नसल्याने राज्यात जागोजागी पालक अथवा विद्यार्थी यांना कोर्टात जाऊन केंद्राच्या निर्णयानुसार आम्हाला सक्तीचे व मोफत शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. तो मिळत नाही किंवा राज्याकडून अंमलात आणला जात नाही म्हणून न्याय मिळावा अशी मागणी केली तर देशाच्या पंतप्रधानांना तसेच शिक्षण मंत्र्यांना देखील तालुका न्यायालयात हजर राहण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही. या धोरणात सक्तीच्या शिक्षणाच्या बाबतीत अनेक डायरेक्टीव्हज दिलेल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना एक ते दीड किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर शाळेत जावे लागू नये, शिक्षकांची संख्या वगैरे अनेक गोष्टी असून त्यासंदर्भात विधिमंडळात साधी चर्चाही नाही. म्हणून या धोरणाची अमलबजावणी कशी करणार हे शासनाने स्पष्ट करुन त्यावर प्रकाश टाकावा. अशी विनंती करतो आणि वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

...2....

14-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वंदना चव्हाण (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर जी चर्चा घडवून आणली आहे त्या प्रस्तावाला मी अनुमोदन देऊन त्यावर माझे विचार मी थोडक्यात मांडणार आहे.

महोदय, या विषयाच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत, मी फक्त काही मुद्दे मांडणार आहे. शैक्षणिक धोरणात वारंवार बदल होत आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यात कधी पर्सेंटाईल, कधी 90:10 तर कधी 70:30 चे फॉर्म्युले वापरण्याचा प्रयत्न केला आणि आता बेस्ट ऑफ फाईव्हचा फॉर्म्युला सर्वोच्च न्यायालयाने अपहेल्ड केला आहे. मुद्दा एकच आहे की, राज्यातील 60 लाख जी बोर्डातून पास होतात त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून निश्चित असे धोरण असले पाहिजे. त्यानुसार बेस्ट फाईव्हसंबंधीचा जो निर्णय शिक्षण मंत्र्यांनी घेतला त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करते. बेस्ट फाईव्हची योजना या शासनाने आखली आणि त्याला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम रित्या मान्यता दिली. परंतु शैक्षणिक धोरणासंबंधीचा निर्णय घेत असताना मला सभागृहाच्या निदर्शनास एक बाब आणून द्यावयाची आहे की, कुठल्याही एका विशिष्ट बोर्डाबद्दल आकस ठेवून शैक्षणिक धोरण ठरवू नये. एस.एस.सी. बोर्डाच्या मुलांना न्याय मिळाला पाहिजे, ॲडमिशनच्या बाबतीत ती कमी पडत असतील तर त्यांच्या बाजूने उभे राहिले पाहिजे पण दुसरे बोर्ड कशा प्रकारे कमी आहे, त्यांना मार्क्स कसे जास्त मिळतात आणि आपल्यावर ते विद्यार्थी लादण्यात येतात अशी वस्तुस्थिती नाही. मी देखील आयसीएसईची विद्यार्थीनी असल्याने सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, सुरुवातीला हे बोर्ड आयएससी म्हणून अस्तित्वात होते. तेव्हा या बोर्डाच्या मुलांना 60 टक्के मार्क मिळविणे सुध्दा अवघड होत होते. त्याच वेळेस मात्र एस.एस.सी. बोर्डाच्या मुलांना 70-75 टक्के मार्क्स मिळत होते. तेव्हा आयसीएसईच्या मुलांना ॲडमिशन मिळण्यासाठी अडचणी येत होत्या म्हणून शासनाने त्यांच्या बाबतीत असे धोरण आखले होते की, आयसीएसईच्या फर्स्ट क्लास धारण केलेल्या मुलांना आणखी एक क्लास एक्झम्प्ड करुन पुढील वर्गात ॲडमिशन घेण्याची परवानगी देण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ KGS/ श्री. खर्चेनंतर... 11:55

श्रीमती वंदना चव्हाण..

त्या काळात आम्हाला विषयाची पुस्तके सुध्दा देखील मिळत नव्हती. जो अभ्यास क्रम असायचा तो कॉलेजचा अभ्यासक्रम असायचा. पुस्तक मिळवायचे असेल तर शालेय पुस्तकाच्या दुकानात पुस्तके मिळत नव्हती तर कॉलेजेसच्या लायब्ररीमध्ये जाऊन आम्हाला पुस्तके आणावी लागत होती अशी आयसीएसई बोर्डाची परिस्थिती होती. कोणत्याही विद्यार्थ्याला अवघड विषय नको असतात. समजा श्रीमती अलकाताई एका शाळेत शिकतात व ॲव्हरेज रिडरचा विषय घेऊन परीक्षा देणार असतील व आयसीएसईच्या मुलांना शेक्सपियर वाचून परीक्षा द्यावयाची असेल तर ॲव्हरेज रिडरला माझ्यापेक्षा निश्चितच जास्त मार्क्स मिळतील. त्यामुळे या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड तयार होतो. त्या अनुषंगाने मी काल शेक्सपियरचे नाव घेतले होते. त्यावेळेस आयसीएसईच्या मुलांना कमी मार्क्स मिळायचे हे मला येथे सांगावयाचे आहे. त्यावेळेस आम्हाला कॉलेजेसमध्ये सुध्दा प्रवेश मिळत नव्हते ही वस्तुस्थिती आहे. काही विद्यार्थ्यांनी वशिल्याने ॲडमिशन मिळवली व ते डॉक्टर, वकील झाले. त्यावेळी कॉलेजमधील ॲडमिशन वशिल्याने मिळावी लागत होती ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. आयसीएसई आणि एसएससी बोर्डाची गुणदान पध्दत आता जवळ जवळ समसमान झालेली आहे. कदाचित आयसीएसईच्या विद्यार्थ्यांना थोडे जास्त मार्क्स मिळत असतील की, नाही हे मला माहिती नाही. परंतु दोन्ही बोर्डामध्ये समसमानता निश्चित झालेली आहे. एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना कॉलेजेसमध्ये प्रवेश मिळावा यासाठी आपल्याला निश्चितपणे प्रयत्न करावे लागणार आहेत.

माझा दुसरा मुद्दा असा आहे की, आयसीएसई आणि सीबीएसईच्या शाळेत केवळ धनाढय मुलेच शिक्षण घेतात अशी वस्तुस्थिती नाही. कदाचित काही शाळेत धनाडयांची मुले शिक्षण घेत असतीलही हे अमान्य करीत नाही. माझ्या आयसीएसईच्या शाळेत नेपाळी सिक्युरीटीचा मुलगा देखील शिकत होता, एका खोलीत राहणारी गरीब घरातील मुलगी कु. मंजू सोनवणे ही शिकत होती, सायकल दुकानदाराचा मुलगा किरण मेहता शिक्षण घेत होता, कु. मृणालीनी मत्रीचे वडील हिंदुस्तान-पाकिस्तान मधील युध्दात शहीद झाले होते ती आमच्या शाळेत शिक्षण घेत होती. आमच्या क्लासमधील 90 टक्के मुले ही आर्मी ऑफिसरची होती. आज आपण एन्क्लूझीव्ह एज्युकेशन म्हणतो परंतु त्या काळात सुध्दा इन्क्लूझीव्ह एज्यूकेशन होते. मला आपल्याला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मला कोणाचीही वकिली करावयाची नाही. परंतु ज्यावेळी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वंदना चव्हाण..

आपण एखादे धोरण तयार करु, त्यावेळेस आपण एखादी बाजू मांडू, आयसीएसईची 10 हजार मुले शिक्षण घेत असली तरी सुध्दा आपल्याला त्यांच्या बाबतीत विचार करावाच लागणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितले आहे की, आयसीएसई आणि सीबीएसईची मुले देखील आपलीच आहेत त्यामुळे या मुलांना आपल्याला दुजाभाव देता येणार नाही. म्हणून ती मुले वेगळी आहेत, ती काही तरी वेगळीच मागणी करतात, ते खो-याने मार्क्स घेतात अशी जी आपली मानसिकता आहे ती येऊ देऊ नका एवढेच मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, मला कम्युनिटी सर्व्हीसच्या संदर्भात विचार व्यक्त करावयाचे आहेत. कम्यूनिटी सर्व्हीस इतर शाळेत नसते ती आयसीएसईच्या शाळेत असते. मला अजूनही आठवते की, शनिवार व रविवारचा दिवस आम्हाला अपंग वसतीगृहात, अपंग वसतीगृहात, ज्येष्ठ नागरिकांच्या गृहात जाऊन आम्हाला त्यांचे संडास साफ करावे लागत असत, त्यांचा परिसर स्वच्छ करावा लागत असे. अशा पध्दतीची कामे आम्हाला त्यावेळेस शिकवली जात असे. काल आयसीएसईच्या संदर्भात या ठिकाणी चांगल्या प्रकारे भावना व्यक्त केल्या गेल्या नाहीत त्यामुळे मला या ठिकाणी मला माझ्या भावना व्यक्त कराव्या लागत आहेत. आयसीएसईची मुले धनाड्य आहेत, खो-याने मार्क्स ओढतात असे काही ठिकाणी असेलही परंतु सगळीकडे अशीच परिस्थिती आहे असे मानणे चुकीचे होईल. या विषयाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने चांगला निर्णय घेतलेला आहे. आयसीएसईचे जे सात विषय आहेत त्यातील एक विषय बाजूला टाकण्यात आलेला आहे. हा विषय सुप्रीम कोर्टाने बेस्ट ऑफ फाईव्ह मध्ये घेतलेला नाही ही स्वागतार्ह बाब आहे. काही काही विषयात जास्त मार्क्स मिळू शकतात त्यामुळे मी मुद्दामहून इंटरनेटवरुन सिलॅबस काढला आहे. काल या ठिकाणी टीका केली गेली की, योगा, प्रोग्रेसीव्ह कम्युनिटी सर्व्हीस, ॲग्रीकल्चर सायन्स, एनव्हायरमेंट ॲप्लीकेशन मध्ये जास्त मार्क्स दिले जातात. तसेच योगा मध्ये हयुमन स्केलेटन, डायजेस्टीव्ह सिस्टीम, योगा थेरपी अशा विषयांचा समावेश आहे. मी आपणांस या ठिकाणी सिलॅबस वाचून दाखविते. त्यात असे आहे की, "In this section condidates are expected to know about the lives and teachings of the following : Valmiki, Vashistha, Vishvamitra, Kabir, Mirabai, Tukaram. The Asthanga Yoga of Patanjali : Patanjali, The Five Yamas, The Five Niyamas, Asanas.

...3...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वंदना चव्हाण..

The Definition of yoga, Guru and Shishya, the four Purushartha's the four Ashramas, the four Margs - Jnana, Karma, Bhakti, Yoga Sadhana..." या विषयांचा देखील या अभ्यासक्रमात समावेश आहे. यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वंदना चव्हाण...

मी हे श्री.रावते साहेबांना देते. मी येथे ICSE बोर्डाची वकिली करीत नाही. ही मुले सुद्धा आपली आहेत. त्यांच्या बद्दल देखील आपण भावना बाळगली पाहिजे. मी त्यातून गेले आहे. कॉलेजमध्ये मुलांना ॲडमिशन मिळत नाही तेव्हा काय प्रसंग येतो हे मी अनुभवले आहे. पण नंतर हीच मुले विद्यापीठामध्ये पुढे पहिली आलेली आहेत. त्यामुळे यात आकस ठेवू नये असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद.

.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधान परिषदेमध्ये ज्यावेळी चर्चा होते, त्यावेळी आपण धोरणकर्ते म्हणून भूमिका मांडत असतो. शक्य तो आपण कुठल्या जातीचे आहोत, कुठल्या शाळेत शिकलो आहोत, कोणाच्या संस्कारातून वाढलो आहोत, या वादासाठी ही विधान परिषद नाही. कारण विधान परिषदेतील सर्व आमदारांची भूमिका राज्यामधील सर्व मधील सर्व मुलांचे आपण पालक आहोत अशी मांडणे आवश्यक आहे. दुर्दैवाने मी या सभागृहात पहिल्यांदा असे बघते आहे की, कोण कुठल्या शाळेतून शिकून आला आहे, त्या पद्धतीने त्या शिक्षणाची माहिती देण्याचे प्रशिक्षण येथे मांडले जात आहे. त्यात वेळे अभावी माझा वेळ घालणे मला शक्य नाही. श्री.रावते साहेब सभागृहात नसल्यामुळे काही मुद्दे मांडून नंतर मला माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांच्या मुद्यांचे खंडन करावे लागणार आहे. मी देखील मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतून शिकले आहे. साने गुरूजी विद्यालयातून शिकले आहे. त्यामुळे मला देखील असे बोलणे क्रमप्राप्त आहे.

सन्माननीय शिक्षण राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांनी बेस्ट ऑफ पाईव्ह संबंधी घोषणा केली. त्यावेळी निश्चितपणाने एक जाणवले होते की, सरकार इतर शिक्षण मंडळाना एकत्र आणण्याचा कुठे तरी प्रयत्न करीत आहे. राज्यांतील मुलांच्या हिताचे रक्षण करणे हा राज्य सरकारचा हेतू होता. काल जो निकाल लागला आहे, त्याने तात्पुरता दिलासा मिळाला आहे. श्री.हरिश साळवे यांनी कोर्टामध्ये आपली बाजू मांडली आहे त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करणे हे या सभागृहाचे कर्तव्य समजते. काल पासून येथे अनेक मुद्दे चर्चेला आलेले आहेत. वेगवेगळ्या मुद्यांवर अनेक जण बोलले. त्यांचे विचार, मुद्ये वाया जाण्यापेक्षा आपण त्या मुद्यांवर कृती करणे आवश्यक आहे. यासंबंधातील धोरण ठरविण्यासाठी आपण कृती कार्यक्रम समोर आणला पाहिजे. कारण 5-6 मुद्दे अजूनही अनिर्णित आहेत. या वर्षीपासून डोमिसाईल प्रमाणपत्र अनिवार्य असेल असे शासनाने जाहीर केले होते. नंतर जाहीर केले की, असे प्रमाणपत्र नसले तरी चालेल. पुढच्या वर्षीपासून डोमिसाईल प्रमाणपत्र लागणार असेल तर ते शाळांमधून मिळण्याची व्यवस्था या वर्षीपासूनच आपण केली पाहिजे व तशा प्रकारच्या सूचना आपण शाळांना देणे गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

दुसरा भाग ऑन लाईन प्रवेश, शाळांमधील सुविधा, आठवी पर्यंत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण असा आहे. तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.वसंत पुरके यांनी देखील यावर टीका केली आहे. आठवी पर्यंत सर्व मुले उत्तीर्ण झाली तर या मुलांचे 9 वी, 10 वी मध्ये काय होईल. दहावीमध्ये देखील आपण ATKT देत आहोत. मुलांच्या मनावर शिक्षणाचे दडपण येऊ नये, आघात होऊ नये म्हणून आपण त्यांची काळजी घेत आहोत. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत म्हणून आपण काळजी घेत आहोत. CBSE, ICSE, या बोर्डांचा अभ्यास करण्यासाठी आपल्या शिक्षण विभागाचे शिक्षण पुरेसे आहे याबाबत मी साशंक आहे. केंद्र सरकारमध्ये श्री.कपिल सिब्बल यांनी नुकतेच जाहीर केले की, कॉलेजेस मध्ये आर्टस मध्ये सायन्सचे आणि सायन्समध्ये आर्टसचे विषय घेता येतील. केंद्र आणि राज्याचे धोरण यात आपण समन्वय ठेवला नाही तर परत हेच होणार आहे. उद्या वेगवेगळ्या प्रकारच्या अभ्यासक्रमांना बसताना महाराष्ट्रातील सर्वसामान्य मुले आपल्याला मागे पडलेली दिसतील. पर्सेन्टाईलसंबंधी जो पर्यंत आपण रामबाण उपाय काढत नाही, तो पर्यंत हेच विषय परत परत वेगवेगळ्या माध्यमातून येणार आहेत कोर्टाने निर्णय देताना इतर बोर्डातील विद्यार्थ्यांचा देखील विचार केला आहे. त्या विद्यार्थ्यांना देखील बेस्ट ऑफ फाईव्हचा ऐच्छिक फायदा घेता येऊ शकेल. पर्सेन्टाईल पद्धत असेल, आठवी पर्यंत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याची पद्धत असेल, ऑन लाईन प्रवेशाची पद्धत असेल शासनाचे धोरण प्रत्येक विषयामध्ये नक्की काय आहे, हे ठरविण्यासाठी कमिटी नेमली पाहिजे. ज्यावेळी आपण पर्सेन्टाईल सूत्रामध्ये हरलो त्यावेळी श्री.पतंगराव कदम यांनी कमिटी नेमण्याचे जाहीर केले होते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

ही कमिटी रद्द केलेली आहे. त्या संदर्भात देखील सन्माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष घालावे. याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण म्हणाल्या की, शेक्सपिअर अवघड असेल आणि शिरवाडकर त्यांना सोपा वाटत असेल. प्रश्न असा आहे की, विद्यार्थी कोणत्या परिस्थितीत शिक्षण घेत आहेत याचा आपण विचार करायला हवा. काही विद्यार्थ्यांना होडीतून प्रवास करुन शिक्षण घ्यावे लागते तर काही विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी स्वतंत्र गाडी असते. त्यांच्या घरामध्ये तीन-चार नोकर असतात. आपल्या कुटुंबियातील मुलांची परिस्थिती आणि इतर कुटुंबियांतील मुलांची परिस्थिती यात जो फरक आहे त्याबाबत आपली संवेदशनशीलतेची भूमिका असली पाहिजे असे माझे मत आहे.

प्रश्न असा आहे की, आज सर्वत्र एस.एस.सी.बोर्डाच्या विद्यार्थ्यांबाबत हेट मेल येत आहेत. इतर बोर्डातील मुले एस.एस.सी.बोर्डातील विद्यार्थ्यांबरोबर ज्या भाषेत बोलत आणि लिहित आहे याचा एक अर्थ त्या मुलांच्या पाठीमागे पालकांचे हितसंबंध काम करीत आहेत. दुर्दैवाने आफ्रिकेतील वांशिक मुलांना जसे गोऱ्या मुलांनी हिणवावे तसे इतर बोर्डातील मुले एस.एस.सी.बोर्डाच्या विद्यार्थ्यांबाबत हेट मेल लिहिणार असतील तर ते योग्य नाही आणि त्यास आमचा आक्षेप आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण त्यांच्या भाषणात म्हणाल्या की, सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई बोर्डाचा अभ्यासक्रम जास्त अवघड आहे. मी याबाबत सांगू इच्छिते की, सामान्य शाळेत शिकलेली मुले, त्यांनी नंतर मिळविलेले यश, त्यांनी नंतर आयुष्यात केलेली प्रगती आणि सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई.च्या विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती याचा आढावा घ्यावा. या सभागृहात उद्या सी.बी.ई.सी.बोर्डातून निवडून आलेले प्रतिनिधी येथे त्यांच्या बाजू घेऊन बोलायला लागले तर आमच्या एस.एस.सी.बोर्डाच्या मुलांचे काय होणार असा प्रश्न निर्माण होईल...(अडथळा).. हा भांडणाचा मुद्दा नाही. माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान येथे उपस्थित आहेत. त्या देखील इंग्रजी शाळा चालवितात. आपण महाराष्ट्रातील एस.सी.सी. बोर्डातील विद्यार्थ्यांचा सर्व्हे करावा आणि वेगवेगळ्या बोर्डातून आलेल्या विद्यार्थ्यांचा सर्व्हे करावा. आपण येथे जे बोलतो ते वांशिक स्वरुपाच्या भेदभावाला खतपाणी घालणारे असेल तर ते अजिबात मान्य नाही. आमच्या नातेवाईकांची काही मुले वेगवेगळ्या बोर्डात शिक्षण घेत आहेत.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

याचा अर्थ असा नाही की, ते फार अभ्यासाचे डोंगर पेलत आहेत आणि महानगरपालिकेतील मुले अभ्यास करीत नाहीत. महानगरपालिकेतील मुले 90 टक्के गुण मिळवितात याचा अर्थ ती मुले काहीतरी खोटारडेपणा करुन गुण मिळवितात असा होत नाही. बुध्दीचा वारसा ठराविक वर्गाला दिलेला नाही हे सिध्द झालेले आहे. अशावेळेला आपण बोर्डा बोर्डात का वाद निर्माण करीत आहोत ? शेक्सपियर आणि शिरवाडकर अशी तुलना का करण्यात येत आहे ? उलट साहित्याचा अर्थ असा आहे की, तुम्ही कोणत्याही जाती धर्मात जन्मला असाल तरी ते जबरदस्तपणे मांडू शकता. येथे शेक्सपिअर आणि शिरवाडकर असा वादाचा प्रश्न निर्माण होत नाही. ज्यांनी जीवनात अनेक वेदना भोगल्या आहेत ते गरीब लेखक असोत किंवा सुशिक्षित वर्गात जन्मलेले लेखक असोत, आपण सर्वांचे साहित्य एकाच निकषात तोलून पुढे नेत असतो. तेव्हा हा दुर्दैवी वाद कुठेतरी संपवावा. योगा किंवा इतर विषयांमधील मार्क्स किती महत्वाचे आहेत हे याठिकाणी आपण आम्हाला कन्व्हीन्स करु शकत नाही. आपण कुठेतरी त्या बोर्डाची वकिली करीत आहोत...

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना त्यांचा मुद्दा मांडण्याचा जरुर अधिकार आहे. त्यांनी तो मांडावा. त्यांनी याठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे तो देखील कन्व्हीसिंग आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांनी जी भूमिका मांडलेली आहे ही सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या दृष्टीने चूक असली तरी इतरांनी ती ऐकलेली आहे आणि त्यांना मुद्दा मांडण्याचा त्यांना अधिकार आहे आणि तो त्यांना दिला पाहिजे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण भाषण करीत असताना आम्ही हरकत घेतली नाही. मी बोलत असताना.. (अडथळा)...विपर्यस्तपणाचा प्रश्न नाही... मी चॅलेंज दिलेले आहे. आपण अस्वस्थ होऊ नका...., उच्च शिक्षित, उच्च श्रीमंत वर्गाचा गरीब लोकांबद्दलचा दुजाभाव दिसतो त्याला प्रत्यक्ष अनुभवातून आम्ही आव्हान देतो असे मी सांगत आहे... सत्ता आपल्याकडे आहे. या विषयावर अभ्यास करुन या सर्व बाबी पुन्हा मांडाव्यात. सहा महिने किंवा वर्षभरानंतर आपण पुन्हा या विषयावर बोलू एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

------

यानंतर श्री.गायकवाड..

श्री.धनंजय मुंडे ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाच्या बाजूने बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर माझ्या पूर्वी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार मांडलेले आहेत ते ऐकल्यानंतर एखादाच विषय सन्माननीय सदस्यांकडून मांडावयाचा राहिला असेल असे मला वाटते.

सभापती महोदय,कधी एके काळी शिक्षण हा चिंतनाचा विषय होता. मधल्या काळात सवंग लोकप्रियतेसाठी आणि लोकप्रतिनिधींच्या आग्रहाखातर राज्य शासनाने वास्तवाचे भान सोडून शिक्षण विषयक काही निर्णय घेतले होते. त्यामुळे मधल्या काळात शिक्षण हा चिंतेचा विषय बनला होता. त्यानंतर अलीकडच्या काळात काही प्रकरणे न्यायालयात गेल्यामुळे न्यायालयीन निर्णयास विलंब लागत असल्यामुळे हा विषय चितेचा बनला आहे.

सभापती महोदय, मी नव्याने निवडून आलो असून परवाच्या दिवशी माझा शपथविधी झाला होता. त्या दिवशी शपथ घेतल्या नंतर बेस्ट ऑफ फाईव्हचा विष्य सभागृहामध्ये चर्चेला येणार हे मला माहीत होते. त्याचबरोबर अनेक सन्माननीय सदस्यांनासुध्दा ते माहीत होते. हा विषय सभागृहात चर्चेला येणार हे माहीत असल्यामुळे मी त्यासंबंधी विचार करावयास लागलो. सभापती महोदय, मी जवळजवळ आठ वर्षे जिल्हा परिषदेमध्ये सदस्य म्हणून निवडून आलो आहे त्याचबरोबर मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष देखील होतो. जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये आणि विधान परिषदेच्या सभागृहामध्ये काय फरक आहे याचा विचार केल्यानंतर मला असे आढळून आले की, विधान परिषदेमधील सन्माननीय सदस्य हे बुध्दिजीवी आहेत. त्यामुळे मला खरोखर खूप आनंद झाला आहे.जिल्हा परिषेदच्या सभागृहामध्ये आणि विधान परिषदेच्या सभागृहामध्ये मला एका बाबतीत मात्र समानता आढळून आली आहे. जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये कृषी आणि शिक्षण या दोन विषयासाठी एकच सभापती असतात त्याचप्रमाणे येथे सुध्दा कृषी आणि शिक्षण विभाग एकाच मंत्र्यांकडे आहे.

सभापती महोदय, राज्याचे शिक्षण विषयक धोरण ठरवत असतांना 70:30, 90:10 , आणि बेस्ट ऑफ फाईव्ह अशी तीन वेगवेगळी धोरणे ठरविण्यात आलेली आहेत. अर्थात त्या संदर्भात मी जास्त काही बोलणार नाही. अकरावीच्या प्रवेशासाठी शासनाने बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय घेतला

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनजय मुंडे ......

असून सुप्रीम कोर्टाने देखील तो मान्य केला असल्यामुळे माननीय शिक्षण मंत्री असे म्हणत आहेत की, त्याबद्दल माझे अभिनंदन करावे. बेस्ट ऑफ फाईव्हच्या निर्णयाला सुप्रीम कोर्टाने मान्यता दिली असल्यामुळे शासनाचे अभिनंदन करण्यात आले आहे परंतु हा निर्णय अंतरिम स्वरुपाचा आहे असे मला सांगावयाचे आहे. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक या जिल्हयातील विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा झालेला असला तरी उर्वरित राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना मात्र त्याचा फायदा झालेला नाही. राज्यातील बरेचसे विद्यार्थी एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षा देत असतांना सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. बोर्डाच्या परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांबरोबर त्यांची स्पर्धा नाही. तेव्हा या धोरणात बदल करण्यात आला पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळातून विषय शिक्षक देणे आवश्यक आहे परंतु ते शिक्षक दिले जात नाहीत. माझ्या अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी त्यासबंधीचा मुद्दा येथे मांडला होता. काही जिल्हा परिषदेला शिक्षणाधिकारी सुध्दा नाहीत. तीच अवस्था माझ्या जिल्हयात देखील आहे. वाडया वस्त्यांमध्ये राहणा-या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासन लाखो रुपये खर्च करीत आहेत परंतु त्यामुळे या विद्यार्थ्यांना खरोखर शिक्षण मिळते काय ? हे पाहण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात शिक्षण घेणा-या विद्यार्थाच्या भविष्याच्या दृष्टीने पाहिले तर बेस्ट ऑफ फाईव्ह निर्णयाचा किती फायदा होणार आहे ? असे मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे. एस.एस.सी.बोर्डाची परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांना सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई. बोर्डाच्या परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांबरोबर कोणतीही स्पर्धा करावयाची नाही त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या दोन्ही बोर्डाशी काहीही देणे घेणे नाही.ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला कोणत्याही महाविद्यालयामध्ये अकरावीसाठी प्रवेश मिळत असतो.

नंतर श्री.सरफरे s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे....

आणि ती गुणवत्ता नसल्यामुळे व बेस्ट ऑफ फाईव्हचे सूत्र स्वीकारल्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील एस.एस.सी. बोर्डाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता ढासळली तर त्याला कोण जबाबदार राहणार आहे? सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये नवनिर्वाचित सदस्य असून माझी भाषण करण्याची दुसरी वेळ असल्यामुळे मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. गेल्या सलग तीन वर्षापासून आपले शैक्षणिक धोरण निश्चित होत नाही. गेल्या सलग तीन वर्षापासून या शासनाला व शिक्षण खात्याला न्यायालयामध्ये चपराक बसत आहे. आणि या वर्षी देखील बेस्ट ऑफ फाईव्हच्या माध्यमातून चपराक बसली आहे. माननीय शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब थोरात हे वनमंत्री असतांना वाघाच्या पिंजऱ्यामधील छापून आलेला त्यांचा फोटो मी पाहिला होता. त्यावरुन त्यांच्याकडून या गोष्टी व्यवस्थित होऊ शकतील असे मला वाटले होते. परंतु बेस्ट ऑफ फाईव्हच्या सूत्रामुळे अनेक दिवसांपासून विद्यार्थ्यांची हेळसांड होत आहे. त्यांनाही या शैक्षणिक धोरणाचा अंदाज लागत नाही. ज्याप्रमाणे फूटबॉलच्या वर्ल्डकपमध्ये कोण जिंकेल हे ऑक्टोपस पॉल ठरवित होता, त्याप्रमाणे एक ऑक्टोपस पॉल मंत्रिमहोदयांना आणून देण्यात यावा. त्याच्यापुढे चार-पाच प्रकारची शैक्षणिक धोरणे ठेवावीत आणि त्यामधील कोणते धोरण निवडावे हे तो ऑक्टोपस पॉल ठरविल. आणि म्हणून बेस्ट ऑफ फाईव्हच्या सूत्राच्या माध्यमातून कोणते तरी निश्चित धोरण ठरविणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर शहरातील एस.एस.सी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना फायदा झाला असला तरी राज्याच्या ग्रामीण भागातील एस.एस.सी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या सुध्दा फार मोठी आहे. त्यांना यामधून फायदा होणार आहे काय? आणि तो फायदा जर होणार नसेल तर त्यांच्यासाठी अशाप्रकारच्या अनेक योजना केल्या तरी काही उपयोग होणार नाही.

सभापती महोदय, आज राष्ट्रीय शैक्षणिक निर्देशांकात हे महाराष्ट्र राज्य पहिल्या दहामध्ये देखील नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आज ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमधील प्रयोगशाळेमध्ये एक टयूबलाईट देखील नाही, त्याकरिता आर्थिक तरतूद केली जात नाही. अशा विद्यार्थ्यांनी त्या शाळेमध्ये कसे शिक्षण घ्यायचे? फक्त बेस्ट ऑफ फाईव्हचे सूत्र स्वीकारुन त्यांचे आयुष्य पुढे ढकलायचे. त्यामध्ये हा विद्यार्थी टिकेल काय? आजच्या जागतिकीकरणामध्ये हा विद्यार्थी टिकेल काय हा महत्वाचा प्रश्न आहे? सर्वोच्च न्यायालयाने बेस्ट ऑफ फाइव्हच्या बाबतीत शासनाला

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. धनंजय मुंडे...

ऑक्टोबर महिन्यापर्यंत अंतरिम मुदत दिली आहे. त्यामुळे ऑक्टोबरपर्यंत सर्वांसाठी समन्यायी अशाप्रकारचे दीर्घ शैक्षणिक धोरण ठरवावे अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये एका अत्यंत महत्वाच्या विषयावर आपण चर्चा करीत आहोत. खरे म्हणजे या विषयावर चर्चा करण्याची परिस्थिती कां उद्‌भवली याबाबत विचार करण्याची आज गरज आहे. आज राज्यामध्ये आय.सी.एस.ई., सी.बी.एस.ई. व एस.एस.सी. च्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा कशी निर्माण झाली? त्या बाबत वेगवेगळया लोकांकडून तुलना करण्यात आली. त्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढविता येईल, व ती वाढविण्यासाठी कशापध्दतीने काम करता येईल याबाबत चर्चा केली गेली. त्या चर्चेच्या खोलामध्ये मला जायचे नाही. याठिकाणी माननीय सदस्यांनी अत्यंत मौलिक अशाप्रकारचे विचार मांडले. आज या देशामध्ये ज्या पध्दतीची शिक्षण पध्दती आहे ती महाराष्ट्रामध्ये व देशाच्यावेगवेगळया भागामध्ये आहे. याठिकाणी माननीय सदस्यांनी जागतिकीकरणाचा ओझरता उल्लेख केला. या जागतिकीकरणाच्या युगात या देशातील व महाराष्ट्रातील विद्यार्थी जागतिक स्पर्धेमध्ये उभा रहाणार आहे की नाही? याबाबत विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ....

सभापती महोदय, सीबीएसईचा पाठक्रम वेगळा आहे. आयसीएसईचा पाठक्रम वेगळा आहे. एसएससीचा पाठयक्रम वेगळा आहे. हे विद्यार्थी वेगवेगळया शिक्षण पध्दतीतून पास होतात आणि कॉलेजमध्ये जातात. त्यानंतर देशाच्या पातळीवर काम करीत असताना त्याना ज्यावेळी विदेशात जाण्याची संधी प्राप्त होते त्यावेळी ते त्या देशातील एक-दोन वर्षाचे रिफ्रेसिंग कोर्सचे शिक्षण घेतात आणि मग त्या देशात काम करतात अशा पध्दतीने या जगामध्ये चाललेले आहे. आज या ठिकाणी बेस्ट ऑफ फाईव्हचा प्रश्न उदभवला. 90:10 चा प्रश्न उद्‌भवला. खरे म्हणजे ही परिस्थिती या ठिकाणी यावयास नको होती. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, वेगवेगळया विषयातील तज्ञांची या ठिकाणी एक कॉन्फरन्स बोलावण्यात यावी आणि त्या कॉन्फरन्समध्ये चर्चा करण्यात यावी. या चर्चेच्या माध्यमातून आयसीएसई, सीबीएसई किंवा एसएससीचा पाठयक्रम ठरविण्यात यावा. काय शिकविले पाहिजे, कशा पध्दतीने शिकविले पाहिजे याचा एक ढाचा तयार करण्यात यावा. केवळ महाराष्ट्रतच नव्हे तर हा ढाचा संपूर्ण देश पातळीवर वेगवेगळया बोर्डाच्या माध्यमातून तयार केला तर मला असे वाटते की,आज वेगवेगळया स्पर्धेच्या बाबतीत आपण चर्चा करीत आहोत ती स्पर्धेची गोष्ट राहाणार नाही. तसेच या विद्यार्थ्यांसमोर ग्लोबलायझेशनच्या माध्यमातून आव्हाने निर्माण झालेली आहेत. जगामध्ये स्टॅण्डर्डडायझ ेशन आलेले आहे त्यामुळे या देशात शिक्षणाच्या बाबतीतील स्टॅण्डर्डडायझेशन झाले पाहिजे अशा पध्दतीचा एक विचार या महाराष्ट्राच्या भूमीतून घेऊन जाऊन केंद्र सरकारमध्ये त्याचा पाठपुरावा केला आणि संपूर्ण देशामध्ये एक शिक्षण पध्दती, स्टॅण्डर्डडायझेशन ऑफ एज्युकेशनची पध्दती आणण्यामध्ये आपण यशस्वी ठरलो तर मला वाटते त्या माध्यमातून या महाराष्ट्रातील आणि देशातील विद्यार्थ्यांना नवीन आव्हानांना चांगल्या तऱ्हेने सामोरे जाता येईल. ग्लोबोलायझेशनच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी आपण त्यांना तयार करु शकू. ते काम या शासनाने केले तर खऱ्या अर्थाने पुढील पिढीला एक नवी दिशा, एक नवा विचार देण्यामध्ये आपण सक्षम होऊ एवढाच एक विचार मी या ठिकाणी मांडतो. सभापती महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

----

....2..

श्री. संजय पाटील (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,नियम 97 अन्वये या ठिकाणी अल्पकालीन चर्चा सुरु आहे. या चर्चेच्या माध्यमातून माझ्या आधीच्या वक्त्यांनी या ठिकाणी अतिशय चांगले विचार मांडलेले आहेत. आपापल्या बाजू मांडल्या आहेत.पण त्यामध्ये थोडी वेगळी भूमिका दिसून आली. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपली बाजू कशी योग्य आहे आणि दुसऱ्याची कशी चुकीची आहे असे दाखविण्याची भूमिका दिसून आली.

सभापती महोदय, या सभागृहात ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख तसेच इतर अनेक ज्येष्ठ सदस्यांनी माझ्या आधी विचार मांडलेले आहेत. त्यामुळे ही सर्व चर्चा कुठेतरी वांझोटी ठरु नये यासाठी याबाबतीत एक दिवसाचे एक चर्चासत्र घेण्यात यावे, अशी मी विनंती करतो. त्या चर्चासत्रामध्ये विधानपरिषदेच्या माननीय आमदारांना, विधानसभेच्या माननीय आमदारांना,काही तज्ञ व्यक्तींना बोलावण्यात यावे. तसेच या चर्चासत्राला माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच या खात्याचे मंत्रिमहोदय उपस्थित राहतील याची व्यवस्था करण्यात यावी. काही विद्यापीठांचे आणि काही खाजगी संस्थांचे धनवंतांच्या मुलांना गुणवंत करण्याचे उद्योग सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पावसकर यांनी एका चांगल्या मुद्याला स्पर्श केला. सन्माननीय सदस्य श्री. टकले यांनीही चांगला मुद्दा मांडला. ग्रामीण भागात विज्ञान या विषयाचे शिक्षक मिळत नाहीत. पण रेडियो तसेच टी.व्ही.च्या माध्यमातून सुध्दा आपण त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचू शकतो. थोडया वेळामध्ये या ठिकाणी आपले विचार मांडत असताना काही मर्यादा येतात म्हणून या विषयाच्या संदर्भात एक दिवसाचे चर्चासत्र निश्चितपणे आयोजित करण्यात यावे. शिक्षण व्यवस्था कशी आहे, कमिशन्स कधी नेमण्यात आले, ते काळाच्या ओघात बदलण्याची आवश्यकता आहे काय याबाबतीत विचार होणे गरजेचे आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून पुन्हा माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, एक दिवसाचे चर्चा सत्र आयोजित करण्यात यावे आणि त्या चर्चासत्राला माननीय मुख्यमंत्र्यापासून सर्व प्रमुख मंडळींनी उपस्थित रहावे. आणि मग त्यांनी यासंदर्भातील आपापल्या भूमिका मांडाव्यात. सभापती महोदय, तशा प्रकारची संधी उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मी याठिकाणी विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल सुरुवातीलाच मी आपल्याला धन्यवाद देतो. या ठिकाणी शैक्षणिक धोरणावर अत्यंत महत्वपूर्ण चर्चा चालू आहे आणि या शैक्षणिक धोरणामधील जो केंद्रबिंदू आहे तो विद्यार्थी आहे. या विद्यार्थ्यांना डोळ्यासमोर ठेऊन आपण शैक्षणिक धोरण, प्रवेश पध्दती, परीक्षेची पध्दत ठरविणे मोलाचे आणि महत्वाचे असते. बालक, शिक्षक, पालक आणि संचालक या सगळ्यांनी एकत्रित येऊन शैक्षणिक धोरण बाहेर येणे गरजेचे आहे. एसएससी बोर्ड असेल किंवा आयसीएसई असेल किंवा सीबीएसई असेल त्या ठिकाणी जी काठिण्य पातळी आहे त्याचा विचार केला तर आयसीएसई आणि सीबीएसईमध्ये काठिण्य पातळी एसएससी बोर्डापेक्षा जास्त आहे. त्याचा निकष विद्यार्थी लावत असतो. मला कोणत्या शाळेमध्ये प्रवेश घ्यावयाचा आहे हे विद्यार्थी आणि पालक ठरवितात. एसएससी बोर्डात प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्यासाठी ते तयार होतात. आयसीएसई असेल तर त्या ठिकाणी प्रवेश घेण्यास ते लवकर तयार होत नाहीत. कारण आपली कॅपॅसिटी काय आहे हे त्याला माहीत असते. त्यामुळे प्रवेश देत असताना त्याला किती वेटेज द्यावयाचे आणि याला किती वेटेज द्यावयाचे यासाठी हा बेस्ट ऑफ फाईव्हचा तोडगा काढलेला आहे. त्यांच्यावरही अन्याय व्हावयास नको आणि एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांवर सुध्दा अन्याय व्हावयास नको. हा जो मार्ग सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे तो पुढच्या काळामध्ये परमनंट व्हावा अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, यातील दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे इयत्ता आठवीपर्यंत परीक्षेची आवश्यकता नाही असे या ठरावामध्ये आले आहे. खरे तर इयत्ता आठवीपर्यंत परीक्षा नाही असे सरकारचे धोरण नाही. प्रत्येक वर्गामध्ये परीक्षा घ्यावयास पाहिजे. पास किंवा नापास जाहीर करावयाचे आहे. फक्त त्यांना त्याच वर्गात न ठेवता वरच्या वर्गात टाकावयाचे आहे. जे नापास झालेले आहेत त्यांच्यासाठी वेगळे कष्ट घेऊन, जादा तास घेऊन को-लॅटरल, लॅटरल एज्युकेशन देऊन त्यांना स्पर्धेमध्ये आणण्याचे शासनाचे धोरण आहे. आपण हे धोरण सोडले अशी परिस्थिती नाही. परीक्षाच नसतील तर शिक्षकांचे मूल्यमापन कसे करणार ? त्यांनी सिलॅबस पूर्ण केले की नाही आणि जर पूर्ण केले नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न येतो. म्हणून त्या ठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

डॉ. वसंत पवार .....

परीक्षा आहे हे आपण समाजाला समजावून सांगणे, त्यांना पटवून देणे गरजेचे आहे. परीक्षा घ्यावयाची आहे आणि परीक्षेमध्ये जरी ते नापास झाले तरी त्यांना वरच्या वर्गात पाठवावयाचे आहे. आपल्या सभागृहाने जास्तीत जास्त काळजी काय घ्यावयास पाहिजे ? सिलॅबस तयार करण्याचे काम शिक्षण तज्ज्ञ करीत असतात. जे ड्रॉप आऊट आहेत. जे शाळेमध्ये जात नाहीत त्यांच्याकडे कसे जास्तीत जास्त लक्ष देता येईल याची काळजी आपल्या सभागृहाने घेणे गरजेचे आहे. आपण आमदार म्हणून या सभागृहामध्ये आलो की, आपल्याला मराठीचे प्रेम येते. मात्र घरी पाहिले तर आपली मुले इंग्रजी माध्यमामध्ये शिकतात. आपली मुले इंग्रजी माध्यमामध्ये शिकावयास जात असताना या ठिकाणी आपले भाषण मराठीच्या बाजूने चालू असते. हे आपण टाळणे गरजेचे आहे. सगळ्या राजकारणी लोकांनी हा जो ढोंगीपणा आहे तो टाळल्याशिवाय उपयोगाचे नाही. आपल्या मुलाची काय कॅपॅसिटी आहे हे पालक बघतो. ते इंग्रजी माध्यमामध्ये जात नाहीत तसेच मराठी माध्यमामध्येही जात नाहीत. आता जो सेमी इंग्रजी कोर्स काढलेला आहे त्याचे डिव्हीजन चालू करावेत असा ग्रामीण भागातील पालकांचा आग्रह आहे. कारण या ठिकाणी इंग्रजीची गरज आहे, संगणकाची गरज आहे. आपल्याला पुढे जावयाचे असेल तर मराठी पाहिजे परंतु त्याचा अर्थ इंग्रजी नको, संगणक नको असा जो गैरसमज आहे तो काढून टाकणे गरजेचे आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, आपण जे काही धोरण ठरविणार ते ठरविताना विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या हिताचे धोरण आपण घ्यावे. अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : या प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे आता संपलेली आहेत. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर दुपारच्या सत्रामध्ये होईल.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.30 ते 1.00 पर्यंत स्थगित झाली. )

-----

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील हिंन्दू व जैन धर्मियांची मंदिरे शासनाच्या अधिपत्याखाली आणण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१) * ७५८७ डॉ.निलम गोऱ्हे , डॉ.दीपक सावंत , श्री.किरण पावसकर , श्री.रामदास कदम :** सन्माननीय **विधी व न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हिन्दू व जैन धर्मियांची सुमारे दोन लाख मंदिरे पब्लिक ट्रस्टच्या माध्यमातून शासनाच्या अधिपत्याखाली आणण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ती कोणती मंदिरे आहेत, तसेच सदर प्रस्ताव तयार करण्याची खास अशी काही कारणे आहेत काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाला हिन्दू व जैन धर्मियाच्या मंदिरे व्यवस्थापकांनी सक्त विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावामुळे राज्य शासन हिन्दू व जैन धर्मियांच्या धार्मिक भावना दुखावित असून शासनाच्या अधिपत्याखाली मंदिरे व्यवस्थापन आणल्यास गैरकारभार व भ्रष्टाचारास चालना मिळेल, हे ही खरे आहे काय ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. नीलम गो-हे : हा प्रश्न विचारण्याचा उद्देश असा आहे की, विधी व न्याय विभागाचे माननीय मंत्री महोदय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी महाराष्ट्रातील मंदिरे पब्लिक ट्रस्टच्या माध्यमातून शासनाच्या अधिपत्याखाली आणण्यासंबंधीचे विधान केले होते. महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणच्या मंदिरामध्ये गैरव्यवहार चालू आहेत. शिर्डीचे साईबाबा संस्थान, सिद्धीविनायक मंदिरे यांच्यासाठी वेगवेगळे कायदे करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे वेगवेगळे कायदे करण्यापेक्षा सर्व मंदिरांचे व्यवस्थापन सुधारण्याच्या दृष्टीकोनातून कायदा करण्यासंबंधीचे विधान माननीय मंत्री महोदयांनी केल्याचे माझ्या वाचनात आले. त्यानंतर सन्माननीय मंत्री महोदयांनी, असा काही विचार नाही असे सांगितले. प्रश्न असा आहे की, आजच्या आणि पुढच्या काळामध्ये शासनाची भूमिका काय राहाणार आहे ? मंदिरामध्ये जात असताना जोडे घालून जाऊ नये अशी आमची भूमिका आहे. तेव्हा याबाबतीत शासन आपली भूमिका स्पष्ट करील काय ?

==२==

ता.प्र.क्र.7587....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सर्वसाधारणपणे अनौपचारिकपणे एखादा विषय मांडत असताना त्यामध्ये शासनाची म्हणून भूमिका मांडली जात नाही. प्रसार माध्यमाकडून तशा प्रकारचा उल्लेख झाला असेल तर त्यासंदर्भात खुलासा करण्याची जबाबदारी ही त्या खात्याचा मंत्री म्हणून माझ्यावर येते. अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव राज्य शासनापुढे नाही. अनेक सन्माननीय सदस्य मला भेटत असतात, अनेक भागातील लोक मला येऊन भेटत असतात. मंदिर व्यवस्थापनाच्या संदर्भात धर्मादाय आयुक्त स्तरावर अनेक वर्षे प्रकरणे प्रलंबित आहेत. चेंज ऑफ रिपोर्ट लवकर मंजूर होत नाही. या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की तामिळनाडूमध्ये आंध्रप्रदेशमध्ये ज्याप्रमाणे इण्डाऊमेण्ट ॲक्ट आहे त्याप्रमाणे आपल्या राज्यात एखादा कायदा करण्याचा विचार करायला काय हरकत आहे ? मी त्यावेळी सांगितले की आपण तामिळनाडू आणि आंध्रप्रदेशमध्ये काय आहे हे तपासून पाहू. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे मंदिरांचे सरकारीकरण करण्याचा कोणताही प्रस्ताव आमच्याकडे नाही.

डॉ. दीपक सावंत : राज्यातील बहुतांश सर्व मंदिरामधून मग ती हिंदुची मंदिरे असोत वा जैनांची मंदिरे असोत, दानपेटीच्या माध्यमातून करोडो रुपये जमा होत असतात. या पैशाचा विनियोग करण्याची एक पध्दत आहे. काही मंदिरांची व्यवस्थापने शिक्षणासाठी, ऑपरेशन्ससाठी पैसे देतात. पण याबाबतीत कोणतीही सुसूत्रता नाही. कोणत्या ऑपरेशनसाठी आणि कोणत्या शिक्षणासाठी किती पैसे द्यायचे हे त्या त्या मंदिराची ट्रस्ट ठरविते. माझ्या माहितीप्रमाणे ट्रस्टकडे जो निधी जमा होईल त्यातील फक्त ३० टक्के रक्कम वापरायची अशा प्रकारचा दंडक राज्य शासनाने घातलेला आहे. त्यामुळे गरजू लोकांचे शैक्षणिक आणि आरोग्यदृष्टया नुकसान होत आहे. तेव्हा या बाबतीत शासन पूर्वीचीच भूमिका अंगिकारणार आहे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : ज्या सेवाभावी संस्था काम करतात त्यांना धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीने खर्च करण्याची परवानगी दिली जाते.

..नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7587........ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

सन्माननीय सदस्यांचा सिध्दीविनायक मंदिरापुरता मर्यादित मुद्दा दिसून येतो. त्या मंदिराच्या खर्चाबाबत मर्यादा घातलेली आहे. एकूण उत्पन्नाच्या किती टक्के खर्च करावा याचे निकष तयार केलेले आहेत. मध्यंतरीच्या काळात 30 टक्क्याऐवजी 50 टक्के खर्च करण्यास मुभा द्यावी, जेणेकरुन गरजू रुग्णांना फायदा व्हावा असा प्रयत्न सुरु होता. परंतु काही प्रकरणे न्यायालयात दाखल झाली. या संदर्भात ॲडव्होकेट जनरल यांचे ओपीनियन प्राप्त झालेले आहे. परंतु न्यायालयाने सांगितले की, स्टेक होल्डर्सची बैठक घ्यावी. खर्चाची मर्यादा वाढविण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अशा प्रकारचे वक्तव्य किंवा विचार दोन कारणांमुळे पुढे येत आहे. एक म्हणजे त्या त्या ट्रस्टचे अध्यक्षपद, आघाडी, युती, निधीचे वाटप हा मुद्दा आहे. यातील राजकीय भाग सोडून द्यावा. परंतु 13 व्या व 15 व्या लॉ कमिशनने या गोष्टींचा उल्लेख केला आहे. अशा प्रकारची देवस्थाने सरकारने ताब्यात घेतली पाहिजेत असे सांगताना लॉ कमिशनने महाराष्ट्रातील मंदिरांचा रेफरन्स कमी प्रमाणात घेतला आहे. प्रामुख्याने उत्तर व दक्षिण भारतातील मंदिराचा अधिक परामर्श घेतला आहे. महाराष्ट्रात कोट्यवधी रुपयांचा निधी जमा होणाऱ्या मंदिरांची संख्या 70-80 पेक्षा अधिक नसावीत. कोकणातील मंदिरांचा कारभार हा ग्रामस्थांकडूनच निधी गोळा करुन चालविला जातो. लॉ कमिशनने अहवालात जे म्हटले आहे त्याची महाराष्ट्रात गरज नाही अशी भूमिका सरकार जाहीर करणार आहे का?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, लॉ कमिशनच्या अहवालाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी काही उल्लेख केला आहे. चार-पाच वर्षापूर्वी लॉ कमिशनने अहवाल सादर केल्यानंतर चर्चा झालेली होती. परंतु याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. मुळात सरकारची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. कोणताही हस्तक्षेप करण्याचे किंवा मंदिरे ताब्यात घेण्याचे सरकारचे धोरण नाही. 1936 ते 38 च्या काळात तत्कालीन मंत्री आणि नंतर केंद्रीय मंत्री असलेले डॉ.पंजाबराव देशमुख यांनी प्रथम मागणी केली होती. काळाच्या ओघात मंदिरांचा विस्तार होत गेला. वेगवेगळ्या समाजाचे प्रश्न निर्माण झाले. या राज्यात चार-पाच प्रकारची क्लासिफिकेशन्स आहेत. ए, बी, सी आणि डी अशाप्रकारे हिंदू, पारशी, ख्रिश्चन, मुस्लिम समाजाची धार्मिक स्थळे आहेत. आज निर्णय घ्यायचा आणि उद्या कार्यवाही करायची इतकी ही सोपी बाब नाही. या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7587........ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

संदर्भात सरकारची भूमिका स्पष्ट आहे. ज्याचे त्याचे व्यवस्थापन त्यांनी करावे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे यावर नियंत्रण असले पाहिजे. परंतु त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. आज या राज्यातील ट्रस्टची संख्या जवळपास 50 हजार इतकी आहे. म्हणजे 50 हजार ट्रस्ट रजिस्टर्ड झालेली आहेत. यांच्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता व्यवस्था अधिक बळकट व सक्षम करण्यासाठी प्रयत्न करु.

श्री.सय्यद ज़मा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने कहा कि हमारे देश के संविधान में मंदिरों के कामकाज में कोई दखलंदाजी करने का प्रावधान नहीं है. दखलंदाजी करना या न करना, जैसा उन्होंने कहा कि सरकार का हस्तक्षेप नहीं है. सही बात है. मंत्री जी ने यह भी बताया कि, महाराष्ट्र में जितने भी धार्मिक स्थल है, वे किसी भी धर्म के हो, उनके कामकाज में दखलंदाजी नहीं करेंगे, उनका व्यवस्थापन उस उस धर्म के लोग करें. उन्होंने यह भी बताया कि राज्य में 50 हजार ट्रस्ट रजिस्टर्ड है. लेकिन बहुत सारे ऐसे भी धार्मिक स्थान है, जो रजिस्टर्ड नहीं है. लेकिन वे पैसा कलेक्ट करते हैं. इसलिए मेरा यह सुझाव है कि धर्म स्थलों के लिए एक कामन लॉ बना करके उनको रेगूलेट किया जाए. क्या इस प्रकार का कानून बनाया जाएगा ?

दूसरा मेरा यह प्रश्न है कि अगर वे धार्मिक स्थल फाईनानशियल डीलिंग करते हैं तो उस स्थिति में उन्हें एकाउण्टेबल बनाने के लिए कोई व्यवस्था हो. जैसे वक्फ़ की प्रापर्टी की व्यवस्था को देखने के लिए वक्फ़ बोर्ड है, उसी प्रकार से बाकी जो धार्मिक स्थल है, क्या उनके लिए इण्डॉमेंट के संबंध में कोई कानून बनाया जाएगा ताकि वे नियम के अनुसार काम करें ?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7587..........

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. किरण पावसकर : महोदय, राज्यभरातील एकूण 2 लाख मंदिरे नियंत्रणात आणण्यासंबंधीचा प्रस्ताव नसल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. भविष्यात काही कारणास्तव असा प्रस्ताव आलाच तर त्यात चर्च आणि मशिदी यांचाही समावेश करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, हे हायपोथिटिकल कन्सिडरेशन आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जो प्रस्ताव नसल्याचे सांगितले त्यामध्ये मशिदी आणि चर्च यांचा समावेश होता काय असे सन्माननीय सदस्यांना जाणून घ्यावयाचे आहे.

**उपसभापती** : अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय सदस्यांना विचारावयाचा असेल तर तो अगोदरच लिहून पाठवावा, अशी सन्माननीय सदस्यांना सूचना आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वृध्द कलावतांचे मानधनाबाबतचे फेटाळण्यात आलेले प्रस्ताव**

**(2) *7451 श्री.सुभाष चव्हाण, प्रा.सुरेश नवले, श्री.राजन तेली, श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अरुणकाका जगताप** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्गातील वृध्द साहित्यिक कलावतांच्या मानधनासाठी आलेल्या एकूण 601 प्रस्तावांपैकी 134 प्रस्ताव मंजूर करुन 467 प्रस्ताव फेटाळण्यात आले आहेत, कलावतांच्या मानधनासाठी आलेल्या 602 वृध्द कलावंताना शासनाकडून वेळेवर अनुदान मिळाले नसल्याने गेल्या काही वर्षापासून मानधनाच्या प्रस्तावाची वाढती संख्या पाहता शासनाने लाभार्थ्यांचे उद्दिष्ट वाढवून द्यावे अशी मागणी माहे मे, 2010 मध्ये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या योजनेचे उद्दिष्ट वाढवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(3) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता : (1) नाही.**

(2) यापूर्वी प्रति जिल्हा 40 कलाकाराची संख्या होती ती चालू आर्थिक वर्षात 60 कलाकार इतकी संख्या वाढविण्यात आलेली आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. परंतु मी प्रश्न मात्र "सिंधुदुर्गातील वृध्द साहित्यिक कलावंतांच्या मानधनासाठी आलेल्या एकूण 601 प्रस्तावांपैकी 134 प्रस्ताव मंजूर करुन 467 प्रस्ताव फेटाळण्यात आले आहेत. कलावंतांच्या मानधनासाठी आलेल्या 602 वृध्द कलावंतांना शासनाकडून वेळेवर अनुदान मिळाले नसल्याने गेल्या काही वर्षापासून मानधनाच्या प्रस्तावाची वाढती संख्या पाहता शासनाने लाभार्थ्यांचे उद्दिष्ट वाढवून द्यावे अशी मागणी माहे मे, 2010 मध्ये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय ?" असा विचारलेला आहे. या प्रश्नात कदाचित विचारलेले आकडे चुकीचे असतील परंतु संपूर्ण प्रश्न चुकीचा नाही. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये कलेला प्रोत्साहन देणे हे शासनाचे धोरण आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गरीब लोकांकडून दशावतारीसारखे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर सादर केले जातात. आपण जी आकडेवारी येथे दिली आहे त्यानुसार 40 कलाकारांच्या संख्येत वाढ

....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7451.......... श्री. सुभाष चव्हाण .....

करुन 60 कलाकारांना हे मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आपण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतारी नाटकांची शिरगणती केली आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" यासाठी दिलेले आहे की, एकूण 641 अर्जांची संख्या आहे व त्यापैकी 640 अर्ज अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे आहेत.......

श्री. भाई जगताप : महोदय, माननीय मंत्री महोदया यांनी आता जे उत्तर दिले ते अगोदरच सांगितले असते किंवा उत्तरातच नमूद केले असते तर पुढील प्रश्न उदभवलेच नसते. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे.

प्रा. फौजिया खान : दुसरा प्रश्न सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कलाकारांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. या अनुषंगाने मी असे सांगू इच्छिते की, शासनाने कलावंतांच्या मानधनाच्या बाबतीत वेळोवेळी व आवश्यकतेनुसार बदल केले आहेत. त्यानुसार सन 2005 ते 2010 या कालावधीत प्रत्येक जिल्ह्यातील कलाकारांची संख्या 40 ठरविण्यात आली होती. आता हे सुवर्ण महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून या संख्येत वाढ करुन ती 60 करण्यात आली आहे. या अनुषंगाने राज्याच्या बजेटमधील समान वाटा सर्व जिल्ह्यांना आपण देण्याचे धोरण आखले आहे. तसेच जिल्हा स्तरावर ज्या समित्या आहेत त्यांनाच हे अधिकार देण्यात आले असून त्या समित्यांच्या माध्यमातूनच त्या त्या जिल्ह्यातील 60 कलाकारांची निवड करण्यात येते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7451....

श्री. संजय केळकर :सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये सुध्दा चर्चा उपस्थित झाली होती. "अ", "ब" आणि "क" अशा ग्रेडेशनमध्ये सन 2007-2008 मध्ये 500 रुपये, 600 रु. आणि 700 रु. देण्याचा निर्णय घेतला होता. हे पैसे जाण्यायेण्यासाठीच खर्च होत होते. त्यानंतर शासनाकडून सन 2008-2009 मध्ये या कलाकालारांचे मानधन 1000,1200 आणि 1400 रुपये करण्यात आले. हे तुटपुंजे अनुदान कलाकारांना खेटे मारण्यामध्येच खर्च होतो. या कलाकारांना चेकने पेमेंट केले जाईल, असे शासनाच्या वतीने सांगण्यात आले होते. त्यामुळे शासनाने या कलाकारांना चेकने पेमेंट देण्याचे सुरु केलेले आहे काय, चेकने पेमेंट सुरु झाले नसेल तर ते कधी सुरु केले जाणार आहे ? आपण 134 प्रस्ताव मंजूर केलेले आहेत परंतु प्रत्येक जिल्हयातील 60 कलाकारांनाच मानधन देणार आहात, असे आपण सांगितलेले आहे. 134 जे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत त्या 134 जणांना आपण मानधन देणार आहात काय ? आपण फक्त एका जिल्हयातील 60 कलाकारानांच मानधन देणार आहात काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात हा विषय जेव्हा उपस्थित झाला होता त्यावेळी जिल्हा को-ऑपरेटीव्ह बँकेतून कलाकारांना मानधन दिले जात होते. परंतु आता मानधन मिळण्यास विलंब होऊ नये यासाठी नॅशनलाईज्ड बँकेतूनच या कलाकारांना मानधन दिले जावे, असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.तसेच आपण जिल्हयातून 60 कलाकारांना पात्र ठरवलेले आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, गरीब कलाकारांच्या दृष्टीने सभागृहाने अनेक वेळा निर्णय घेतलेले आहेत.या प्रश्नाच्या संदर्भात माझे सजेशन आणि प्रश्न असा आहे की, कलाकारांना आपण जिल्हा स्तरावरील नॅशनलाईज्ड बँकेतून मानधन उपलब्ध करुन देणार आहात परंतु या कलाकारांना तालुका स्तरावरील नॅशनलाईज्ड बँकेतून मानधन उपलब्ध करुन दिले जाणार आहे काय ? प्रत्येक जिल्हयाचे ठिकाण हे गावापासून किंवा तालुक्यापासून 50-60 कि.मी. अंतरावर असते. आमच्या कोकणातील जिल्हे 150-200 कि.मी. अंतरावर आहेत. या कलाकारांचे मानधनाचे पैसे जाण्यायेण्यामध्येच खर्च होतात अशी सर्व सन्माननीय सदस्यांची भावना आहे. त्यामुळे या कलाकारांना तालुका पातळीवरील नॅशनलाईज्ड बँकेतून चेकने मानधन दिले जाईल काय ?

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7451....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना चांगली असून या सूचनेचा जरुर विचार करण्यात येईल. या सूचनेची अंमलबजावणी करणे शक्य झाले तर त्याप्रमाणे मानधनाचे वाटप करण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सिंधुदुर्गच्या वृध्द साहित्यिक कलावंताच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. आपण उत्तरात असे म्हटले आहे की, यापूर्वी प्रती जिल्हा 40 कलाकारांची संख्या होती ती चालू आर्थिक वर्षात 60 कलाकार इतकी संख्या वाढविण्यात आली आहे." आपल्याकडे 613 प्रस्ताव आलेले आहेत, हे सुध्दा आपण मान्य करीत आहात. वृध्द, साहित्यिक कलांवतांना आपण जे मानधन देत आहात ते औषधपाण्याला देखील पुरणार नाही एवढे कमी मानधन आपण या कलाकारांना देत आहात. हा कलाकार माझ्या जिल्हयाचा आहे असे त्या जिल्हयातील लोकांना वाटत असते.आपण 40 आणि 60 अशी लिमिटेशन घालून वृध्द कलावंतांना आपण असे सुचवता आहात काय की, तुमचा या कोटयात नंबर लागत नाही म्हणून ज्या जिल्हयात कमी कलावंत आहे तिकडे जाऊन तुम्ही स्थायिक व्हा.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.7451 ....

श्री.किरण पावसकर...

नवीन प्रस्ताव देऊन वृद्ध कलावंतांची मानसिकता बदलत आहे. ठाणे,पुणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जास्त प्रमाणात कलावंत आहेत. ज्या जिल्ह्यांमध्ये जास्त कलावंत आहेत तेथे शासन कला जोपासण्याचे काम करणार आहे की नाही ? ज्या जिल्ह्यामध्ये कलाकारांची संख्या जास्त आहे तेथील कलाकांराना शासन संख्येने कमी असलेल्या दुसऱ्या जिल्ह्यामध्ये जावे असे सांगणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून निकषासंबंधी सूचना आली आहे. यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, अभ्यास करून निकष बदलण्याबाबत शासन नक्की विचार करेल. निवड समितीमध्ये कोण असावे, कलाकांराना मानधन किती द्यावे याचा देखील विचार करण्यात येईल. सध्या मानधनासाठी मागणी जास्त आहे.

श्री.किरण पावसकर : माननीय मंत्रिमहोदय आपण वृद्ध कलाकारांना मानधन देण्यासंबंधी बोलत आहात.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, महिला कलावंताची वयोमर्यादा 45 वर्षे व पुरूष कलावंताची मर्यामर्यादा 50 वर्षे आहे. जिल्हा स्तरावर खरे कलावंत कोण हे आता ठरवावे लागेल. काही ठिकाणी मानधन देण्याबाबत चुकीचे निर्णय होत आहेत. त्यामुळे मानधनाचे निकष कडक असणे आवश्यक आहे. योग्य व लायक कलावंताला मानधनाचा लाभ मिळावा म्हणून प्रक्रियेसंबंधातील जे काही निकष आहेत त्याचा अभ्यास करण्यात येत आहे. तो पूर्ण झाल्यानंतर शासन यासंबंधी लवकरात लवकर निर्णय घेईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, वृद्ध कलावंताना मानधनासाठी अनेक वेळा खेटा घालाव्या लागतात असे सांगण्यात आले. त्यांना 30 ते 40 कि.मी.अंतरावरून अर्ज आणावा लागतो. त्यामुळे शासन ही प्रक्रिया ऑनलाईन करणार आहे काय ? आज गावांमध्ये वृद्ध कलावंतांना सहाय्य करणारी अनेक तरूण मुले आहेत. ते त्यांना ऑन लाईन फॉर्म भरण्यासाठी मदत करतील. मानधन चेकने देण्यात येणार आहे. पेन्शनधारकारकांना ECS द्वारे मदत दिली जाते. त्याप्रमाणे वृद्ध कलावंताना ECS द्वारे मानधन देण्याबाबत शासन विचार करेल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7451 ....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, वृद्ध कलावंतांनी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडल्यानंतर त्यांना चेकद्वारे मानधन देण्यास सुरूवात झाल्यानंतर या सूचनेचा विचार करता येईल.

**उप सभापती** : मी या निमित्ताने एवढे सांगेन की, सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत त्या विचारात घेऊन जो प्रस्ताव आपण करणार आहात त्यात या सूचनांचा अतर्भाव करावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, निकष कधी बदलणार आहेत, कमिटी कधी नेमणार आहे याबाबत शासनाकडून काहीच उत्तर मिळत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी प्रश्नावर बोलत आहे. 467 प्रस्ताव फेटाळण्यात आले आहेत. त्याची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा जिल्हा स्तरावरच्या समितीचा निर्णय आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सदर प्रस्ताव फेटाळण्याची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ती कारणे मी पटलावर ठेवते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कारणे अशी आहेत की, वृद्ध कलावंतांनी भरलेले फॉर्म परिपूर्ण नव्हते. वृद्ध कलावंतांना फॉर्म भरता येत नाही. तो कसा भरावा हे त्यांना माहिती नाही. परिपूर्ण फॉर्म भरले नसल्यामुळे ते नाकारण्यात आले हे अत्यंत वाईट आहे.

श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7451....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

श्री.विनोद तावडे : वृध्द कलावंताचा अपमान करु नका..

**उपसभापती** : मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा अंतर्भाव आपल्या प्रस्तावात करावा...

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सन्माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी एक बैठक घेण्याची तयारी दर्शविली आहे. या बैठकीत विभागाचे अधिकारी देखील हजर राहतील. वेगवेगळ्या जिल्ह्यात योग्य,अयोग्य निर्णय झाले असतील तेव्हा यासंदर्भात एक बैठक घेऊ (अडथळा).... ही बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील कौटुंबिक न्यायालयातील न्यायाधीशांच्या रिक्त पदांबाबत**

**(3) * 7209 श्री.मोहन जोशी , श्री.सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.एम.एम.शेख** : सन्माननीय **विधी व न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे येथील कौटुंबिक न्यायालयातील प्रलंबित खटल्याची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली असूनही मागील काही वर्षापासून न्यायाधीशांची काही पदे रिक्त असल्याने प्रलंबित खटल्यांची 30 हजाराहून अधिक संख्या असल्याचे माहे मार्च, 2010 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, खटले लवकरात लवकर निकालात काढण्यासाठी, न्यायाधीशांची रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उपस्थित होत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, या विभागाचे मंत्री अतिशय कार्यक्षम आहेत. परंतु याठिकाणी देण्यात आलेले उत्तर चुकीचे आहे. माननीय मंत्रिमहोदयांना अधिकारीवर्ग चुकीची माहिती देतात हा मुद्दा सभागृहात अनेकवेळा उपस्थित झालेला आहे. मी प्रश्न विचारला होता की, गेल्या अनेक महिन्यांपासून न्यायाधीशांची दोन पदे रिक्त आहेत आणि त्यामुळे हजारो केसेस पेडींग आहेत काय ? या प्रश्नाचे उत्तर "हे खरे नाही" असे दिलेले आहे. कौटुंबिक न्यायालयातील एका न्यायाधीशाची बदली होऊन ते पद अनेक दिवसांपासून रिक्त आहे. हे पद केव्हा भरण्यात येणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा की, गेल्या 25-30 वर्षापासून हे कौटुंबिक न्यायालय अतिशय अरुंद जागेत चालविले जात आहे. न्यायालयासाठी नवीन जागा प्रस्तावित केलेली आहे.परंतु अजूनपर्यंत कामास सुरुवात झालेली नाही. कामाचे भूमिपूजन झालेले नाही. त्याठिकाणच्या वकिलांना व पक्षकारांना बसण्यासाठी जागा नाही. कौटुंबिक न्यायालयामध्ये महिला मोठ्या प्रमाणावर येत असताना त्यांच्यासाठी स्वच्छतागृहाची सोय नाही. तेव्हा नवीन कौटुंबिक न्यायालय इमारतीच्या बांधकामास केव्हा सुरुवात करणार आहात ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7209...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता की, कौटुंबिक न्यायालयात 30 हजारहून अधिक फॅमिली मॅटर्स पेंडींग आहेत काय, त्याबाबत सांगू इच्छितो की, जून 2010 अखेरपर्यंत एकूण 5516 खटले न्यायालयात प्रलंबित आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7209 श्री.भास्कर जाधव...

त्या ठिकाणी पाच न्यायाधीशांचे पॅनल नियुक्त करण्यात आलेले आहे आणि जून 2010 पासून त्यापैकी एका न्यायाधीशाचे पद रिक्त आहे. या पूर्वी चीफ जस्टीस कॉन्फरन्स भरली होती त्यामध्ये असे ठरविण्यात आले होते की, 1200 खटल्या मागे एक न्यायाधीश असावा.पुण्यातील कौटुंबिक न्यायालयामध्ये 5 हजार 516 खटले प्रलंबित आहेत व त्या ठिकाणी चार न्यायाधीश आहेत याचा विचार करता 1000 किंवा 1200 खटल्यामागे एक न्यायाधीश त्या ठिकाणी आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे दोन न्यायाधिशांची पदे रिक्त आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते परंतु तशी वस्तुस्थिती नाही.

श्री.मोहन जोशी (बसून) : दोन न्यायाधीशांची पदे रिक्त आहेत असे मी म्हटलेले नाही.

श्री.भास्कर जाधव : जून 2010 पासून पाच पैकी एक न्यायाधीशाची जागा रिक्त आहे हे मी मान्यच केलेले आहे.सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला होता की, 1998 सालापासून हे कौटुंबिक न्यायालय भाडयाच्या जागेमध्ये सुरु आहे आणि हे खरे आहे. आता कौटुंबिक न्यायालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम मंजूर करण्यात आले असून त्या कामाची अंदापत्रकीय किंमत 10 कोटी 13 लाख रुपये आहे.त्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पात 8 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून येत्या एक वर्षभरामध्ये या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल.

डॉ.नीलम गोऱ्हे: सभापती महोदय, कौटुंबिक न्यायालयाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी जी तांत्रिक माहिती दिलेली आहे ती योग्य आहे. परंतु त्या ठिकाणचा कारभार अत्यंत संवेदनहीन पध्दतीने चाललेला आहे याचा अनुभ्व त्या ठिकाणी गेलेल्या अशीलांना अनुभवायला येतो. कोर्टाच्या बाबतीत काही बोलले तर कोर्टाचा अवमान होत असतो तरी सुध्दा मला अत्यंत खेदाने नमूद करावयाचे आहे की,पुढची तारीख मिळविण्यासाठी देखील समुपदेशक आणि इतर कर्मचारी परित्यक्त्या महिलांकडून वेगवेगळया प्रकारच्या अपेक्षा असतात. तेव्हा माननीय मंत्री महोदय त्या कौटुंबिक न्यायालयात स्वत: भेट देऊन त्या ठिकाणी समुपदेशकाची किती पदे रिक्त आहेत त्या ठिकाणी कशा प्रकारचा कारभार चालतो ? याची पहाणी करणार आहेत काय ? उच्च न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयाचा कारभार कसा करावा याबाबतीत काही सूचना दिलेल्या आहेत. उदाहरणर्थ वकील नसतांनासुध्दा तेथे येणा-या व्यक्तीला अर्ज भरता आला पाहिजे. त्या ठिकाणी लहान लहान मुलाना घेऊन महिला येतात. त्या ठिकाणच्या कोर्टात जर एखाद्या महिलेला

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पोटगीची रक्कम मिळाली तर आजूबाजूला फिरणारे चोर हे पैसे घेऊन पळून जातात त्याचा पाठलाग करण्यासाठी तेथे पोलीस नसतात. कौटुंबिक न्यायालयाला माननीय मंत्री महोदय भेट देऊन त्यांच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती घेणार आहेत काय ? त्याचबरोबर पुण्यातील आमदार, वकील आणि या क्षेत्रातील व्यक्तींना बरोबर घेऊन या कार्यपध्दतीमध्ये कोणती सुधारणा करण्यात येईल यामध्ये माननीय मंत्री महोदय लक्ष घालतील काय ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील :सभापती महोदय, त्या ठिकाणी जागेची अडचण होती ही गोष्ट बरोबर आहे.आताच सन्माननीय राज्यमंत्र्यानी सागितले की, त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात येणार असून त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद देखील करण्यात आली आहे आणि 2012 पूर्वी या इमारतीचे काम पूर्ण व्हावे अशी अपेक्षा आहे.परंतु त्या ठिकाणच्या काही अडचणी बद्दल सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केला आहे. मी स्वत: तसेच सन्माननीय राज्यमंत्री त्या ठिकाणी जरुर भेट देईन तसेच ही भेट देत असतांना त्या शहरातील सन्माननीय सदस्यांना देखील बरोबर घेण्यात येईल. पोटगीचे अर्ज, मुलांचा ताबा, ताकीद देणे इत्यादी अडचणीच्या चार पाच प्रकाराच्या केसेस या कोर्टात चालतात व त्यासाठी या महिलांना त्या कोर्टात जावे लागते. ही गोष्ट खरी आहे. समाजातील काही जण त्यांचा गैरफायदा घेत असतात. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याबाबतीत शासन निश्चितपणे आवश्यक ती पावले उचलीन.

श्री.जयप्रकाश छाजेड :माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना असे सागितले की, पुण्याच्या कौटुंबिक न्यायालयामध्ये 30 हजार दावे प्रलंबित नाहीत परंतु 5 हजार दावे प्रलंबित आहेत. वर्षातून किती दाव्याच्या निकाल लागू शकतो ? आणि 5 हजार प्रलंबित असलेले दावे आणि नव्याने दाखल होणारे दावे याचा विचार करता किती वर्षात या दाव्यांचा आकडा शुन्य स्तरावर येईल?

नतर श्री.सरफरे`

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7209...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, न्यायालयीन प्रक्रियेमध्ये आपल्याला हस्तक्षेप करता येत नाही. परंतु हायकोर्टाला त्या संदर्भात एक्सपिडाईट करण्यासंदर्भात विनंती करु. यामध्ये परटेनिंग टू कॉज अशापध्दतीचे 2 हजार दावे आहेत. आणि ॲक्च्युअल सब्जेक्ट कॉज अशा पध्दतीचे 2019 दावे आहेत. या केसेसचा निकाल लवकरात लवकर लागला पाहिजे याकरिता न्यायाधीशांची सर्व पदे भरलेली असून त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात आली आहे. तसेच, त्याकरिता पायाभूत सुविधा व आवश्यक असलेले मनुष्यबळ देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी नवीन इमारतीमध्ये कार्यालय हलविण्यात येईल असे सांगितले आहे. त्याची निश्चित कालमर्यादा सांगण्यात येईल काय? त्याचप्रमाणे न्यायाधीशांच्या जागा भरणे महत्वाचे आहे त्याप्रमाणे कौन्सिलरच्या जागा आपण वाढविणार काय? त्याचप्रमाणे कौन्सिलरची कार्यकक्षा आपण वाढविली पाहिजे, त्यांनी होम व्हिजिट केली पाहिजे. कौन्सिलरचे प्रि-लिटीगेशन झाले पाहिजे. ज्याप्रमाणे आज एन.जी.ओ. कौटुंबिक सल्ला केंद्र चालवितात त्याप्रमाणे राज्य सरकारमार्फत प्रि-लिटिगेशन कौन्सिलिंग चालविले तर खऱ्या अर्थाने या कौन्सिलर्सचा अनेक लोकांचे संसार वाचविण्यासाठी उपयोग होईल. याचा आपण विचार करणार काय?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : माननीय सदस्य म्हणतात ती गोष्ट बरोबर आहे. अशाप्रकारच्या केसेसमध्ये कौन्सिलिंगची आवश्यकता आहे. तरीही आज आपल्याकडे कौन्सिलरची पदे रिक्त नाहीत. परंतु त्यांच्याकडून या गोष्टींची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता असल्यामुळे माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करण्यात येईल. सद्याची प्रचलित असलेली व्यवस्था अधिक सक्षमपणे कशी राबविता येईल यादृष्टीने कार्यवाही करु.तसेच, माननीय सदस्यांनी भाडयाच्या इमारतीबाबत प्रश्न विचारला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, भाडयाच्या इमारतीमध्ये राहण्याची मुदत 2012 पर्यंत आहे. तोपर्यंत नवीन इमारतीचे काम पूर्ण होऊन नवीन इमारतीमध्ये कार्यालय हलविले जाईल यासाठी शासन प्रयत्न करील.

**उपसभापती** : माननीय वनमंत्री डॉ. पतंगराव कदम साहेबांना काही सांगावयाचे आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र. 7209...

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मला माहिती द्यावयाची आहे. कै.रामराव आदिक हे विधी व न्याय विभागाचे मंत्री होते त्यावेळी त्यांनी व्यक्तिश: भारती विद्यापीठाला विनंती केल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीकरिता ही इमारत भाडयाने देण्यात आली. तेव्हापासून गेली 20 वर्षे त्या इमारतीमध्ये कार्यालय आहे. ते कार्यालय तेथून हलविण्याची कारवाई योग्यप्रकारे होत नसल्यामुळे आमची खूप अडचण होत आहे. त्यामुळे या कार्यालयाचा प्रश्न लवकरात लवकर निकालात काढण्याबाबत आपण मंत्रिमहोदयांना निदेश द्यावेत अशी विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गोवा आणि कर्नाटक राज्यातील गाड्यांनी लोह खनिजाची केलेली ओव्हरलोड वाहतूक**

**(४) * ७४९१ श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून लोह खनिज वाहतूक करण्याकरिता खाणीपासून रेडीपोर्टपर्यंत वाहतूक करण्याकरिता गोवा आणि कर्नाटक राज्यातले डंपर असतांना त्यांच्यावरती टू पॉईंटची कारवाई केलेली नाही, हे शिष्टमंडळाने निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खनिकर्म विभाग व रेडीपोर्ट यांच्याकडील वाहतूक पासाच्या नोंदीवरुन दिनांक १ मार्च, २०१० ते दिनांक ३१ मार्च, २०१० या काळात गोवा राज्यातील ५७२५ आणि कर्नाटक राज्यातील ३२५ गाड्यांनी वाहतूक केली असून सदर वाहतूक करतेवेळी १० टनी गाडीतून १७ ते २२ टन ओव्हरलोड वाहतूक केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे १५ दिवसात परराज्यातील ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या सुमारे ६००० गाड्या निदर्शनास आल्या असतील तर ८ महिन्यात किती वाहनानी वाहतूक केल्याची नोंद खनिकर्म आणि बंधा अधिकाऱ्यांकडे आहे,

(४) तसेच, मोठ्या प्रमाणात वाहतूक होवून शासनाच्या परिवहन कायद्यानुसार दंड रुपाने कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हा महसूल वसुल करण्याकरिता या परराज्यातील वाहनावरती न्यायालयात गुन्हे दाखल करुन टू पॉईंट कायद्यातंर्गत ओव्हरलोड वाहतूक केल्याबाबत दंड वसुलीची कारवाई केली जाणार आहे काय ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकरिता** : १) मा. लोकप्रतिनिधी व इतर यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग यांना दि.१९.०५.२०१० रोजी भेटून निवेदन दिले. तथापि, टु पॉईंटमध्ये चालणाऱ्या वाहनांवरील कारवाई डिसेंबर, २००९ पासून सुरु आहे.

२), ३) व ४) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सिंधुदुर्ग येथील वायुवेग पथकाने डिसेंबर, २००९ ते १७ एप्रिल, २०१० या कालावधीत गोवा राज्यातील ८५ ओव्हरलोड वाहने, २८ लोडबॉडी वाढवलेली वाहने व १२ लोडबॉडी आच्छादन न केलेली वाहने व ५५ टु पॉईंटमध्ये वाहतूक

DGS/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र. ७४९१...

करणारी वाहने अशा एकूण खनिज वाहतूक करणाऱ्या दोषी १८० वाहनावरती कारवाई करुन रुपये ८,२९,१५०/- इतका दंड वसूल केलेला आहे.

५) खनिज उत्खनन करणाऱ्या संबंधित कंपन्यांना मोटार वाहन कायद्यातील कलम १७९ मधील तरतुदीनुसार नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. जिल्हा खनिकर्म कार्यालयासह संबंधित कंपन्यांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर कायद्यांतर्गत नियमातील तरतुदीनुसार न्यायालयीन कारवाईव्दारे वसूलीची कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. परशुराम उपरकर :सभापती महोदय, टू पॉईंट कायद्यांतर्गत चालविण्यात येणाऱ्या वाहनांबाबत याठिक्‍ाणी प्रश्न विचारला आहे. या संदर्भात मी खनिकर्म विभागाकडून माहिती घेतली असता कर्नाटक व गोवा राज्यामधील वाहनांनी 15 दिवसांच्या कालावधीत 7 हजार फेऱ्या केल्या आहेत . या 7 हजार फेऱ्यांवर प्रति वाहन 2 हजार रुपये दंड लावला तर 15 दिवसात दीड कोटी रुपये जमा होऊ शकतात, आणि महिन्याला 3 कोटी रुपये जमा होऊ शकतात. अशाप्रकारे गेल्या सहा महिन्यामध्ये शासनाकडून हा दंड चुकविला गेला आहे. ही रक्कम वसूल करण्याकरिता प्रकरण न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यामुळे त्याकरिता आपण खास वकील नेमणार आहात काय? आणि ही वसूली करण्यासाठी गोवा व कर्नाटक राज्यातील डंपरवर आपण कारवाई करणार काय? लेखी उत्तरामध्ये डिसेंबर महिन्यापासून कारवाई सुरु असल्याचे म्हटले आहे. माझ्याकडे सन 2003 मधील पत्र असून सन 2003 मध्ये अशाप्रकारची कारवाई केली नव्हती. त्या संदर्भात आपल्याला शिष्टमंडळ भेटल्यानंतर कारवाई सुरु झाली हे खरे आहे काय?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7411...

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, टु पॉइंटच्या कायद्याच्या अंतर्गत जी वाहने चालतात त्याबाबतीत सन्मानीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. आतापर्यंत 55 वाहनांवर टु पॉइंटच्या कायद्यातंर्गत कारवाई केलेली आहे. याबाबतीत एकूण 8 लाख 29 हजार रुपये दंड वसूल केलेला आहे. 6000 वाहनांवर कारवाई करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबतीत खनिज उत्खनन करणाऱ्या कंपन्यांना मोटर वाहन कायदा कलम 179 मधील तरतुदीनुसार नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे किती ट्रिप्स टाकलेल्या आहेत याबाबतची माहिती जिल्हाखनिकर्म कार्यालय व कंपन्याकडून मागविण्यात आली आहे. ती माहिती आल्यानंतर निश्चितपणे त्यांना नोटिसा देऊन कायदेशीर कारवाई करुन दंड वसूल केला जाईल.

डॉ. दीपक सावंत :सभापती महोदय, खनिकर्म अधिकारी आणि परिवहन अधिकारी यांच्यामध्ये साटेलोटे असल्यामुळे हा सगळा व्यवहार चालतो हे शासनाला मान्य आहे काय? सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, कायद्यातील तरतुदीप्रमाणे आजपर्यंत किती वाहने जप्त करण्यात आली?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्मानीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सांगितलेले आहे की, काही दंडात्मक कारवाई झालेली आहे. ओव्हर लोडिंगचा प्रयत्न झालेला आहे. त्याबाबत दंड वसूल करणे, टॅक्सच्या मर्यादपर्यंत ती रक्कम वसूल करणे अशा प्रकारच्या कायद्यामध्ये तरतुदी आहेत. वाहन जप्त करण्याचा मुद्दा आहे पण यासंदर्भात वाहन जप्त करण्याच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष रक्कम वसूल करण्याच्या बाबतीत प्राधान्य दिलेले आहे.सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे यापूर्वी सूचना दिलेल्या आहेत. सावंतवाडीला अधिकाऱ्यांची बैठक झालेली आहे. नुकत्याच जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या त्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांना याबाबतीत अधिक कडक कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. खनिकर्म अधिकाऱ्याकडून डाटा उपलब्ध करीत असताना तो त्या कंपनीकडून घ्यावा लागेल. ओव्हर लोडिंगच्या गाडया लक्षात आल्यानंतर ती सगळी दंडात्मक रक्कम तातडीने वसूल करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत त्याचबरोबर गाडया जप्त करण्याच्या संदर्भातील कारवाई करावी लागली तरी ती करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबई शहरातील सागरी वाहतुक सुरु करण्याबाबत होत असलेला विलंब

**(५) * ७४७० श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते , श्री.चंद्रकांत पाटील :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी शहरात सागरी वाहतुक सुरु करणेबाबतचा प्रस्ताव गेली सहा वर्षे निविदा मंजूर होणाच्या प्रतिक्षेत आहे तसेच सदर निविदा प्रक्रियेला विभागातर्फे वारंवार मुदत वाढवून देत असल्यामुळे सदर जल वाहतूक सुरु होण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जल वाहतुकीस विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच मुंबई शहराच्या वाहतुकीतील महत्वाचा घटक असलेली जल वाहतुक त्वरीत सुरु होण्याच्या दृष्टीने प्रशासन कोणती कारवाई करणार आहे ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकरिता** : (१) व (२) मुंबईच्या पश्चिम किनाऱ्यावरील सागरी वाहतुक सुरु करण्यासाठी सन २००२ मध्ये निविदा मागविल्या होत्या. यशस्वी निविदाकाराने करारपत्रातील अटींची पूर्तता न केल्यामुळे निविदा फेब्रुवारी, २००७ मध्ये "रद्द" करण्यात आली.

त्यानंतर पुन्हा डिसेंबर, २००८ मध्ये निविदा मागविण्यात आल्या. निविदा स्विकृतीची अंतिम तारीख २१.६.२०१० होती. विहीत तारखेस उपरोक्त प्रकल्पासाठी एक निविदा प्राप्त झालेली आहे.

(३) दिनांक २१.६.२०१० रोजी निविदा प्राप्त झाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई शहरातील सागरी वाहतुकीच्या निविदा २००२ पासून निघत आहेत. आज २०१० आलेले आहे. सन २०१० ला जी निविदा आलेली आहे तिची कार्यवाही सुरु आहे. सभापती महोदय, यामध्ये अडचण अशी आहे की, आपले एक मंत्री रोज नवी मुंबईवरुन सागरी वाहतुकीने मुंबईत येतात. सन २००२ पासून २०१० पर्यंत काही ना काही कारणामुळे (अडथळा) ती कारणे काय आहेत हे आपल्याला माहीत आहेत.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7470... श्री. विनोद तावडे ...

मुंबईमधील वाहतुकीच्या समस्येवरचे मेजर उत्तर या सागरी वाहतुकीमध्ये आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. विखे-पाटील यामध्ये रस घेऊन काम करीत आहेत. माझा प्रश्न एवढाच आहे की, आता जी निविदा आलेली आहे त्याची कार्यवाही अजून काही गोष्टींसाठी थांबली आहे काय किंवा आपण ताबडतोब पुन्हा फेरनिविदा काढणार आहात काय किंवा आणखी कोणा नवीन माणसाला संधी द्यावयाची आहे काय ? किती दिवसात निविदा देऊन काम चालू होईल्.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, याबाबतीत महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून गव्हर्नमेंट सपोर्ट ॲग्रीमेंट आता एमएसआरडीसीला दिलेले आहे. वेस्ट कोस्ट ट्रान्सपोर्टचा जो वॉटर वे आहे त्याकरिता आपण त्यांना ते काम दिले आहे. ही गोष्ट खरी आहे की, एकदा दोनदा निविदा मागवून त्याला प्रतिसाद मिळाला नाही पण आता जी निविदा त्यांना प्राप्त झालेली आहे ती ओपन केलेली आहे. त्याची जी पहिली टेक्निकल बीड आहे ती झालेली आहे. आता दुसरी बीड होईल आणि त्यातून कमर्शियल ऑफर आल्यानंतर एमएसआरडीसीला खात्री वाटते की, यातून प्रत्यक्ष कार्यवाही होईल. ही बऱ्याच वर्षाची मागणी आहे. त्याचबरोबर ईस्ट कोस्टचे जे काम आहे ते एमएमआरडीएकडे देण्याचा निर्णय झालेला आहे. ईस्ट कोस्ट आणि वेस्ट कोस्ट या दोन्ही बाजूच्या वॉटर ट्रान्सपोर्टच्या बाबतीत कार्यवाही होईल्.

डॉ. दीपक सावंत : किती दिवसात कार्यवाही सुरु होणार ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, बीडची प्रोसेस सुरु आहे. मला असे वाटते की, पुढच्या तीन महिन्यामध्ये ही कार्यवाही सुरु होईल्. सक्सेसीव्ह बीड जर आली आणि ते सगळे निगोशिएशनवर अवलंबून आहे त्यामुळे आता अडचण येऊ नये असे मला वाटते्.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, जल वाहतूक हा अतिशय महत्वाचा आणि गंभीर प्रश्न मुंबईमध्ये आहे. यावर अनेक वेळा चर्चा झाली. आपण जेव्हा मेट्रोला मान्यता दिली, मोनोला मान्यता दिली त्यावेळी जल वाहतुकीच्या संदर्भात प्रामुख्याने चर्चा केली. जलवाहतूक हा जगभर सगळ्यात स्वस्त पर्याय आहे. बाकीचे सगळे जे पर्याय आहेत ते महाग आहेत हे जगभर सिध्द झालेले आहे. 2002 ते 2010 पर्यंत आपण आलो. माननीय मंत्रिमहोदय सक्षम आहेत याबद्दल दुमत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7470... श्री. भाई जगताप...

असण्याचे कारण नाही. यामध्ये कालबध्द कार्यक्रम पाहिजे. जर समजा या निविदेच्या बाबतीत काही झाले तर शासन यामध्ये पुढाकार घेणार आहे काय ? कारण जल वाहतूक ही काळाची गरज आहे आणि ती आपल्याला पूर्ण् करावी लागेल. नाही तर मुंबईवर जो ताण आहे तो कमी होणार नाही. हे अनेक वेळा आपण सिध्द केलेले आहे. किती कालावधीत या सगळ्या निविदेची प्रक्रिया होऊन हा प्रकल्प मार्गी लागेल ? जर प्रायव्हेटमधून हा प्रकल्प मार्गी लागला नाही तर शासन यामध्ये पुढाकार घेऊन ते करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट बरोबर आहे की, जल वाहतूक हा मुंबईच्या वाहतूक समस्येच्या संदर्भात अतिशय सक्षम आणि चांगला पर्याय आहे. म्हणूनच एमएमआरडीएने ईस्ट कोस्टमध्ये स्वत:च आता पैशाची गुंतवणूक करुन इन्फ्रॉस्ट्रक्चर म्हणजे पॅसेंजर टर्मिनल, लँडिंग जेटीज आहेत या पायाभूत सुविधांवरील जो खर्च शासनाने करावयास पाहिजे तो एमएमआरडीए आता करीत आहे. त्यामुळे ईस्ट कोस्टच्या बाबतीत काही अडचण येऊ नये. परंतु हा जो प्रश्न विचारलेला आहे तो वेस्ट कोस्ट बद्दलचा आहे. यामध्ये सुध्दा आता आपण एमएसआरडीसीला सुचविलेले आहे की, सगळे काही विकासकच निर्माण करील अशी स्थिती नाही. त्यांनी सुध्दा आता पॅसेंजर टर्मिनल किंवा जेटीज उभ्या करण्याच्या संदर्भात पुढाकार घेतला पाहिजे. यामध्ये जो काही वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेचा ट्राफीक आहे तसेच जेएनपीटीकडे जाणारी संपूर्ण् ट्रकची वाहतूक आहे ती अशा पध्दतीने घेऊन जाणे की ज्यामुळे मुंबईतील प्रदूषण कमी होईल, असे वेगवेगळे पर्याय आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सुचविल्याप्रमाणे आता शासन गंभीर आहे. या जल वाहतूक प्रकल्पाच्या बाबतीत निश्चितपणे आवश्यक ती सगळी मदत शासन करण्यास तयार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7470.....

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मुंबईच्या वाहतुकीचा प्रश्न गंभीर आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, शासन या प्रश्नाबाबत गंभीर आहे. परंतु त्यांच्या या बोलण्यामुळे त्याची प्रतिपूर्ती होणार नाही. मुंबईच्या रेल्वे गाडया माणसांनी कशा भरभरुन जातात, माणसे बाहेर लटकून प्रवास करतात. त्यामुळे अनेक प्रवाशांना अपघात होऊन मृत्यू होतो. याकडे शासनाचे बारकाईने लक्ष नाही. सभापती महोदय, एखाद्या कामाची निविदा उघडण्यासाठी 3 वर्षांचा कालावधी दिला जातो म्हणजे मुंबईकरांचा शासन अंत पहात आहे. प्रत्येक 6 महिन्यांनी ही जल वाहतूक सुरु होईल असे सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र जल वाहतूक सुरु झाल्याचे दिसत नाही. मुंबईची रेल्वे व रस्त्यावरील जी वाहतूक आहे ती संपूर्णपणे कोलमडून पडलेली आहे. त्यामुळे किमान ताबडतोबीने ठराविक कालावधीत मग 2 महिने, 3 महिने किंवा 6 महिने या कालावधीत जल वाहतूक सुरु होईल असे सांगावे. शासन गंभीर आहे असे सांगून हा वाहतुकीचा गंभीर प्रश्न सुटणार नाही. आपण खरेच गंभीर असाल तर कालावधी ठरवून ही जल वाहतूक सुरु केली जाईल काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीच माझ्या उत्तरात सांगितले आहे की, एमएसआरडीसीकडे प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या आहेत. परंतु फायनल बिडींग प्रोसेस होण्यासाठी किमान 3-4 महिने लागणार आहे. त्यांनी कालावधी निश्चित केलेला आहे. फर्स्ट बीड, सेकण्ड बीड, कमर्शिअल बीड यासाठी निश्चित कालावधी ठरलेला आहे. ईस्ट कोर्सच्या बाबतीत आता एमएमआरडीने पुढाकार घेतला असल्यामुळे ती कार्यवाही याच वर्षात पूर्ण करण्यासाठी पावले उचलली गेली आहेत. पुढच्या सहा महिन्याच्या कालावधीत वेस्ट कोर्सच्या बाबतीत अंतिम निर्णय एमएसआरडीसीकडून होणे अपेक्षित आहे. एमएमआरडीए कडून सुध्दा याबाबतीत प्रत्यक्ष कार्यवाही सुरु होईल अशी अपेक्षा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मुंबईत वाहतुकीची फार मोठी समस्या आहे. 2002 साली या कामाच्या निविदा काढल्या आहेत. परंतु मी या सभागृहात 1997 साली प्रश्न विचारला होता. या प्रश्नाची कधी उत्तरेच मिळाली नाहीत. हे काम जास्त नाही, केवळ धक्के बांधायचे आहेत. बोटी पाण्यात घालण्यासाठी रस्ता सुध्दा करावयाचा नसतो. त्यासाठी कालावधीची गरज नाही. एकूण किती बोटींच्या माध्यमातून जल वाहतूक सुरु होणार आहे, या बोटींच्या किती फे-या असणार आहेत, त्याचे बजेट किती असणार आहे, लोकांकडून किती चार्ज घेतला जाणार आहे ? हा प्रवास स्वस्त असावयास पाहिजे. अलिबागहून अर्ध्या तासामध्ये मुंबईला पोहोचता येते. दहिसरवरुन सुध्दा अर्ध्या-पाऊण तासात पोहोचू शकू. या कामासाठी टेक्निकल बीड आलेली आहेत, त्यांची नावे काय आहेत ? मागे मे.जोशी नावाच्या कंपनीने हे काम घेतले होते. त्या कंपनीने 10 वर्षे कामच केले नव्हते. म्हणून माझा प्रश्न आहे की, टेंडर भरलेल्या कंपन्यांची नावे काय आहेत ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या बीड प्रोसेसमध्ये कमर्शिअल बीड ज्यावेळी ओपन होईल त्यावेळी अंतिम निर्णय होईल. लोकांना स्वस्त दरामध्ये जल वाहतूक उपलब्ध करुन दिली नाही तर त्यांनाही ती परवडणार नाही. जास्त भाडे आकारुन वाहतूक सुरु करणे म्हणजे कमर्शिअल व्हायबल झाले पाहिजे. एक तर लोकांना ते परवडले पाहिजे आणि जादा खर्च न करता वाहतुकीसाठी जादा आकारणी न करता प्रवाशांसाठी ही जल वाहतूक पूरक ठरली पाहिजे यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे. मलेशियन कंपनीचे बीड आलेले आहे. या एकाच कंपनीकडून बीड आले असल्यामुळे प्रत्यक्षात कार्यवाही सुरु झालेली आहे.

----

3....



**मुंबईच्या शीव रुग्णालयात वॉर्डबॉयच्या चुकीमुळे एका रुग्णाचा झालेला मृत्यू**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(6) * 7336 श्री.हेमंत टकले , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , ॲड.गुरुनाथ कुलकर्णी , श्री.रमेश शेंडगे , ॲड. उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.अरुण गुजराथी , श्री.सतीश चव्हाण , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्रीमती अलका देसाई** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यकृताचा आजार असलेल्या कर्जत येथील रुग्णास दिनांक 3 मे, 2010 रोजी मुंबईच्या शीव हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता अर्धवट झोपेत असलेल्या वॉर्डबॉयने रुग्णाला मृत समजून रुग्णालयामध्ये नाकातोंडात कापूस घालून त्यास कपड्यात गुंडाळून ठेवल्याने त्याचा गुदमरुन मृत्यू झाल्याची घटना दिनांक 5 मे, 2010 रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (1) दिनांक 4.5.2010 रोजी लो.टि.रुग्णालयामध्ये मृत पावलेल्या रुग्णाबाबत पुरुष सफाईगार श्री.ललित पारकर याचा गैरसमज होऊन त्याने अन्य अत्यवस्थ रुग्णास शवागरात नेण्याची तयारी केली. तथापि, झालेली चूक लक्षात येताच मृत रुग्णाचेच शव शवागारात नेण्यात आले. त्यामुळे मृत रुग्णाऐवजी शेजारी उपचार घेत असलेल्या अत्यवस्थ रुग्णाला मृत समजून त्याच्या नाकातोंडात कापूस घालून कपड्यात गुंडाळून ठेवल्याने गुदमरुन त्या रुग्णाचा दिनांक 5 मे, 2010 रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

(2) व (3) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी केल्यानंतर श्री.ललित पारकर, पुरुष सफाईगार याला निलंबीत करुन प्रकरणाची सर्वंकष चौकशी महानगरपालिकेतर्फे सुरु आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न विचारताना एखाद्या हिंदी सिनेमाची आठवण व्हावी अशाप्रकारची परिस्थिती या रुग्णालयामध्ये असते की काय असा विचार मनात येतो. वास्तविक कोणताही प्रश्न सभासद विचारतात त्यावेळी स्पेसिफिक केसबाबत तो प्रश्न मर्यादित नसून तेथील कारभारातील गोंधळ सरकारसमोर यावेत, त्यामधून काही मार्ग काढावा शासनाने मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा असते. मृत न झालेल्या रुग्णाला मृत समजून शवागारामध्ये नेणे आणि नंतर त्याला बाहेर काढल्यावर त्याचा मृत्यू होणे हा घटनाक्रम दुर्दैवी आहे. असे प्रकार

4....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेथे होत असतील तर आजारी पडलेला माणूस अशा दवाखान्यामध्ये जाण्यापेक्षा बाहेर रस्त्यावर मृत्यू आला तर मला आनंद होईल अशी भावना व्यक्त करील.  या सगळयामध्ये गुणात्मक बदल करण्यासाठी वारंवार तपासणी करुन असे प्रकार घडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.  केवळ एका कर्मचाऱ्याला निलंबित करुन किंवा त्याला शासन करुन हा प्रश्न सुटणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ SBT/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

(ता.प्र.क्र.7336.... श्री. हेमंत टकले...

उद्या पुन्हा अशा प्रकारची घटना घडेल आणि पुन्हा कुणा एखाद्याचा मृत्यू होईल, पण सिस्टिममध्ये बदल होणार नाही. तेव्हा यादृष्टीने शासन गांभीर्याने विचार करील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी मूलभूत प्रश्नाला हात घातलेला आहे. या घटनेच्या निमित्ताने या संपूर्ण सिस्टिममध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासन काय उपाययोजना करणार आहे, कोणती दक्षता बाळगणार आहे अशी विचारणा केली. अशा प्रकारची घटना अनवधानाने देखील घडू नये यासाठी कठोर उपाययोजना आणि सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. या घटनेचा थोडासा इतिहास सांगण्याची आवश्यकता आहे. ही बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती हे खरे आहे. मी सांगू इच्छितो की, या माणसाला अशा प्रकारे नाका-तोंडात कापूस कोंबून शवागारात नेले गेले नव्हते. नाका-तोंडात कापूस कोंबल्यामुळे तो माणूस मृत पावला असे काही घडलेले नव्हते. एक चूक झाली ती कबूल केली पाहिजे की, ललित पारकर नावाचा सफाई कामगार होता. त्याला नर्सने बोलावले. बाजूला मोतीराम नावाचा मयत झालेला रुग्ण होता. रुग्ण मयत झाल्यानंतर बाजूला पडदे लावले जातात. त्याचवेळी महादेव नावाचा जो अत्यवस्थ रुग्ण होता त्या रुग्णाच्या नातेवाईकांनी बाजूला लावलेले पडदे काढून ते त्या रुग्णाच्या समोर लावले. जेव्हा वॉर्डबॉय गडबडीने आला त्यावेळी त्या रुग्णाला त्याने शवागारात नेण्यास सुरुवात केली. तेवढयात त्या रुग्णाने हात हलविला आणि त्याच्या लक्षात आले की तो मृत झालेला नाही. तेव्हा नाका-तोंडामध्ये कापूस कोंबून त्या माणसाला शवागारात नेण्यात आलेले नाही. तो रुग्ण अत्यवस्थ होता आणि तो दुस-या दिवशी मृत्यू पावला.

डॉ.दीपक सावंत : एखादा रुग्ण मृत्यू पावल्यानंतर जो पर्यन्त रिगर मॉर्टिस व्हायला सुरुवात होत नाही तोपर्यन्त त्याला तेथेच ठेवले जाते. निदान 2 तास तरी त्याला तेथेच ठेवले जाते. तेव्हा या प्रकरणी असे काही झाले होते काय ?

श्री. भास्कर जाधव : तसेच झाले होते. त्या दरम्यान महादेव नावाच्या रुग्णाच्या नातेवाईकांनी मयत झालेल्या रुग्णाभोवती लावले पडदे काढले आणि त्या महादेव नावाच्या रुग्णाभोवती लावले त्यामुळे ही गडबड झाली.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.7336....

श्रीमती अलका देसाई : महानगरपालिकेच्या रुग्णालयात जो सावळा गोंधळ चालू आहे त्याच्या बातम्या वृत्तपत्रातून वारंवार येत असतात हे आपण नाकारुन चालणार नाही. या प्रकाराबाबत महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याचे काय म्हणणे आहे आणि त्याबाबतीत काय उपाययोजना करण्यात येणार आहे हे मंत्री महोदय सांगतील काय ?

श्री. भास्कर जाधव : मुंबई महानगरपालिकेच्या चौकशी विभागामार्फत या प्रकरणाची चौकशी लावलेली आहे. चौकशीचा अहवाल लवकरच प्राप्त होईल. हा विषय सहजासहजी सोडलेला नाही. सगळी दक्षता घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ MMP/ D/ 14:00

**पृ.शी./मु.शी.: पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष ज्या घटनेकडे लागलेले होते त्या खैरलांजी प्रकरणात आज हायकोर्टाने निकाल दिलेला आहे. पाच-सहा महिन्यांपूर्वी खैरलांजी प्रकरणामध्ये भंडारा जिल्हा सेशन कोर्टाने सहा आरोपींना फाशीची व दोन आरोपींना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली होती. या निकालाविरुध्द आरोपींनी हायकोर्टात अपील दाखल केले होते. विशेषत: दलित समाजाचे लक्ष हायकोर्टाच्या निकालाकडे लागलेले होते. हायकोर्टाकडून सेशन कोर्टाचा निकाल कायम ठेवला जाईल अशा प्रकारची दलित समाजाची धारणा होती. परंतु दुर्दैवाने आज हायकोर्टाने निकाल देत असताना ज्या सहा आरोपींना
फाशीची शिक्षा सुनावली होती ती फाशीची शिक्षा रद्द करुन त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. हा निकाल ऐकल्यानंतर न्यायालय सुध्दा दलित समाजावर रुसले आहे का? असे वाटू लागले आहे. सरकारने आश्वासन दिले होते की, पाठराखण केली जाईल. परंतु पाठराखण करण्याऐवजी पाठ दाखविली आहे की काय? अशी शंका आमच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. अशा प्रकारचा निकाल हायकोर्टाने दिल्यामुळे महाराष्ट्रातील दलित समाजामध्ये नैराश्याची भावना निर्माण झाली आहे. राम गणेश गडकरींचे उदाहरण देणाऱ्या या महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचा निकाल दिल्यामुळे या निकालाविरुध्द महाराष्ट्र शासन सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करणार आहे का? या सहा आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे यादृष्टीने शासनाने अपील दाखल करावे अशी मी मागणी करीत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी खैरलांजी प्रकरणाबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून अतिशय महत्वाची माहिती सभागृहाला दिलेली आहे. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. या प्रश्नाबद्दल सरकारने संवेदनशीलता दाखवावी.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सभागृहाला माहिती दिलेली आहे. आपण निदेश दिले तर त्यादृष्टीने शासन निश्चितपणे दखल घेईल. ही न्यायालयीन बाब असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीची नोंद घेण्यात आली आहे. शासनाने स्वत:हून कोर्टात योग्य प्रकारे बाजू मांडलेली आहे. सभापती महोदय, आपण निदेश दिले तर त्या निदेशाचे पालन करता येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सभागृहाचे एका महत्वाच्या विषयाकडे लक्ष वेधले आहे. खैरलांजी प्रकरणामध्ये ज्या सहा आरोपींना सेशन कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली होती त्या निर्णयाविरुध्द आरोपींनी हायकोर्टात अपील दाखल केले होते. हायकोर्टाने त्या सहा आरोपींची फाशीची शिक्षा रद्द करुन त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सन्माननीय सदस्यांनी या निर्णयाविरुध्द राज्य शासनाने सुप्रीम कोर्टात अपील दाखल करावे अशी मागणी केली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, खैरलांजी प्रकरण घडल्यानंतर संपूर्ण दलित समाज पुढाऱ्यांना बाजूला सारुन रस्त्यावर उतरला होता. आज हायकोर्टाने दिलेला निकाल हा अतिशय महत्वाचा विषय आहे. शासनाने हा विषय अतिशय गंभीरतेने घेणे गरजेचे आहे. विशेषत: दलित समाजाच्या ज्या भावना आहेत त्या शासनाने समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .......

शासन सीमा प्रश्नाच्या बाबतीत कमी पडले, बेस्ट ऑफ फाईव्हच्या बाबतीत कमी पडले अशा प्रकारे सर्वच ठिकाणी न्यायालयीन लढ्यात आपले वकील कमी पडतात की काय अशी शंका वाटत आहे आणि हे शासनाला मुळीच शोभादायक नाही. म्हणून खैरलांजीच्या प्रकरणात जे घडले ते सबंध राज्याने पाहिलेले असल्याने शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन सुप्रिम कोर्टात या निकालाविरुध्द दाद मागण्याची आवश्यकता आहे. कारण अशा नराधमांना केवळ फाशीच होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासनाची भूमिका नेमकी काय आहे हे सभागृहाला समजले पाहिजे. तसेच माननीय मुख्यमंत्री आज सदनात उपस्थित असते तर येथे बोललेही असते पण ते आज दिल्लीत आहेत. तरी देखील सभागृहात माननीय गृह राज्य मंत्री आहेत त्यांनी शासनाची भूमिका स्पष्ट करावी. अन्यथा संपूर्ण दलित समाज रस्त्यावर येईल यासाठी शासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, खैरलांजी प्रकरण हे संपूर्ण राज्याला काळिमा फासणारे प्रकरण घडलेले आहे. या घटनेचा संपूर्ण राज्याने एकमुखाने निषेध केला, संपूर्ण राज्याच्या वतीने या प्रकरणाचा खटला तातडीने शासनाने चालविला आणि खालच्या कोर्टात या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा झाली. त्यानंतर कायद्यातील तरतुदीचा आधार घेऊन या गुन्हेगारांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाचा निर्णय आज सकाळी सर्वांनीच पाहिला आहे. दुसरा प्रश्न म्हणजे बेळगांव-कर्नाटक सीमा प्रश्न हा सुध्दा तितकाच महत्वाचा आहे. त्या अनुषंगाने सभागृहात सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याच शासनाच्याही भावना आहेत. या सभागृहाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्य मंत्री तसेच माननीय गृह मंत्र्यांच्या कानावर सभागृहाच्या भावना घालण्यात येतील आणि शासनाचा निर्णय सभागृहाला अवगत केला जाईल.

श्री. हुसैन दलवाई : महोदय, खैरलांजी प्रकरण फार गंभीर प्रकरण होते. त्या अनुषंगाने कोर्टाने निर्णय आजच दिलेला आहे त्या निर्णयामुळे सभागृहाच्या भावना अत्यंत तीव्र अशा आहेत. हे लक्षात घेऊन तसेच माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री सुध्दा सदनात उपस्थित नसल्याने या विषयावर एक तासाची चर्चा व्हावी, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2....

श्री. भास्कर जाधव : महोदय, खैरलांजी प्रकरणामुळे राज्यातील वातावरण संपूर्ण ढवळून निघालेले असल्याने सभागृहाच्या भावनांचा शासन आदर करील.

श्री. राम पंडागळे : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन शासनाने आपली ठोस भूमिका सभागृहाला सांगितलीच पाहिजे.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी सभागृहाला सांगू इच्छितो की, उच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या वतीने ताबडतोब सर्वोच्च न्यायालयात या निर्णयाविरुध्द याचिका दाखल करुन दाद मागण्यात येईल.

-------

....3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वयेच्या सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी "मौजे नवघर, मीरा-भाईंदर महानगरपालिका (जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र. 281 ते 289 मधील मीरा-भाईंदर आयुक्तांच्या निवासस्थानाला लागून असलेल्या 100 एकर जागेवरती मोठ्या प्रमाणावर तिवरांची झाडे तोडून भराव टाकण्याचे काम सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मिरा-भाईंदर नगरपालिका आयुक्तांच्या निवासस्थानाला लागून असलेल्या 100 एकर जागेवरती मोठया प्रमाणावर झाडांची कत्तल करण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोठमोठे ट्रक्स लावून भराव टाकण्याचे काम सुरु होते. तहसीलदाराने माती भराव टाकण्यासाठी काम करीत असलेले 100 ट्रक्स पकडले होते परंतु त्यापैकी 80 ट्रक्स सोडून देण्यात आले आहे व केवळ 20 ट्रक्सला सील लावण्यात आलेले आहे. यासंदर्भात त्या ठिकाणच्या विकासकावर आतापर्यंत का कारवाई केली नाही ? या संदर्भात मी जिल्हाधिका-यांना तसेच मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहिले आहे परंतु अजूनपर्यंत संबंधित ठेकेदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. तिवराची झाडे तोडता येत नाही, याबाबत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे, असे असतांनाही सुप्रीम कोर्टाचा निर्णय पायदळी तुडवण्याचे काम झालेले आहे. या ठिकाणी 100 एकर जागेवरील तिवराची झाडे तोडून त्यावर भर टाकली जात आहे त्यामुळे संबंधितावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

**उपसभापती** :माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदय, या प्रकरणाची आजच्या आज तातडीने चौकशी करुन आपला जो काही निर्णय असेल तो येईपर्यंत भराव घालण्याचे काम त्वरीत बंद करण्याचे आदेश द्यावेत.

श्री. भास्कर जाधव : ठीक आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** :यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "आदिवासी विभागातील लोकांना पावसाळयात रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्या उपजीविकेची व्यवस्था व्हावी यासाठी शासनाने सुरु केलेल्या खावटी कर्ज योजनेतील अन्नधान्य हे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत देण्याचे न्यायालयाने आदेश देऊनही भारतील राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ, मुंबई यांच्याकडून जादा दराने धान्य खरेदी केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनमुती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "गांवदेवी भाजी मार्केट (नौपाडा) येथील भाजी मार्केटचे बांधकाम गेल्या 8 वर्षापासून अपुर्णावस्थेत असल्याने फेरीवाले व भाजीविक्रेते मोकळया जागेवर अतिक्रमण करीत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनमुती नाकारीत आहे. मात्र शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "राज्यात स्वाईन फ्ल्यूची साथ पसरलेली असतांना स्वाईन फ्ल्यूची तपासणी करण्याबाबत शासनाने निदेश देऊनही मुंबई महापालिकेच्या सर्व रुग्णालयांना त्या संदर्भात सक्त सूचना दिलेल्या असतांनाही कल्याण येथील कु. पल्लवी लवंगारे ही तरुणी पुण्याहून श्वसनाचा त्रास होत असल्याने आपल्या कल्याण येथील घरी आली असता तिला मिरा हॉस्पीटल, कल्याण येथील डॉक्टरांनी तपासणी करुन कस्तुरबा हॉस्पीटल, मुंबई् येथे पाठविल्यामुळे तिचा दि.4.9.2009 रोजी झालेला मृत्यू "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनमुती नाकारीत आहे. मात्र शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिधुंदुर्ग जिल्हयातील रेडी (ता. वेंगुर्ले) येथे श्रीमती सुभद्रा राणे व त्यांची नात श्रध्दा परब या दोघींचा माहे जून, 2010 च्या शेवटच्या आठवडयात खून होऊनही आजतागायत संशयित आरोपिंना पकडण्यास पोलिसांना आलेले अपयश "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनमुती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

...3



SGJ/ MMP/ D/ 14:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "राज्यातील माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षक कर्मचा-यांच्या प्रलंबित विविध मागण्यांचे निवारणार्थ सर कार्यवाहक विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी मा. मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री व वित्तमंत्री यांना दिनांक 20 जून, 2010 रोटी पाठविलेल्या निवेदनाच्या संदर्भात दिनांक 17 जुलै पासून आंदोलन सुरु करीत असल्याबाबत दिलेला इशारा "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनमुती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, व्ही.यु.डायगव्हाणे यांनी "रायगड जिल्हयात भात पिकाची 100 टक्के पेरणी होऊनही रासायनिक खतांची टंचाई निर्माण झाल्यामुळे शेतक-यांना खतांचा पुरवठा वेळेवर होत नसल्याबात "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनमुती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, व्ही.यु.डायगव्हाणे यांनी "नंदुरबार जिल्हयात गेल्या तीन महिन्यात कुपोषणासह विविध कारणामुळे 67 बालकांचा मृत्यू झाला असून अक्कलकुआ व धडगाव तालुक्यांमध्ये गेल्या महिनाभरात 109 कुपोषित बालके आढळून आल्याने परिसरामध्ये संतापाचे व भीतीचे वातवरण निर्माण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनमुती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, सी.बी.पाटील, गुरुमुख जगवानी, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.धनंजय मुंडे यांनी मंगळवार, दिनांक 13 जुलै, 2010 च्या मध्यरात्रीपासून मुंबईतील शिवडी येथील बीपीच्या अपायकारक रासायनिक गोदामातून क्लोरीनसारख्या विषयारी वायुची गळती झाल्यामुळे सुमारे 56 नागरिकांना जे. जे. इस्पीतळ येथे दाखल केल्याबाबत "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, पाशा पटेल, संजय केळकर यांनी " आंबेजागोई (जी.बी.डी) येथील " झुंजार नेता "चे वार्ताहर श्री. दत्तात्र्य आंबेकर यांना दि. 12 जुलै, 2010 रोजी चोरटयांनी जबर मारहाण करुन त्यांचे हातपाय तोडल्याबाबत "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** .....

सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील, वि.स.स. यांनी "अधिश्री गोपाळकृष्णन कुळकर्णी या विबग्योर शाळेतील विद्यार्थीनीस व्यवस्थापनाने तिचा कोणताही दोष नसताना शाळेतून काढून टाकल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सूचनांना मी माझ्या दालनातच अनुमती नाकारली आहे.

.........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :मुंबईतील सांताक्रूझ (पश्चिम) येथे इमारत पुनर्विकासाच्या कामामुळे रहिवाशांना होत असलेला त्रास

**मु. शी.** : मुंबईतील सांताक्रूझ (पश्चिम) येथे इमारत पुनर्विकासाच्या कामामुळे रहिवाशांना होत असलेला त्रास यासंबंधी डॉ.दीपक सावंत ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई पदवीधर विभाग) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शहरामध्ये इमारतीचे बांधकाम करताना विकासकांने मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक असणे, त्यात पायलिंग मशिनमुळे होणारे ध्वनीप्रदूषण, सभोवतालचे कंपाऊंड, कचरा, ओली माती यांच्या वाहतूकीची विशेष काळजी, त्याचप्रमाणे कामगार कायद्याप्रमाणे कामगारांचा काम करण्याचा अवधी, आजूबाजूच्या रहिवाशांना त्रास होवू नये म्हणून किती काळ काम चालू ठेवण्यांसंबधी असलेले नियम, मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून अशा प्रकारच्या अटी व शर्ती मान्य केल्यानंतरच एक्झीक्यूट (काम सुरु करण्याची परवानगी) ऑर्डर मिळणे, असे असूनही सांताक्रुझ पश्चिम (मुंबई) येथे ५० मीटरच्या परिघात सुरु असलेल्या १) संगम बिल्डींगचा पुनर्विकास, २) बेंझट रोड वरील गुजराती क्लब पुनर्विकास, ३) पोद्दार रोडवरील श्रीनाथजी मंदिर शेजारी, या कामांमुळे तेथील रहिवाशांना त्रास होत असणे, या त्रासाबाबतची तक्रार तेथील रहिवाशांनी संबंधित अधिकारी यांच्याकडे केली असता विकासाचे काम चालूच राहणार, आवाज नाही झाला तर काम कसे होणार ? अशा प्रकारची दुरुत्तरेही देण्यात येणे, तसेच या बांधकामामुळे होणारे ध्वनीप्रदूषण, वायुप्रदूषण यामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका, यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये सध्या बांधकामे जोरात सुरू आहेत. अनेक ठिकाणी एकाच परिसरामध्ये 6-6, 7-7 इमारतीची कामे सुरू आहेत. त्यामुळे रहिवाशांना त्याचा त्रास होतो. रहिवाशांची कोणतीही काळजी न घेता मुंबई महानगरपालिका इमारतींच्या बांधकामांना परवानगी देत आहे. याबाबत कोणताही नियम नाही असे महानगरपालिकेचे अधिकारी सांगत आहेत. उत्तरामध्ये आपण म्हटले आहे की, "एकाच परिसरातील एकापेक्षा जास्त इमारतींना परवानगी देण्याबाबत नियमात कोणतेही बंधन नाही." मुंबईतील मलेरियाचे प्रमाण, ध्वनीप्रदूषण वायू प्रदूषण बधितले तर मुंबईच्या दृष्टीने कोणती तरी नियमावली असणे आवश्यक आहे, असे मला वाटते. त्या उद्देशानेच मी ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. विकास नियमावली नुसार मुंबई महानगरपालिका आय.ओ.डी.देते. त्यानंतर काम सुरू होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे काही अटीसापेक्ष मंजुरी देण्यात आली आहे. सांताक्रूझ भागातील 6 इमारतींचे काम सुरू आहे. एस.व्ही.रोडवर 3 इमारतींचे काम सुरू आहे. सांताक्रूझ (पश्चिम) परिसरात 50 मीटरच्या परिघात 3 इमारतींची पुनर्विकासाची कामे सुरू आहेत. या बांधकामांसाठी कोणतीही नियमावली नाही. मी सर्वांकडे चौकशी केल्यावर मला एक जी.आर.सापडला. या राज्याचे सिटी इंजिनिअर आहेत, त्यांना विचारले की, जी.आर.आहे काय ? त्यांनी सांगितले की, माझ्याकडे जी.आर.नाही. आपल्याकडे असेल तर माझ्याकडे द्यावा. आम्ही कारवाई करतो. या राज्याचा दिनांक 21 एप्रिल 2009 चा जी.आर.या अधिकाऱ्याकडे नाही. या जी.आर.मध्ये सर्व काही सांगितले आहे. यात ध्वनी प्रदूषण किती असावे, मॉर्टर कधी आणावे, वाहन कधी आणावे याचा उल्लेख आहे. महानगरपालिकेतर्फे काही अटीसापेक्ष मंजुरी देण्यात आली आहे. याबाबतचे हमी पत्र 3 विकासकांकडून लिहून घेतले आहे काय ? येथे ध्वनी प्रदूषण किती होत आहे ते मोजण्यात आले आहे. ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी जो पर्यंत नॉईज बॅरिअर्स लागत नाही तो पर्यंत सदर इमारतींची कामे शासन बंद करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्री.भारवि. 14:20

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली लक्षवेधी सूचना बारकाईने वाचल्यास असे दिसून येईल की, कन्स्ट्रक्शन्सच्या संदर्भात अटी वा शर्ती घालणे याबाबत त्यांचा आक्षेप नाही. परंतु कन्स्ट्रक्शन संदर्भात जे नियम घालून दिलेले आहेत त्याचे पालन केले जात नाही असा त्यांच्या लक्षवेधी सूचनेचा रोख आहे. सन्माननीय सदस्य ज्या भागात राहतात त्याठिकाणी या इमारतींचे बांधकाम सुरु आहे. ते या बांधकामाविरुध्द आकसाने कारवाई करण्याबाबत सांगत आहे अशातलाही भाग नाही तर तेथील नागरिकांना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होऊ नये म्हणून त्यांनी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. त्याठिकाणी एकूण तीन इमारतींच्या बांधकामांना परवानगी दिलेली आहे, परंतु प्रत्यक्षात तेथे एका इमारतीचे बांधकाम सुरु आहे. यापूर्वी खड्डे हाताने खणले जायचे. त्यानंतर जे.सी.बी.लावून खणले जायचे, आता पायलिंग सारखी नवीन यंत्रे आलेली आहेत. ड्रिलिंग करताना आवाज होत नाही, परंतु मशीनमधील रोटरवर चिखल बसतो आणि तो काढताना मोठा आवाज होतो ही वस्तुस्थिती नाकारण्याचे काही कारण नाही. अशाप्रकारच्या मशीन वापरु नयेत अशा सूचना दिलेल्या आहेत. आता एक नवीन पध्दतीची मशीन आलेली आहे त्याचा वापर करावा अशाप्रकारच्या सक्त सूचना दिलेल्या आहेत. सूचनांचे योग्य पालन होत नसेल तर त्याबाबत माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी नॉईज बॅरियर्सच्या संदर्भात काही नियम करण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण बांधकामासाठी परवानगी देतो त्याचवेळी परवानगीमध्ये ही अट घालावी लागेल कारण यापूर्वी अशी अट घातली जात नव्हती ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात सकाळी मी अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला त्यावेळी मला मी बाब समजली. आपणास आता सुध्दा संबंधितांना नोटीस देण्यात काही अडचण आहे असे वाटत नाही. परंतु यामध्ये थोडी अडचण आहे ती सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या संदर्भात नियम नाही असे नाही. निवासी भागात दिवसा 50 डी.बी.पर्यंत आणि रात्रीच्यावेळी 40 डी.बी.पर्यंत ध्वनी असावा. कमर्शिअल भागात दिवसा 60 डी.बी.आणि रात्री 55 डी.बी. पर्यंत ध्वनी असावा, इंडस्ट्रीयल विभागात दिवसा 75 डी.बी आणि रात्रीच्या वेळी 65 डी.बी. ध्वनी असावा असा नियम आहे. परंतु रस्त्यावरुन सहज गाडी गेली तर 60 ते 70 डी.बी.पर्यंत आवाज होऊ शकतो. ही तांत्रिक अडचण लक्षात घेतली तर आपणास या गोष्टीचा सुध्दा विचार करावा लागेल. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे त्याठिकाणी नॉईज बॅरियर्ससंदर्भात सूचना देण्यात येतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष दिनांक 21 एप्रिल, 2009 रोजीच्या जी.आर.च्या परिशिष्ठ 1 कडे वेधतो. त्यामध्ये प्रत्येक अधिका-यांना डयुटीज् ठरवून दिलेल्या आहेत. त्यात असे नमूद केले आहे की, "Municipal Commissioner, Additional/Deputy Municipal Comissioner/Chief Officer of Municipal Council/Committee Govt. of Maharashtra not below the rank of the Deputy Superintendent of Police" या अर्बन डेव्हलपमेंट विभागाच्या अधिका-यांना ज्या ड्युटीज् दिलेल्या आहेत त्या मी आपल्याला वाचून दाखवितो. त्या अशा आहेत की, "Corresponding Rules for the enforcement of noise standards laid down under the Environment (Protection) Rules, 1986 at source for construction projects, utilities for buildings (ACs, DG sets etc.) domestic appliances, development and other activities in their jurisdiction." तेव्हा आपल्या नियमात सुधारणा करण्याची गरज नाही. आपल्याला डेसिबलमध्ये सुधारणा करावयाची आहे ही गोष्ट खरी असली तरी आजपर्यंत कोणीही ध्वनी प्रदूषणाबाबत केस केलेली नाही. मला चांगले आठवत आहे, मी त्या सन्माननीय सदस्यांचे नाव घेऊ इच्छित नाही, त्यांनी अशी एक केस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळातर्फे केली होती. ते कॉँग्रेस पक्षाचे आमदार आहेत.परंतु त्यांना देखील हार पत्करावी लागली. मुंबईत इतक्या मोठ्या प्रमाणात इमारतींचे बांधकाम होत असताना काही नियम करण्याची गरज आहे. तेव्हा हे नियम आपण किती दिवसांत करणार आहात ? आम्ही डेव्हलपमेंटच्या आड नाही. बांधकामास आय.ओ.डी.मिळण्यापूर्वी बिल्डरकडून हमीपत्र लिहून घेण्याची आवश्यकता आहे, ते आपण किती दिवसांत करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, बिल्डरने डेब्रीज मॅनेजमेंटचा प्लान सबमिट केल्याशिवाय त्यास बांधकामाची परवागनी दिली जात नाही. आता फक्त साऊंड बॅरियर्सचा प्रश्न आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे इमारत बांधकामाची परवानगी देताना त्यामध्ये ही अट आपण घालत नव्हतो, यापुढील काळात ती अट घालण्यात येईल.

यानंतर श्री.गायकवाड..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय,मला माननीय मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे . माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देत असतांना साऊन्ड पोल्युशन आणि इतर बाबीसबंधीचा उल्लेख केला होता. कशा पध्दतीने मटेरिअल आणले पाहिजे, आलेले मटेरिअल कशा प्रकारे स्टोअर केले गेले पाहिजे या बाबतीत आय.ओ.डी.मध्ये काही अटी टाकण्यात आलेल्या आहेत परंतु त्या अटींचे उल्लंघन होत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येत आहे.या बाबतीत मी एक उदाहरण देऊ इच्छितो. ब्रीच कॅन्डी हॉस्पिटल जवळ सोफिया कॉलेज नावाची अत्यंत चिंचोळी गल्ली आहे.त्या ठिकाणी रेमंड कंपनीच्या जे.के. हाऊस नावाच्या इमारतीचे बांधकाम सुरु आहे. त्या ठिकाणी सकाळच्या वेळी 40 फुटाचे ट्रक्स येऊन उभे राहतात आणि त्या ट्रक्समधील स्टील रस्त्यावरच उतरविले जाते.इतकेच नव्हे तर हे सर्व स्टील रस्त्यावरच ठेवले जाते. या संदर्भात अनेक वेळा तक्रारी करुनही संबंधिताविरुध्द कारवाई केली जात नाही.रस्त्यावर ट्रक उभे केल्यामुळे आणि स्टील रस्त्यावरच ठेवल्यामुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत असतो .मुंबई शहरातील वाहतुकीच्या समस्या मोठया प्रमाणावर आहेत त्या समस्या जर सोडवावयाच्या असतील तर जे मानव निर्मित अडथळे आहेत ते त्वरित थांबविण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भात कायदेशीर दृष्टया मला " नाही " असे म्हणता येणार नाही त्यामुळे " होयच " म्हणावे लागेल. परंतु व्यावहारिकदृष्टया देखील विचार केला पाहिजे . त्या ठिकाणी मजुरांनी काम कधी करावयाचे ? सूर्यादयापासून सूर्यास्तापर्यत मजुरांनी काम करावे अशीही अट घालण्यात आलेली आहे. संपूर्ण दिवसभर या रस्त्यावर मोठया प्रमाणावर वाहतूक होत असते रात्रीच्या वेळी जर हे मटेरिअल उतरविले नाही तर त्यांनी काम कसे करावयाचे याबाबतीत सुध्दा अडचण येत असते.कायदेशीर बाबीचा आणि व्यावहारिक बाबीचा विचार करुन काय करता येईल हे पाहिले जाईल. त्या ठिकाणचे काम झाले पाहिजे याचा देखील विचार करुन यासबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

**उपसभापती** : कायदेशीर बाबीकडे माननीय मंत्री महोदयांनी अधिक लक्ष द्यावे.

श्री.प्रकाश बिनसाळे :सभापती महोदय, मी आता जे उदाहरण दिले होते त्या ठिकाणच्या बांधकामाचे सर्व मटेरियल रस्त्यावरच उतरविले जाते.अशाच पध्दतीने मुंबईमध्ये इतरही ठिकाणी बांधकामाचे मटेरियल रस्त्यावर उतरविले जाते. त्याच बरोबर अनेक दिवस हे मटेरियल रस्त्यावरच ठेवले जाते हे प्रकार थांबविण्यात येणार आहेत काय ?

2.

14-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) OO 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव :सभापती महोदय, मी या गोष्टीचे समर्थन केलेले नाही. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी आपणाशी मंत्री म्हणून वा शासन म्हणून बोललो नाही. ज्या काही नेहमीच्या अडचणी येत असतात त्याबाबतीत मी बोललो आहे.कायम स्वरुपी किंवा ब-याच काळपर्यत जर हे मटेरियल रस्त्यावर ठेवण्यात आले असेल तर त्याबाबतीत संबंधिताविरुध्द कारवाई करावी लागेल आणि जर कारवाई केली नसेल तर त्या भागाच्या वॉर्ड ऑफिसरला जबाबदार धरावे लागेल.

**उपसभापती** : कारवाईच करावयाची असेल तर रेमंड कंपनीविरुध्द करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबईमध्ये स्वाईन फ्ल्यू, मलेरिया इत्यादी साथीच्या रोगासबंधी बरीच चर्चा झालेली आहे.या बाबतीत जे सर्व्हेक्षण करण्यात आले होते त्यामध्ये कन्स्ट्रक्शन्स साईटमुळे मलेरिया मोठया प्रमाणावर पसरतो असा या सर्व्हेक्षणाचा रिपोर्ट आलेला आहे.महानगरपालिकेच्या प्रशासनाने आता असा विचार केला आहे की, कन्स्ट्रक्शन्सच्या साईटवर डासांची उत्पत्ती होऊ नये या संबंधी योग्य ती खबरदारी घेण्याची जबाबदारी सबंधित बिल्डर्सवर टाकली आहे.जर त्यांनी खबरदारी घेतली नाही तर त्यांना दंड आकारण्यात येईल. अर्थात संबंधित व्यक्तीला किरकोळ स्वरुपाचा दंड आकारला जाईल परंतु ही जबाबदारी प्रशासनाची आहे .शहरात राहणा-या सर्वसामान्य माणसाचे आरोग्य बिल्डरांच्या ताब्यात न देता ते महानगरपालिकेच्याच ताब्यात असले पाहिजे. कन्स्ट्रक्शन्सच्या साईटवर अशा प्रकारच्या डासांची निर्मिती झाली तर सबंधित बिल्डरला जबाबदार धरले जाईल असे ठरविण्यात आलेले आहे. परंतु ही काळजी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने घेतली पाहिजे व नियमितपणे फवारणी होते किंवा नाही हे त्यांनीच पाहिले पाहिजे. बिल्डरांनी जर काळजी घेतली नाही तर कदाचित त्याला 50 हजार रुपयांचा दंड होईल परंतु मलेरिया झाल्यामुळे दोन चार जणांचे मृत्यू होतील. तेव्हा या विषयाबाबत महानगरपालिकेच्या प्रशासनाला राज्य शासन योग्य ते निदेश देणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,ही बाब जुनी असली तरी या निमित्ताने ही नवीन बाब समोर आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांचा मुद्दा बरोबर आहे.बिल्डरांना या बाबतीत जबाबदार धरले असले तरी त्यावर महानगरपालिकेचा कन्ट्रोल रहावा या दृष्टीने सूचना देण्यात येतील.

---





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** धनपूर,झावरपाडा, ता.तळोदा जि.नंदूरबार येथील जाळण्यात आलेल्या आदिवासीच्या झोपडया

**मु.शी.** धनपूर,झावरपाडा, ता.तळोदा जि.नंदूरबार येथील जाळण्यात आलेल्या आदिवासीच्या झोपडयासंबंधी ॲड.गुरुनाथ कुलकर्णी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"धनपूर, झावरपाडा, ता.तळोदा, जिल्हा नंदुरबार क्षेत्रातील 128 आदिवासीच्या झोपडया दिनांक 30 जून 2010 रोजी धनपूर शिवारातील अतिक्रमीत वनजमिनी बळकावण्याच्या उद्देशाने जाळण्यात येणे, या घटनेमुळे 128 कुटुंबावर उपासमारीची वेळ येणे, या संदर्भात पोलीस व महसूल यंत्रणेने कोणतीही दखल न घेणे, त्यामुळे परिसरातील आदिवासीमध्ये निर्माण झालेली संतापाची व असंतोषाची भावना, या संदर्भात शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुंमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांच्याकडे असलेल्या सत्य माहितीच्या आधारावर त्यांनी ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. दि. 30 जून 2010 रोजी 128 आदिवासींच्या झोपडया जाळण्यात आल्या त्यामुळे या 128 कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली. याची पोलीस यंत्रणेने व महसूल यंत्रणेने काहीही दखल घेतली नाही. या संदर्भात लेखी निवेदनामध्ये क्रिमिनल केस नं.87/2010 सी.आर.पी.सी.156(3) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे म्हटले आहे. त्या संदर्भात घेण्यात आलेला आक्षेप बरोबर नाही. आदिवासी लोकांनी तेथील वन विभागाची जमीन बळकाविण्यासाठी अवैध मार्गाचा अवलंब केल्याचे याठिकाणी म्हटले आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेमध्ये विचारण्यात आलेला प्रश्न खरा आहे की, शासनाने निवेदनामध्ये दिलेले उत्तर खरे आहे?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार क्रिमिनल केस क्र. 87/2010 सी.आर.पी.सी. 156(3) प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्हयाच्या संदर्भातील हकिकत अशी आहे की, दै. सकाळमध्ये छापून आलेल्या बातमीनुसार घटनास्थळी तहसीलदार, वन खात्याचे अधिकारी व पोलीस निरीक्षकांनी भेट दिली असता त्याठिकाणी मनुष्य वस्ती नसल्याचे व झोपडया जाळण्यात आल्याचे दिसून आले नाही. या संदर्भात संबंधित फिर्यादीने न्यायालयाकडे तक्रार अर्ज केला. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार कलम 156(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्याबाबत पोलिसांनी तपास केल्यानंतर अशाप्रकारे यापूर्वी 9 गुन्हे दाखल केल्याचे आढळले. तसेच, वन खात्याच्या जमिनीवर आदिवासींनी अतिक्रमण केल्यानंतर व त्यासंदर्भात नंतर तक्रार केल्यानंतर वन संरक्षण कायदा 2006 नुसार ती जमीन आदिवासींना मिळते अशाप्रकारचा गैरसमज त्यांना करुन देण्यात आला. अशाप्रकारच्या गैरसमजातून आदिवासी लोक त्या जमिनीवर अतिक्रमण करीत असतात. व त्याकरिता अशाप्रकारच्या खोटया केसेस दाखल करतात ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. त्याठिकाणी वन खात्याचे अधिकारी व पोलीस अधिकारी गेल्यानंतर फिर्यादी मोज्या पारश्या वसावे यांनी त्यांना मारहाण केली. त्यांनी सरकारी कामामध्ये ढवळा ढवळ केल्यामुळे त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे त्याठिकाणी काहीही आढळलेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, याठिक्ाणी पोलिसांनी न्यायालयाची भूमिका बजावलेली दिसते. मंत्रिमहोदयांचे म्हणणे असे की, सकृतदर्शनी त्याठिकाणी तथ्य आढळले नाही. त्याठिकाणी फिर्यादी वसावे व इतर साक्षीदारांना त्यांच्या घरामध्ये घुसून धमक्या देण्यात आल्या. तसेच, दिलीप पाडवी याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला. आपण निवेदनाच्या शेवटी म्हटले आहे की, "वन जमीन बळकाविण्यासाठी खोटे पुरावे तयार करण्यात आले." या आदिवासी लोकांनी वन विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण केले म्हणून हा गुन्हा दाखल करण्यात आला की, त्यांना त्या जमिनीवरुन हुसकावून लावण्यासाठी आपण गुन्हा दाखल केला?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/ प्रथम श्री. सरफरे.... 14:35
डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, हे 128 अदिवासी आता सध्या कोठे रहात आहेत. शासनाच्या असे निदर्शनास आले की, त्यांनी अतिक्रमण केले. शासनाला झोपडया जळाल्याचे काहीच पुरावे मिळाले नाहीत. त्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी असे म्हटले की, आम्हाला सकाळमधून माहिती मिळाली याचा अर्थ शासनाच्या महसूल यंत्रणेने याबाबतीत काहीच कळविलेले नव्हते काय? माननीय मंत्रिमहोदयांनी या सर्व बाबींचे स्पष्टीकरण द्यावे.

श्री. रमेश बागवे :सभापती महोदय, मी याबाबतीत अगोदरच स्पष्ट केलेले आहे. कोर्टाचा 153(3) अन्वये आदेश आलेला आहे. त्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. कोणतीही व्यक्ती तक्रार दाखल करण्यासाठी कोर्टात जात असते. त्याप्रमाणे याबाबतीत कोर्टात तक्रार करण्यात आलेली आहे. अशा तऱ्हेचे या आधी संबंधीत नऊ लोकांनी कोर्टात तक्रार अर्ज केलेले आहेत आणि ते सर्व फोल ठरलेले आहेत. त्या ठिकाणी काही लोकांची मोडस ऑपरेंडी आहे. सरकारी जमिनीवर खोटे अतिक्रमण दाखवायचे आणि त्या झोपडया जाळायच्या. अतिक्रमण केलेल्या आदिवासींना जागा मिळते अशा तऱ्हेचा त्यांचा गैरसमज आहे. त्यामुळे कोर्टाने जो आदेश दिलेला आहे त्या आदेशानुसार गुन्हा दाखल केलेला आहे. त्या गुन्हयाचा तपास पोलिसांनी केलेला आहे. तहसीलदाराने त्याचा पंचनामा केला. स्थानिक नागरिकांचे जबाब घेतले त्यानंतर असे निदर्शनास आले की, त्या ठिकाणी मनुष्यवस्ती नव्हती. झोपडया जळालेल्या नव्हत्या. या लोकांनी अर्धवट लाकडे उभी केली होती. त्या ठिकाणी साहित्य आणि लाकडे पडल्याचे आढळून आल्याचे पंचनाम्यामध्ये म्हटले आहे. त्यानुसार हा गुन्हा दाखल केलेला आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आदिवासींची जमीन बळकावण्यासाठी जर हे कारस्थान केले असेल तर असे जमीन बळकवण्याचे किती प्रकार या परिसरामध्ये झालेले आहेत. आणि त्याची नोंद पोलीसस्टेशनमध्ये आहे काय ?असल्यास त्यासंबंधीची माहिती देण्यात यावी.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, आदिवासींची जमीन बळकावण्यात आलेली नाही. ही वन खात्याची जमीन आहे. त्या ठिकाणच्या आदिवासींनी असा प्रकार यापूर्वी नऊ वेळा केला होता. त्या ठिकाणच्या लोकांची मोडस ऑपरेंडी आहे. सरकारी वन जमिनीवर अतिक्रमण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे...

करतात आणि त्याठिकाणी लाकडे जाळून खोटा अभास निर्माण करुन कोर्टात तक्रारी करतात. त्यामुळे कोर्टाने कलम 153(3) प्रमाणे आदेश दिलेला आहे त्याप्रमाणे हा गुन्हा दाखल झालला आहे. परंतु हे सर्व खोटे आहे असा तेथील मामलेदार आणि तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कोर्टात अहवाल पाठविलेला आहे.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी कलम 153(3) सांगितलेले आहे. परंतु ते सीआरपीसीचे कलम 156 (3) आहे. कलम 156(3) प्रमाणे कोर्टाने आदेश दिला त्याप्रमाणे गुन्हा दाखल झाला. गुन्हा दाखल झाल्यानंतर ते कोर्टात का पाठविले नाही? डॉ. नीलम गोऱ्हे म्हणतात त्याप्रमाणे ते चार्जशीट तयार करुन कोर्टात पाठवावयास पाहिजे होते. त्यानंतर ते गुन्हेगार आहेत की नाही हे कोर्टाने ठरविले असते. त्याबाबतचा निर्णय गृह विभागाला घेता येणार नाही. गुन्हा दाखल झाल्यानंतर कोर्टाच्या आदेशाप्रमाणे तपास करुन चार्जशीट कोर्टात दाखल करावयास पाहिजे होते तसे न करता गृह विभागने स्वत: निर्णय कसा घेतला?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, पंचनामा करुन सर्व अहवाल कोर्टामध्ये पाठविलेला आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयानी याठिकाणी सांगितले की, अशा पध्दतीने वन खात्याची जमीन बळकावण्याचा प्रकार त्या ठिकाणी वारंवार होतो. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. हे सगळे आदिवासी लोक कोठे रहातात, त्यांची नेमकी घरे कुठे आहेत, का त्यांना घरेच नाहीत, ते वाऱ्यावर रहातात काय, त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे काय? वारंवार अशा पध्दतीने वन खात्याची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करण्यात येत असेल तर त्यावर आतापर्यंत काय उपाययोजना केलेली आहे या दोन प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, हे सर्व आदिवासी चोरझीरा गाव ता. तळोदा जिल्हा नंदूरबार या ठिकाणी रहातात.

---

..3...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळण्यासाठी कमी प्रमाणात पोलीस कार्यरत असल्यामुळे गुन्हेगारीच्या संख्येत झालेली वाढ

**मु. शी.** : पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळण्यासाठी कमी प्रमाणात पोलीस कार्यरत असल्यामुळे गुन्हेगारीच्या संख्येत झालेली वाढ यासंबंधी सर्वश्री संजय दत्त,भाई जगताप,मोहन जोशी,जयप्रकाश छाजेड,सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चाळीस लाख लोकसंख्या असलेल्या पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळण्यासाठी कमी प्रमाणात पोलीस कार्यरत असल्याची धक्कादायक माहिती माहे जून-2010 मध्ये वा त्यासुमारास उघडकीस येणे, या पोलिसांपैकी काही, अति महत्वाच्या व्यक्तींच्या भेटी दरम्यान बंदोबस्त, अतिक्रमण हटविण्याची कारवाई, वाहतूक नियंत्रण, इत्यादी कामांमध्ये व्यस्त असणे, परिणामी शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या चोऱ्या, दरोडे, खून, मारामाऱ्या इत्यादी बाबींचा तपास करणे व अशा प्रकरणांना आळा बसविण्यास उपाययोजना करणे, यासाठी अत्यंत कमी प्रमाणात पोलीस उपलब्ध असणे, पुणे शहरातील पोलिसांची व पोलीस ठाण्यांची संख्या वाढविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे वारंवार शासनाचे लक्ष वेधूनही शासनाद्वारे अद्यापपर्यंत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात न येणे, शहरातील गुन्हेगारीच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली वाढ, सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला प्रश्न, परिणामी स्थानिक जनतेच्या मनात पसरलेली संतापाची भावना, शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीत सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन उभे करण्याचा नागरिकांनी दिलेला इशारा, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये माझे नाव आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी मला सांगितले होते की, आज मी सभागृहात उपस्थित नसणार. त्यामुळे मला आधी प्रश्न विचारण्याची संधी द्यावी. सभापती महोदय, मुंबईच्या नंतरचे महानगर किंवा देशामध्ये पाहिले तर महानगराच्या बाबतीत पुण्याचा क्रमांक बराच वरचा येतो. आज ऑफिशियली पुण्याची लोकसंख्या 40 लाख आहे आणि अनऑफिशियली पुण्याची लोकसंख्या यापेक्षा आणखी 10 ते 15 लाखाने जास्त असणार. कारण त्या ठिकाणी सुध्दा झोपडपट्टया वगैरे प्रकार सुरु झालेले आहेत. या 40 लाख लोकांचे संरक्षण करण्यासाठी जे पोलीस बळ आहे त्यांची संख्या 8744 इतकी आहे. म्हणजे 500 नागरिकांच्या मागे एक पोलीस असे हे प्रमाण आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 2009 मध्ये गुन्ह्यांची संख्या 595 होती ती कमी होऊन 518 झाली. यामध्ये शासन आपली पाठ थोपटून घेणार आहे काय ? म्हणजे हे 518 गुन्हे 365 दिवसांमध्ये झाले. याचा अर्थ असा होतो की, प्रत्येक दिवशी दोन गुन्हे घडलेले आहेत. पुण्यामध्ये अशा प्रकारचे गुन्हे जास्त घडत आहेत त्याचा बंदोबस्त करण्याबद्दल शासन काय उपाययोजना करणार हा खरा लक्षवेधी सूचना देण्यामागचा उद्देश आहे. निवेदनामध्ये शासनाने हेल्पलाईनचे क्रमांक दिलेले आहेत. महिलांवर जे अत्याचार होतात अनुषंगाने हेल्पलाईनचा क्रमांक दिलेला आहे. आतापर्यंत किती महिलांचे फोन आले याचा तपशील मिळेल काय ? ज्येष्ठ नागरिकांसाठी क्रमांक 1091 ही हेल्पलाईन सुरु करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. अशा किती नागरिकांच्या तक्रारी आल्या आणि त्याच्याबाबतीत काय कारवाई केली ? दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, हा अल्प असलेला पोलीस फोर्स शासनाकडे आग्रह धरुन वाढवून घेणार काय ? या ठिकाणी माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील जरी आता सभागृहात उपस्थित असते तरी मी त्यांना हाच प्रश्न विचारला असता की, पुण्यासारख्या महानगरासाठी हा पोलीस फोर्स वाढवून घेणार काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी असा प्रश्न विचारला की, त्या ठिकाणी गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस फोर्स वाढवून घेणार काय ? पाचव्या टप्प्यामध्ये 11 हजार पोलिसांची भरती होणार आहे. 2009 मध्ये त्या ठिकाणी 838 आणि

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे .....

2010 मध्ये 540 पोलीस कर्मचारी नव्याने भरती करण्यात आले आहेत. या ठिकाणी पाचव्या टप्प्यामध्ये 11 हजार पोलिसांची भरती होणार आहे. आम्ही त्या ठिकाणी पोलीस कुमक जास्त वाढवून घेणार याबद्दल दुमत नाही. पुण्यातील सर्व गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी त्या ठिकाणी जास्तीत जास्त पोलीस वाढवून घेऊ.

श्री. भाई जगताप : आपण जी हेल्पलाईन दिलेली आहे त्याबाबत मी प्रश्न विचारला त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, निवेदनामध्ये जी हेल्पलाईन दिलेली आहे त्याबद्दलची जी माहिती सन्माननीय सदस्यांना पाहिजे ती संपूर्ण माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, या ठिकाणी पुण्याच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. पुणे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. हे शहर फार झपाट्याने मोठे झालेले आहे. मुंबईच्या तुलनेमध्ये विचार केला तर पुणे शहराची लोकसंख्या जवळपास 60 लाखापर्यंत आहे आणि मुंबईची लोकसंख्या सव्वा कोटीपर्यंत आहे. एरियाचा विचार केला तर पुण्याचा एरिया 743 चौरस मीटर आहे तर मुंबईचा एरिया 437 चौरस मीटर आहे. पुण्यातील रस्त्यांची लांबी 3300 किलोमीटर आहे तर मुंबईतील रस्त्यांची लांबी 1931 किलोमीटर आहे. हा सर्व विचार करता पोलिसांची संख्या मुंबईमध्ये 46 हजार आहे तर पुण्यामध्ये फक्त 8 हजार आहे. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन केले की, 11 हजार पोलिसांची भरती होणार आहे. पुणे शहरामध्ये सेलिब्रेटीज किंवा व्हीव्हीआयपींची मूव्हमेंट जास्त प्रमाणात होत असते. त्यामध्ये पोलीस व्यस्त असतात. त्याचप्रमाणे अतिक्रमणाची कारवाई करावयाची असते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

इतरही अनेक छोटया मोठया घटना घडत असतात त्यासाठी पोलीस फोर्स कमी पडत आहे. पोलिसांचे प्रमाण कमी असल्यामुळे तेथे दिवसंदिवस गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. स्पेसिफिक उदाहरण द्यावयाचे झाले तर हिंजवडी येथे एका मुलीवर झालेल्या बलात्काराच्या प्रकरणाचा तपास अजून लागलेला नाही. मुंबईला 26 नोव्हेंबर रोजी आतंकवादी हल्ला झाल्यावर येथील पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रे देण्यात आली आहेत. त्यांना बुलेटप्रूफ गाडया देण्यात आल्या आहेत, तशा गाडया व शस्त्रे पुण्याच्या पोलिसांना देण्यात येतील काय ? पुण्याचा विचार केला तर पुण्याला लष्करी विमानतळ आहे, आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे, लष्कराचे दक्षिण विभागाचे मुख्यालय आहे, आयटी उद्योग आहे, या वास्तुंवर आतंकवादी हल्ला होण्याची भीती आहे. म्हणून मुंबईच्या धर्तीवर पुण्यात एनएसजी फोर्स निर्माण केला जाईल काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, पुणे शहरासाठी 3 हजार पोलिसांची मागणी केलेली आहे. मुंबईपेक्षा पुण्याचे क्षेत्रफळ व रस्त्याची लांबी जास्त असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. मुंबईत 46 हजार पोलीस आहेत, पुण्यात 8 हजार पोलीस आहेत, ही तफावत असल्यामुळेच पुण्यासाठी 3 हजार पोलिसांची मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती चवधरी यांनी उल्लेख केल्याप्रमाणे पोलीस खात्यातर्फे पुणे शहरासाठी विशेष पथक एनएसजी किंवा क्यूआरटीच्या धर्तीवर नेमण्याची मागणी केलेली आहे. ही मागणी पूर्ण झाल्यावर आवश्यक तो कर्मचारी वर्ग भरला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेबद्दल बोलावे तेवढे थोडेच आहे. सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी पुणे शहरातील तंटा मुक्ती झाल्याचे जाहीर केलेले मी वाचले आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.रमेश बागवे व पुणे शहर पोलीस आयुक्त यांच्यातील तंटा मुक्ती झाली आहे असे त्यांनी जाहीर केले आहे. सन्माननीय सदस्यांनी पुणे शहरासंबंधीची ही लक्षवेधी सूचना उपस्थित केल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करते. याचे कारण असे की, त्यांनी पुणे शहरातील गुन्हे शाखेची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. उच्च न्यायालयातील न्या.मार्लोपल्ले यांनी विचारले आहे की, पुण्यामध्ये तपासाची गती एवढी कमी का आहे त्याचबरोबर

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

डॉ.नीलम गोऱ्हे......

पुण्यातील पोलिसांना मानकर भूखंड प्रकरणात सहआरोपी का करु नये असा प्रश्न विचारला आहे. पत्की पाच्छापूरकर खून खटल्यातील आरोपी सापडलेला  नाही. अभिषेक घोरपडे खून खटल्यातील त्या मुलाचे मुंडके मिळण्यासाठी 15 दिवस लागले.  मुंडक्याशिवाय देहाला अग्नी द्यावा लागला. तिसरी घटना जर्मन बेकरीची आहे.  तेथे एवढा मोठा स्फोट झाला होता, या प्रकरणातील आरोपी अजूनही सापडलेले नाहीत.  पुणे पोलिसांनी स्वत:ची पाठ थोपटून आम्हाला आरोपी सापडले आहेत असे सांगितले होते.  सन्माननीय गृह मंत्र्यांनी पुणे पोलिसांना प्रशस्तीपत्र दिले होते, त्यानंतर आरोपी चुकीचे होते असे लक्षात आले होते.   असे असून सुध्दा मंत्री महोदयांनी वरताण म्हणून सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांनी आम्हाला सभागृहात आश्वासन दिले होते की, या सगळया वाईट परिस्थितीचे जे कॅप्टन आहेत ते पोलीस आयुक्त श्री.सत्यपाल सिंह यांची बदली करण्यात येईल. यासंदर्भातील आश्वासनाचा तुम्ही भंग केलेला आहे. पुणे शहराचा कोणत्या पध्दतीने कारभार सुधारणार आहात त्यावर आपण काही प्रकाश टाकाल का ?

श्री.रमेश बागवे : सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी सांगितल्याप्रमाणे अभिषेक घोरपडे या लहान मुलाचा मुंडके विरहित अत्यंविधी करण्यात आला हे खरे आहे. अंत्यविधीच्या वेळी मी तेथे गेलो होतो त्यावेळी त्या मुलाच्या पालकांशी मी बोललो आहे. ही भयानक घटना घडली आहे त्याबद्दल दुमत नाही. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी शासन किंवा पोलीस खाते कमी पडलेले नाही. या प्रकरणाचा कसून तपास केल्यानंतर त्या मुलाच्या मुंडक्याचा तपास लागलेला आहे. ते मुंडके पाण्यामध्ये फेकण्यात आले होते.  त्याची डीएनए चाचणी करुन तपास केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश बागवे....

या पाच-सहा वर्षात पुणे शहर हे चारही बाजूंनी वाढलेले आहे. 15 हजार परदेशी विद्यार्थी पुण्यामध्ये शिक्षणासाठी येत असतात. उद्योगाच्या माध्यमातून, आय.टी,बी.टी.च्या माध्यमातून पुणे शहरातील वस्ती वाढलेली आहे. त्यामुळे गुन्हेगारीमध्येही काही प्रमाणात वाढ झालेली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस स्टेशनची मागणी केलेली आहे. सायबर सेल सारखी नवीन शाखा उघडून पोलीस खात्याला सक्षम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विविध सेल ॲक्टिव्हेट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पोलीस चौक्या सुरु केलेल्या आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या बाबतीत हे शासन कटीबद्ध आहे.

श्री. मोहन जोशी : पुणे शहर हे अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर आहे. याबाबतीत या सदनामध्ये यापूर्वी अनेक वेळा चर्चा झालेली आहे. पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या दोन्हीसाठी मिळून पुणे पोलीस शहर आयुक्तालय आहे. मुंबई आणि नागपूरच्या खालोखाल हे पुणे शहर असताना पुणे शहराला सातत्याने दुजाभावाची वागणूक मिळते. पुण्याच्या जर्मन बेकरीत बॉम्बस्फोट झाला. कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनसाठी अजूनही जागा उपलब्ध होत नाही. जेव्हा जेव्हा हा प्रश्न उपस्थित झाला त्या त्या वेळी पोलीस स्टेशनचे उद्‌घाटन आज होईल, उद्या होईल, परवा होईल असे सांगण्यात आले. परंतु अद्याप तेथे पोलीस स्टेशन सुरु झालेले नाही. तेव्हा कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन आपण कधी सुरु करणार आहात ? तसेच महिलांवरील अत्याचाराच्या ज्या नऊ घटना पुण्यातील हिंजवडी आणि अन्य परिसरामध्ये घडलेल्या आहेत त्याबाबत जलद गती न्यायालय नेमून ती प्रकरणे निकाली काढण्यात येतील असे माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. हे जलद गती न्यायालय केव्हा सुरु करण्यात येणार आहे ?

श्री. रमेश बागवे : कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अभियंते, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या बरोबर मिटींग घेऊन चर्चा करुन जागेच्या संदर्भातील प्रश्न सोडविला जाईल. जागेच्या संदर्भात दोन प्रस्ताव आलेले आहेत. ज्या जागेवर आरक्षण नाही ती जागा पोलीस स्टेशनसाठी योग्य होईल. अशा जागेच्या बाबतीत महिनाभरात निर्णय घेऊन बांधकामाला सुरुवात होईल. पुणे शहरामध्ये 6 पोलीस स्टेशनची मागणी करण्यात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे...

आलेली आहे. मार्केट यार्डातील पोलीस स्टेशनला मंजुरी मिळालेली आहे. अन्य 5 पोलीस स्टेशन देखील मंजूर करु. बलात्काराच्या प्रकरणातील आरोपी सुटलेले आहेत. त्या आरोपींना मोक्का कसा लावता येईल या दृष्टीने कारवाई करु.

...नंतर श्री. भोगले...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3.......... श्री.रमेश बागवे....

त्यांना इतक्या सहजी सोडणार नाही. त्यासाठी दक्षता घेऊन योग्य तो बंदोबस्त केला जाईल. याठिकाणी सांगण्यात आले की, राज्यमंत्र्यांनी आदेश दिले. सभागृहाच्या भावना शासनाच्या लक्षात आलेल्या आहेत. त्या भावनांशी शासन सहमत असून शासनाने निदेश दिलेले आहेत. वरिष्ठ नेतेमंडळी याबाबत निर्णय घेतील.

श्रीमती वंदना चव्हाण : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी लक्षात आणून दिले आहे की, पुण्यामध्ये पोलीस दल कमी पडत आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये नव्याने पोलिसांची भरती करण्यात येणार आहे. नवीन पोलीस भरतीच्या माध्यमातून पुणे शहरासाठी किती पोलीस कर्मचारी उपलब्ध होणार आहेत? एप्रिल, 2010 मध्ये माननीय गृहमंत्री पुणे शहरात आले होते. बलात्काराच्या वाढत्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने त्यांनी सर्व आमदारांना चर्चेसाठी बोलावले होते. 100 नंबरच्या हेल्पलाईनला योग्य तो प्रतिसाद मिळत नाही हे आम्ही गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी स्वत: दोनवेळा 100 नंबरवर फोन लावण्याचा प्रयत्न केला असताना त्यांनाही प्रतिसाद मिळाला नाही. 100 नंबरवर रिस्पॉन्स जास्त असल्यामुळे महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात दुसऱ्या क्रमांकाची हेल्पलाईन सुरु करावी, डेडिकेटेड वेगळा नंबर असावा अशी त्यांना विनंती केली असता 103 क्रमांकाची हेल्पलाईन सुरु करण्याचे त्यांनी निदेश दिले होते. 1 मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने पोलीस ग्राऊंडवर संचलनासाठी पोलीस विभागाची जी उभी वाहने होती त्या वाहनांवर महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात डेडिकेटेड 103 नंबरची हेल्पलाईन उपलब्ध असल्याचे नमूद केले होते. परंतु ही नवीन हेल्पलाईन आजतागायत सुरु झालेली नाही. याबाबत मंत्रीमहोदय खुलासा करतील काय?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, पुणे शहरासाठी 3000 पोलीस शिपायांची मागणी केली आहे. जास्तीत जास्त पोलीस शिपाई उपलब्ध होतील. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी सांगितले की, पुणे शहराला नेहमी सापत्नभावाची वागणूक दिली जाते. यापुढे असे होणार नाही. कारण मी सुध्दा पुणे शहराचा नागरिक आहे. पुणे शहरासाठी जास्तीत जास्त पोलीस शिपाई, निधी, शस्त्र, अस्त्र आणि वाहने उपलब्ध होतील. तो बॅकलॉग भरुन काढण्यात येईल. 103 हेल्पलाईनच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. नव्याने 26111103 या क्रमांकाची हेल्पलाईन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महिलांच्या तक्रारीसाठी सुरु करण्यात आली आहे. 103 क्रमांकाची हेल्पलाईन बंद असेल तर ती लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येईल. महिलांच्या दृष्टीने दक्षता घेऊन कारवाई करु.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये कायदा आणि सुव्यवस्था जवळजवळ संपुष्टात आल्यासारखी स्थिती आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या भावनेशी मी सहमत आहे. पुणे शहरात पोलीस दलाचे नेतृत्व करणारे पोलीस आयुक्त यांच्या बदलीबाबत मध्यंतरी चर्चा झाली होती. मुंबई शहरात बॉम्बस्फोटाची घटना घडली तेव्हा पोलीस आयुक्त श्री.हसन गफूर दोन दिवस आणि रात्र घटनास्थळी उभे असलेले मी स्वत: पाहिले होते. असे असताना त्यांची बदली झाली. त्याबद्दल मी जास्त बोलू इच्छित नाही. परंतु जर्मन बेकरीतील बॉम्बस्फोटाच्या घटनेबाबत उलटसुलट माहिती देणे, बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ होऊनही पुणे शहराच्या पोलीस आयुक्तांची बदली न होण्याची नेमकी कारणे काय आहेत? त्यांची बदली होणार असेल तर केव्हा होणार आहे याची मंत्रीमहोदय माहिती देतील काय?

श्री.रमेश बागवे : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मी जास्त विवेचन न करता एवढेच सांगू इच्छितो की, पोलीस आयुक्तांच्या बदलीबाबतच्या माझ्या भावना मी सभागृहात यापूर्वी व्यक्त केलेल्या असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती करणार नाही. या संदर्भात वरिष्ठ अधिकारी निर्णय घेतील.

श्री.हुसेन दलवाई : त्यांच्या दुष्कृत्यावर कोणी पांघरुण घालत आहे का?

**उपसभापती** : लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाबाबत चर्चा होत आहे. पोलीस आयुक्तांच्या बदलीबद्दल चर्चा करता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी आपला प्रश्न विचारावा.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ KTG/ D/ SBT/ श्री. भोगलेनंतर... 15:00

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, पुणे शहराच्या कायदा आणि सुव्यस्थेच्या बाबतीत सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी तारखे सहीत सर्व घटना सांगितलेल्या आहेत. असे असतांनाही माननीय मंत्रीमहोदयांकडून त्यास ठोस असे उत्तर दिले जात नाही. मुंबई आणि पुण्याची तुलना केल्यानंतर आपण सुध्दा मान्य करता की, पुण्याला मुंबईपेक्षा जास्त पोलिसांची आवश्यकता आहे. पुण्याला 10 हजार पोलिसांपेक्षा जास्त पोलिसांची गरज आहे त्यामुळे आपण पुणे शहराला 10 हजार पोलीस कधी उपलब्ध करुन देणार आहात? पुण्याला 10 हजार पोलिसांची गरज असतांना आपण केवळ 3 हजार पोलीस उपलब्ध करुन दिलेले आहे. पुण्याला 10 हजार पोलीस उपलब्ध करुन दिल्यानंतर पुण्याची कायदा आणि सुव्यवस्था चांगली राहील काय ?

तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पुण्यामध्ये नेहमी वाईट घटना घडत असतात त्यामुळे पुण्याच्या वरिष्ठ पोलीस अधिका-यांवर शासनाची जरब आहे काय ? हा प्रश्न केवळ बदलीसाठी नसून त्यासाठी शासन काय करणार आहे ? तसेच माझा तिसरा प्रश्न असा आहे की, पुण्याच्या कोरेगावपार्क या ठिकाणी मोठया प्रमाणात परदेशी नागरिक राहत आहेत. त्या ठिकाणी बॉम्बस्फोट झालेला असतांना सुध्दा त्या ठिकाणचा शोध अद्यापपर्यंत लागू शकलेला नाही. तसेच कोरेगाव पार्क येथे पोलीस चौकी होण्याच्या संदर्भात शासनाकडून अजून पर्यंत काहीही ठोस माहिती दिली जात नाही. कित्येक वर्षापासून हे शासन भिंवडीमध्ये पोलीस स्टेशन बनवू शकले नाही अशीच परिस्थिती कोरेगाव पार्कच्या संदर्भात आहे काय ?

श्री. रमेश बागवे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना कोरेगाव पोलीस स्टेशनच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, मी स्वत: कोरेगाव पार्क येथे पोलीस स्टेशन उभारण्यासाठी पुढाकार घेतलेला असून यासंदर्भात पोलीस आयुक्तांबरोबर तसेच पीडब्ल्यूडीच्या इंजिनिअर बरोबर बैठक घेतली असून एक महिन्याच्या आत यासंदर्भातील निर्णय होईल व या ठिकाणच्या पोलीस चौकीच्या कामाला सुरुवात होईल.

-----

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्यात आलेली आहे. आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : रायगड किल्ल्यावरील सिंहासनाधिष्ठीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयावर छत्र व मेघडंबरी उभारण्याबाबत

**मु. शी.** : रायगड किल्ल्यावरील सिंहासनाधिष्ठीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयावर छत्र व मेघडंबरी उभारण्याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महाराष्ट्रातील ऐतिहासिक परंपरा असलेल्या रायगड किल्ल्यावरील होळीचा माळ येथे असलेल्या सिंहासनाधिष्ठीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयावर छत्र उभारण्यात यावे अशा प्रकारची मागणी राज्यातील तमाम जनता करीत आहे. याकडे शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे, टाळाटाळ केलेली आहे व वेळकाढूपणाचे धोरण अवलंबविले आहे. या प्रकरणी अनेक सन्माननीय सदस्यांनी वारंवार विविध प्रश्नाद्वारे व विविध संसदीय आयुधांद्वारे सदरची बाब शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे त्यामुळे रायगड जिल्हयावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयावर छत्र व मेघडंबरी विनाविलंब उभारावी म्हणून सदरची बाब मी विशेष उल्लेखाच्या द्वारे या ठिकाणी मांडत आहे.

धन्यवाद

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : न्यायाधीशांची नेमणूक तातडीने करण्याबाबत

**मु. शी.** : न्यायाधीशांची नेमणूक तातडीने करणे याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

गेल्या चार महिन्यापासून महाराष्ट्र महसूल न्यायाधीकरणाच्या पुणे खंडपीठास गेल्या चार महिन्यापासून न्यायाधीशांचे पद रिक्त असल्याने न्यायाधीकरणाचे कामकाज ठप्प झालेले आहे. पुणे,सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर अशा पुणे विभागातील पाच जिल्हयातील महसूली दावे महाराष्ट्र महसूल न्यायाधीकरणातर्फे चालविले जात असून या न्यायाधीकरणाच्या न्यायाधीशांच्या नेमणुका राज्याच्या महसूल विभागाकडून केल्या जातात. कुळ कायदा व इतर जमिनीच्या खटल्याबाबत प्राधिका-यांनी दिलेल्या निकालावर या न्यायाधीकरणात अपील केले जाते. त्यामुळे या न्यायाधीकरणाच्या निकालावर हजारो अपीलकर्त्यांचे भवितव्य अवंलबून असते. न्याधीकरणाचे संपूर्ण कामकाज ठप्प झालेले असून त्याचा गैर फायदा गरीब शेतक-याकडून जागा बळकावणा-या धन दांडग्यांकडून होत आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर या शहरांचा आसपासचा भाग झपाटयाने विकसित होत असल्याने त्या ठिकाणच्या जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत त्यामुळे येथील गरीब शेतक-यांच्या जमिनी बळकावण्याच्या टोळया तयार झालेल्या आहेत. यातून कुळकायदा व इतर महसुली दाव्यांची संख्याही वाढली आहे त्यामुळे या ठिकाणी न्यायाधीशांची नेमणूक लवकरात लवकर करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्हयातील परळी येथील शाळांची दुरवस्था

**मु. शी.** : बीड जिल्हयातील परळी येथील शाळांची दुरवस्था याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, बीड जिल्हयातील परळी तालुक्यातील 164 शाळांपैकी 44 जिल्हा परिषद शाळांची दुरुस्ती आवश्यक असणे, 64 पैकी 7 शाळांना इमारती नसणे, किरायाच्या जागेवर शाळा भरवणे, प्राथमिक वर्ग खोल्या 396 आणि माध्यमिक वर्ग खोल्या 186 पैकी 42 शाळा खोल्यांची दुरुस्ती पुन्हा आवश्यक असणे, 111 शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे व ती सुध्दा व्यवस्थित नाही. 50 शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, 75शाळामध्ये मुलींचे वसतिगृह आहे परंतु त्यापैकी त्यातील 49 शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह नाही. मुलांच्या 20 शाळांमध्ये स्वच्छतागृह नाही. 79 शाळांना संरक्षण भिंती नाही. 90 शाळांना क्रिडांगणे नाहीत, 26 शाळांमध्ये मुख्याध्यापकास बसण्यासाठी कार्यालय नाही व 6 शाळांमध्ये मध्यान्ह भोजनाची व्यवस्था नाही. अशी बीड जिल्हयातील परळी येथील शाळांची अवस्था आहे. त्यामुळे शासनाने तातडीने उपाययोजना करावी याबाबत मी आपल्या सहमतीने विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे.

धन्यवाद.

---------

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्वंकष धोरण आखणे

**मु. शी.**: ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्वंकष धोरण आखणे याबाबत डॉ.दीपक सावंत,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य डॉ.दीपक सावंत,वि.प.स.यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर विभाग) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये धोरणांची घोषणा करण्याचे पीक आले आहे. पण दुर्दैवाने या राज्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी कोणतेही धोरण नाही. मुंबईच्या सिल्व्हर इंनिंग फाऊंडेशन व सोसायटी फॉर सर्व्हिंग सिनियर्स यांनी नुकतेच सर्वेक्षण केले. त्यातून फार गंभीर माहिती समोर आली आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार 6.9% वृद्धांची संख्या आहे आणि सन 2026 साली 12.4% इतकी होईल. कारण माणसाचे आयुष्यमान वाढत आहे.वृद्ध किंवा ज्येष्ठ नागरिकांना कौटुंबिक, सामाजिक संरक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. या विषयीचा कायदा अस्तित्त्वात नाही. शेवटचा कायदा श्रीलंकेमध्ये सन 2000 साली झाला. अमेरिकेने मात्र 1965 साली वृद्धांसाठी कायदा केला. भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये वृद्धाश्रमांची संख्या देखील कमी आहे. त्यामुळे या विशेष उल्लेखाद्वारे माझी अशी विनंती आहे की, ज्येष्ठ नागरिकांना छळणाऱ्यां विरूद्धचा गुन्हा हा अजामिनपात्र असावा. अशी मागणी देखील 75 टक्के ज्येष्ठांनी केली आहे. वृद्धांसाठी फास्ट ट्रॅक कोर्ट असावे. अशा अनेक मागण्यांसाठी वृद्ध आज चिंतेत आहेत. माझी आपल्या मार्फत आपल्याला विनंती आहे की, आपण ज्येष्ठांसाठी येऊ घातलेले धोरण ताबडतोब जाहीर करावे आणि ते सर्वंकष असावे असे विचार मी या विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रेडिओ क्लब,वेलिंग्टन क्लब,मुंबई जिमखाना यांच्या सभासदत्त्वा बाबतची नियमावली दुरूस्त करण्याबाबत.

**मु. शी.** : रेडिओ क्लब,वेलिंग्टन क्लब,मुंबई जिमखाना यांच्या सभासदत्त्वा बाबतची नियमावली दुरूस्त करण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स.यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना रेडिओ क्लब, वेलिंग्टन क्लब, मुंबई जिमखाना वगैरे क्लबचे सभासदत्व मिळण्यासाठी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारा गेल्या दोन वर्षापासून प्रत्येक अधिवेशनात पाठपुरवठा करण्यात येत आहे. माननीय सभापतींच्या निदेशानुसार संबंधित मंत्री महोदयांच्या दालनातही बैठक घेण्यात आली होती. विधिमंडळाच्या आश्वासन समितीने संबंधित क्लबच्या संचालकांना साक्षीसाठी बोलाविले आहे, असे समजते. परंतु, आजतागायत कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय होऊ शकलेला नाही.

महाराष्ट्र राज्यातील एक शिक्षण सम्राट, त्रिपुरा राज्याचे सन्माननीय राज्यपाल पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील यांना देखील मुंबईतील अग्रगण्य वेलिंग्टन क्लबचे प्रवेश शुल्क व नियमाप्रमाणे इतर सर्व क्लबच्या रकमा भरून रितसर सभासदत्व बहाल केल्यानंतरही त्यांचे सभासदत्त्व रद्द करण्यात आलेले आहे. या प्रमाणे खाजगी क्लब ज्यांना शासनाने अत्यल्प दरात भूखंड दिलेले आहेत, त्यांच्याकडून मान्यवरांना मिळत असलेली वागणूक ही अत्यंत अपमानास्पद असून अशा क्लबवर वचक बसावा यासाठी योग्य ते कडक नियम अंमलता आणण्याची गरज आहे. त्यासाठी क्लबच्या सभासदत्त्वाबाबतची नियमावली दुरूस्त करण्याची गरज आहे. त्याबाबत योग्य ती कार्यवाही शासनाने करावी. अशा सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या बाबींकडे मी या विशेष उल्लेखाद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

.............



BGO/ SBT/ KTG/ 15:05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे शिवाजी पार्क,दादर,मुंबई येथील सावरकर सदन ऐतिहासिक वास्तू म्हणून घोषित करणे

**मु. शी.** : स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे शिवाजी पार्क,दादर,मुंबई येथील सावरकर सदन ऐतिहासिक वास्तू म्हणून घोषित करणे याबाबत श्री.किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.किरण पावसकर,वि.प.स.यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

माझा विशेष उल्लेख राष्ट्रपुरूष स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या संबंधात आहे. या सदनामध्ये शाहू,फुले,आंबेडकर यांचे नाव घेऊन भाषणाला सुरूवात करण्यात येते. मी दु:खद अंत:करणाने हा विशेष उल्लेख मांडत आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी फ्रान्समधील मर्सोलिस समुद्रामध्ये उडी मारण्याला 8 जुलै रोजी 100 वर्षे पूर्ण झाली. आपण फक्त काव्यामध्ये म्हणत आलो की, "ने मजसी ने परत मातृभूमिला." स्वातंत्र्यवीर सावरकर दादरला ज्या घरात राहिले ते घर हेरिटेज प्रॉपर्टी म्हणून घोषित करण्यासाठी शासनाची आत्मियता किती आहे हे दिसून येते. सावरकरांचे निवासस्थान - सावरकर सदन, शिवाजीपार्क, दादर, मुंबई येथे आहे. सदर ऐतिहासिक वास्तू ग्रेड-2 ए म्हणून घोषित करावी म्हणून वारंवार मागणी करण्यात आली आहे.

यानंतर श्री.अजित...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

या मागणीसाठी माननीय उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे दाखल केलेल्या जनहित याचिकेवर माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 18 ऑक्टोबर, 2008 रोजी राज्य शासनाने 12 आठवड्यात निर्णय घ्यावा असे स्पष्ट दिलेले निर्देश, राज्य शासनाने या संदर्भात कोणताही निर्णय न घेतल्याने शासनाने मुदतवाढीसाठी अर्ज करुन न्यायालयाने पुनश्च मुदतवाढ देणार नाही अशाप्रकारचे ताशेरे ओढून चार आठवड्यांची देण्यात आलेली मुदतवाढ संपून आज तीन महिने होऊनही आजतागायत शासनाने निर्णय न घेणे, सदरहू वास्तू ही ऐतिहासिक वास्तू ग्रेड-दोन-अे म्हणून मान्यता देण्याबाबत शासन करीत असलेली टाळाटाळ, माननीय उच्च न्यायालयाची होत असलेली अवहेलना याबाबत शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन सावरकर सदनाला ग्रेड-दोन -अे हेरिटेज प्रॉपर्टी म्हणून मान्यता द्यावी अशी मी विनंती करीत आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सहभागाचे योग्य मूल्यमापन करण्याबाबत

**मु. शी.** :संयुक्त महाराष्ट्राच्या चववळीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सहाभागाचे योग्य मूल्यमापन करणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

महाराष्ट्रातील सर्व विरोधी राजकीय पक्षांनी एकत्र येऊन 106 हुतात्म्यांनी आहुती देत संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यासाठी तीव्र लढा दिला. त्यामुळे दिनांक 1 मे 1960 रोजी मराठी भाषिकांचे "महाराष्ट्र राज्य" उदयाला आले हा इतिहास सर्वश्रुत आहे. या घटनेला यंदा अर्धशतकाचा काळ लोटला असून महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. या निमित्ताने एका दुर्लक्षित ऐतिहासिक घटनेकडे लक्ष वेधीत आहे. ती घटना म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा या चळवळीतील सहभाग. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सल्ल्याने त्यांचे सर्व नेते, कार्यकर्ते, आणि अनुयायी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी झाल्याने या लढ्याला अधिक तेज आले. परळ, गिरणगाव भागातील मिल कामगार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या सहभागाने ही चळवळ परिणामकारकरित्या यशस्वी झाली. संयुक्त महाराष्ट्र लढ्यावर आतापर्यंत जे ग्रंथ प्रसिध्द झाले त्यात केवळ घडलेल्या घटनांची जंत्री तेवढी वाचायला मिळते. परंतु प्रबोधनकार ठाकरे यांच्या "माझी स्मरणगाथा" या आत्मचरित्रात या चळीवळीमागील बौध्दिक स्त्रोताचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला पुरवठा याचा स्पष्ट उल्लेख आढळतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला नसला तरी त्या लढयासाठी त्यांनी दिलेली वैचारिक लढाई ही चळवळी यशस्वी होण्याची उपयुक्त ठरली

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आहे, याचा विसर सर्वांनाच पडलेला आहे. तरी राज्य शासनाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील सहभागाबाबत योग्य ते मूल्यमापन व्हावे. याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा वारंवार उल्लेख होतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे अनेक ग्रंथ प्रकाशित होत आहेत. पूर्वी देखील अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये विरोधी आणि सत्ताधारी पक्षाची माणसे एकत्र येऊन 106 जणांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा या चळवळीतील सहभाग जेवढ्या प्रमाणात समोर यावयास पाहिजे तेवढा तो आला नाही. मी याठिकाणी सांगू करु इच्छिते की, प्रबोधनकार ठाकरे यांनी "माझी स्मरणगाथा" या आत्मचरित्रामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने या लढ्यास सुरुवात झाली." प्रबोधनकार ठाकरे यांनी डॉ.बाबासाहेबांना विनंती केली होती की, आपण या संयुक्त लढ्याचे नेतृत्व करावे. परंतु डॉ.बाबासाहेबांनी सांगितले की, माझ्या नेतृत्वाखाली सर्व नेते एकत्र येणार नाहीत, तेव्हा आपण लढा उभारावा, मी आणि माझे अनुयायी निश्चितपणे लढ्याच्या पाठीशी उभे राहू". आश्चर्याचा भाग म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यासाठी वेळोवेळी पत्रके काढून, सार्वजनिक भाषणे करुन, टाईम्स ऑफ इंडियामध्ये लेख लिहून आणि राज्यसभेत दोनवेळा भाषणे करुन डॉ.बाबासाहेबांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला पाठिंबा दिला. इतकेच नव्हे तर त्यांनी या चळवळीवर दोन पुस्तके लिहिली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अखेरचा श्वास घेईपर्यत म्हणजे 6 डिसेंबर 1956 पर्यंत वेगवेगळ्या प्रश्नांवर अनेक भूमिका मांडल्या आहेत. मुंबई ही संयुक्त महाराष्ट्रामध्ये असली पाहिजे ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती आणि त्याचा राज्य शासनाला विसर पडला आहे की काय अशी शंका वाटते. तेव्हा राज्य शासनाने या सुवर्ण महोत्सवी वर्षात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महाराष्ट्र चळवळीतील सहभागाचे मूल्यमापन करण्यासाठी एक ग्रंथ आणि त्या संदर्भातील संदर्भ एकत्रित करावेत अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शालेय क्रीडा स्पर्धांसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता

**मु.शी.** : शालेय क्रीडा स्पर्धांसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

शालेय क्रीडा स्पर्धामध्ये दरवर्षी खेळाडूंची संख्या वाढत आहे. पंचवीस गुणांमुळे खेळांचे महत्व वाढले आहे. मात्र प्रत्येक खे्ळासाठी शासकीय तरतूद केवळ अडीच हजार रुपये आहे. एवढया कमी रकमेत स्पर्धेचे आयोजन करणे अवघड गोष्ट असली तरी काही खर्चाना फाटा देऊन स्पर्धा घेण्यात येतात. जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय आणि महापालिकेच्या माध्यमातून महापालिका हद्दीतील शाळांसाठी शालेय क्रीडा स्पर्धा घेण्यात येतात. उर्वरित जिल्ह्यातील (ग्रामीण भाग) शाळांच्या स्पर्धा क्रीडा कार्यालयातर्फे घेण्यात येतात. शहरी पातळीवर होणाऱ्या सर्व क्रीडा स्पर्धांची आर्थिक बाजू महापालिका पाहते. ग्रामीण भागातील क्रीडा स्पर्धांचा खर्च क्रीडा कार्यालयास करावा लागतो. महापालिका हद्दीतील शालेय क्रीडा स्पर्धा 42 खेळांच्या होतात. ग्रामीण भागातील स्पर्धांची संख्याही 42 आहे. प्रत्येक खेळासाठी अडीच हजार रुपयांची शासकीय तरतूद आहे. ही तरतूद अनेक वर्षापासून आहे, त्यात वाढ झालेली नाही. त्यामुळे प्रवेश शुल्क रकमेचाही उपयोग करावा लागतो. कोणत्याही खेळाचे आयोजन करण्याकरिता अडीच हजार रुपये रक्कम कमीच आहे. किमान साडेसात हजार ते आठ हजार रुपये इतकी रक्कम असायला हवी. अडीज हजार रुपयांमध्ये क्रीडांगण तयारी, पंचांचे मानधन, प्रमाणपत्र, क्रीडा साहित्य, उद्घाटन व समारोप कार्यक्रम आदिंचा खर्च समाविष्ट आहे. साहजिकच ही रक्कम कमी पडत असल्याने अनेक खर्चाना फाटा द्यावा लागतो. तेव्हा स्पर्धांच्या दर्जावर परिणाम होऊ नये यासाठी क्रीडा स्पर्धेसाठी शासनाने भरीव आर्थिक तरतूद करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-------

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बहुमत नसतांनाही गडचिरोली नगरपालिकेच्या नगराध्यक्षांविरुध्द पारित करण्यात आलेला अविश्वासाचा ठराव

मु.शी. : बहुमत नसतांनाही गडचिरोली नगरपालिकेच्या नगराध्यक्षांविरुध्द पारित करण्यात आलेला अविश्वासाचा ठराव याबाबत श्री.जैनुद्दिन जव्हेरी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जैनुद्दिन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

" दिनांक 25.06.2010 रोजी गडचिरोली नगराध्यक्षाविरुध्द अविश्वास ठराव ठेवण्यात आला होता. ठराव वेळेवर न घेता दोन तास उशिरा घेण्यात आला. वरिष्ठ अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या दबावात येऊन अनेक अनियमितता असतांनाही ठराव पारित करण्यात आला. ठराव चालू असतांना फोन वरील निर्देशानुसार ठराव पारीत करण्यात आला. ठराव चालू असतांना फोन वरील निर्देशानुसार ठराव पारित करण्यात आला. हा फोन कोणाचा होता ? तसेच महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती अधिनियम 1965 चे कलम 55 (1) अन्वये अविश्वास ठराव पारीत होण्याकारिता कमीत कमी 3/4 म्हणजे 75 टक्के बहुमत आवश्यक असते. ठरावाच्या बाजूने 23 पैकी 17 सदस्य होते म्हणजेच बहुमत नसतांनाही ठराव पारीत करण्यात आला अशा अनेक अनियमितता असतांना महिला नगराध्यक्षाविरुध्द अविश्वास ठराव पारित करणा-या प्रिसायडिंग अधिकारी व त्यांना प्रेरित करणा-या अधिका-यांवर कारवाई करुन निलंबित करण्यात यावे अशी मागणी मी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहास करीत आहे"

--

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि 4.00 वाजता पुन: भरेल.

( 3.17 ते 4.00 पर्यत मध्यंतर )

नतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम

**मु.शी.**: शैक्षणिक धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे प्रवेश प्रक्रियेवर होणारे परिणाम या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हुसेन दलवाई, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, उल्हास पवार, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री विनोद तावडे, जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री रामनाथ मोते, कपिल पाटील, परशुराम उपरकर, संजय दत्त, भगवान साळुंखे, किरण पावसकर, चरणसिंग सप्रा, चंद्रकांत पाटील, रामदास कदम, राजन तेली, धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, कपिल पाटील व अन्य माननीय सदस्यांनी नियम 97 अन्वये काल शिक्षण विभागावर एक अल्पकालीन चर्चा उपस्थित केली. त्या चर्चेमध्ये भाग घेतांना त्यांनी बेस्ट ऑफ फाईव्ह व शिक्षणाचा हक्क या दोन विषयासंबंधी आपले विचार मांडले. त्याबद्दल मी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व अन्य माननीय सदस्यांचे निश्चितपणे आभार मानतो. सद्या शिक्षणाच्या संदर्भात राज्यामध्ये दोन विषय गाजत आहेत. त्यामध्ये इयत्ता अकरावीमध्ये प्रवेश घेण्यासाठी बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात घेण्यात आलेला निर्णय आणि त्याचबरोबर राईट टू एज्युकेशन या दोन विषयावर चर्चा झाली व त्या निमित्ताने अनेक विचार

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

याठिकाणी मांडण्यात आले. या चर्चेच्या निमित्ताने या सदनामार्फत महाराष्ट्राला शासनाचे धोरण सांगण्याची मला संधी उपलब्ध करुन दिली आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये बेस्ट ऑफ फाईव्हचा विषय गेला महिनाभर गाजत आहे. त्या संदर्भात काल माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. त्यामुळे या विषयावर काही कालावधीकरिता तरी पडदा पडला आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देतांना महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण विभागाने, माध्यमिक शिक्षण मंडळाने बेस्ट ऑफ फाईव्हच्या स्वीकारलेल्या धोरणाला मान्यता दिली आहे. त्याचबरोबर कोर्टामध्ये गेलेल्या आय.सी.एस.ई. च्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना व विद्यार्थ्यांना सुध्दा सर्वोच्च न्यायालयाने दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. अशाप्रकारचे एक बॅलन्स जज्जमेंट त्या निमित्ताने आले आहे. त्या निर्णयाचे मी स्वागत करतो. सभापती महोदय,महाराष्ट्रामध्ये बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय घेण्यात आल्यानंतर व माननीय उच्च न्यायालयाने त्याच्या अंमलबजावणीला स्थगिती आदेश दिल्यानंतर त्यावर खूप टिका करण्यात आली. सुरुवातीला बेस्ट ऑफ फाईव्ह सूत्राचे स्वागत करणारे व आपले म्हणणारे लोक उच्च न्यायालयाचा निर्णय आपल्या विरोधात गेल्यानंतर वेगळे बोलायला लागले. अशाप्रकारचा अनुभव सर्वांना येत असतो हे आपल्याला नाकारता येत नाही.सुरुवातीला बेस्ट ऑफ फाईव्हचे सूत्र चांगले म्हटल्यानंतर ते कशासाठी तयार केले अशाप्रकारे विरोधात बोलायला लागले. ज्यांनी सुरुवातीला समर्थन केले तेच लोक विरोधात जायला लागले. त्यामुळे राज्यामध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. आणि म्हणून माध्यमिक शिक्षण मंडळाचे धोरण असो किंवा राज्य शासनाचे धोरण असो, त्या धोरणाच्या हेतूविषयी शंका घेण्याचे कारण नाही हे मी अत्यंत स्पष्टपणे याठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेमध्ये दोन-तीन गोष्टींबाबत सूचना करण्यात आल्या. सुरुवातीला 70:30 चा निर्णय झाला, त्यानंतर 90:10 चा निर्णय झाला, त्यानंतर पर्सेंटाईलचा निर्णय झाला त्याबद्दल सर्वत्र चर्चा व्हावयास लागली. या सर्व निर्णयामधील मूलभूत फरक मला याठिकाणी सांगितला पाहिजे की, ही निर्णय प्रक्रिया करीत असतांना माननीय न्यायालयाने शासनाला सांगितले होते की, आपण निर्णय प्रक्रिया वेळेमध्ये पार पाडावी आणि ती विद्यार्थ्यांना समजेल याबाबत काळजी घ्यावी.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय घेण्याची प्रक्रिया ऑक्टोबरमध्ये सुरु झाली. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये एसएससी बोर्डाच्या पातळीवर चर्चा झाली. त्यांच्या विद्वतसभेमध्ये चर्चा झाली. बेस्ट ऑफ फाईव्ह स्वीकारावयाचे की नाही याबाबत सात बोर्डांमध्ये चर्चा झाली. त्यांच्या मान्यतेने हा विषय राज्य शासनाकडे आला. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत लोकमत मागविण्यात यावे असे सांगितले. त्याप्रमाणे डिसेंबर-जानेवारीमध्ये हा बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय लोकमताकरिता वेबसाईटवर टाकण्यात आला. तसेच वर्तमानपत्रामध्ये जाहीर करण्यात आला. त्याला जवळपास 300 सूचना आल्या. त्यापैकी 25 टक्के सूचना थोडयाशा निगेटिव्ह स्वरुपाच्या होत्या परंतु 75 टक्के सूचना या निर्णयाचे स्वागत करणाऱ्या होत्या. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे रँन्डम पध्दतीने सूचना घेतल्या असे काही झालेले नाही. काल या विषयावर चर्चा होत असताना थोडी चूक होत होती. रॅन्डम पध्दतीने सूचना मागविल्या नव्हत्या तर निर्णय वेबसाईटवर टाकला होता. वृत्तपत्रात जाहीर केले आणि त्याला पुन्हा-पुन्हा मुदतवाढ दिली. आणि सूचना करण्यास सांगितले होते. याबाबतीत आयसीएसई बोर्डानेसुध्दा सूचना द्यावयास हरकत नव्हती. महाराष्ट्रातील संपूर्ण वर्तमानत्रात यासंबंधीचे लेख आले होते. परंतु त्यावेळी त्यांच्याकडून सूचना आल्या नाही. त्यानंतर अत्यंत विचारांती हा बेस्ट ऑफ फाईव्हचा निर्णय घेतला. सन्माननीय हायकोर्टाने तो थांबविला. परंतु राज्य शासन त्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आणि यासंबंधीचा निर्णय झालेला आहे.

सन्माननीय सदस्य डॉ. सावंत, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्या मुद्यांच्यामागे काय घडले याच्या खोलात मी मुद्दाम जात नाही. त्यावर चर्चा करावी असे मला वाटत नाही. कारण कोर्टाच्या निर्णयाच्या बाबतीत आपण काही न बोलणे ही चांगली गोष्ट आहे. पण या निर्णयाच्या पुढच्या दृष्टीने डॉ. सावंत यांनी काही मुद्दे मांडलेले आहेत. भविष्य काळातील मुद्यांच्या बाबतीत विचार केला पाहिजे, असे मला वाटते. मागे काय घडले या बाबतीत प्रत्येक जण वेगवेगळया दृष्टिकोनातून मांडू शकतो. आता हा प्रश्न केवळ मुंबईपुरता मर्यादित वाटत असला तरी निर्णय घेत असताना समानीकरण हा एक उद्देश होता. आपले एसएससी बोर्ड आहे. या बोर्डात सहा विषय आहेत. सहा पैकी सहा विषयात पास व्हावे लागते.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

आयसीआयसी बोर्ड आहे. या बोर्डात सहा विषय आहेत या साहा विषयापैकी पाच विषयात पास झाले तरी चालते. आयसीएसई बोर्ड आहे. या बोर्डात सात विषय आहेत. आणि मोठया यादीतून ते सात विषय निवडतात. त्यामध्ये तीन टप्पे आहेत. परंतु दोन विषयात नापास झाले आणि पाच विषयात पास झाले तरी चालते. या सगळयाचे समानीकरण करावयाचे आहे. एसएससी बोर्डातील आपल्या कुटुंबातील विद्यार्थीसुध्दा एका विषयामुळे माझे पर्सेंटेज घसरले याचे दु:ख करीत असतो. त्यामुळे समानीकरण करीत असताना त्याचा तणाव कमी करण्याचा प्रयत्न होता. 16 लाख विद्यार्थ्यांकरिता हा निर्णय होता. या निर्णयाच्या बाबतीत गैरसमज होऊ शकतो. मुंबईतील चार-पाच कॉलेजसाठी हा निर्णय घेतला असे त्याचे स्वरुप नाही तर महाराष्ट्रात एसएससी बोर्डाचे 16 लाख विद्यार्थी आहेत. त्यांच्यावर खूप तणाव आहे. आपण डिसेंबर-जानेवारीचा कालखंड आठवला तर शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची चर्चा होती. त्याच कालखंडात शासन स्तरावर बेस्ट ऑफ फाईव्हची चर्चा चालू होती. विद्यार्थ्यांवरील तणाव कसा दूर करणार, त्यांना चिंतामुक्त कसे करणार याबाबत सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर विचारले जात होते. बाकीच्या बोर्डाचा अभ्यास करीत असताना असे लक्षात आले की, हा तणाव दूर करण्यासाठी त्या विद्यार्थ्याला एखादा विषय अवघड जात असेल तर त्याला त्या विषयामध्ये थोडीशी सवलत द्यावी.

सभापती महोदय, कोणत्याही बोर्डाने घेतली नाही इतकी क्वालिटीच्या बाबतीतील काळजी महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे. सहा विषया पैकी एका विषयाचे मार्क धरण्यात येणार नाहीत पण सहा विषयात पास झाले पाहिजे असा बाकीच्या बोर्डात नसलेला निर्णय गुणवत्ता टिकविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. एका बाजूला तणाव कमी करीत असताना गुणवत्ता टिकविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. जसा ताणास कमी करण्यासाठी हा निर्णय महत्वाचा ठरतो तसा इयत्ता अकरावीच्या प्रवेशाच्या दृष्टीने देखील हा निर्णय महत्वाचा ठरतो. मुंबईमधील पाच-सात कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्याचा विद्यार्थ्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे हा निर्णय आता कदाचित मुंबई करिता महत्वाचा वाटत असेल परंतु पुणे, नागपूर, औरंगाबाद येथील महाविद्यालयांची संख्या वाढत आहे व जिल्हयाच्या पातळीवर सुध्दा सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळा उघडल्या जात आहेत. तालुक्याच्या पातळीवरसुध्दा या शाळा उघडायला सुरुवात झालेली आहे. काही काळामध्ये असे चित्र निर्माण होईल की, या तीन चार बोर्डाच्या

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात......

बाबतीतले  प्रवेशाचे सूत्र कसे असावे हे ठरविणे सुध्दा आवश्यक होईल. हे नाकारता येणार नाही. विद्यार्थी शेवटी कोणीही असला तरी महाराष्ट्रातील विद्यार्थी हा आपलाच असतो. त्याबाबतीत आपल्याला शंका बाळगण्याचे कारण नाही. त्याच्या हिताची काळजी घेणे ही जबाबदारी राज्य शासनाची आहे.

यानंतर श्री. बरवड...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

त्याचे समानीकरण करीत असताना असमानता असू नये हा विचार करावा लागेल. एकंदर विषय घेण्याची पध्दत, गुण देण्याची पध्दत यामुळे खूप फरक पडतो. या निमित्ताने आपण सुप्रीम कोर्टामध्ये गेलो. जरी कोर्टाचा आदेश अंतरिम अशा प्रकारचा असला तरी या वर्षात आणखी हिअरींग होणार आहेत. या बाबतीत आपण निर्णय करणार आहोत. आपले जे बोर्ड आहे त्याच्या स्वायत्ततेच्या दृष्टीने निर्णय घ्यावयाचा आहे. दुसरे म्हणजे या बोर्डाचे जे विद्यार्थी आहेत त्यांना कशा पध्दतीने प्रवेश दिला जाईल याबाबतीत सुध्दा कायमस्वरुपी निर्णय आम्हाला अपेक्षित आहे. तसा प्रयत्न राज्य शासनाचा, शिक्षण विभागाचा राहील याची ग्वाही देतो. जर हा प्रश्न कायम त्रास देणार असेल आणि त्यावर निर्णय होऊ शकत नसेल तर सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे वेळ प्रसंगी कायदा करण्याची वेळ आली तर तो कायदा करावा लागेल हे सुध्दा या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो. एक प्रश्न आता मार्गी लागलेला आहे आणि 16 तारखेपासून आपले प्रवेश सुरु होत आहेत. आम्ही जी काळजी घेतली त्या पध्दतीने मागच्या वर्षी ऑन लाईन पध्दत खूप गाजली होती. त्यातील ज्या त्रुटी होत्या त्या दूर करुन या वर्षी ऑन लाईन प्रवेशाची व्यवस्था व्हावी याची पूर्ण काळजी घेऊन योग्य पध्दतीने प्रवेश पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी दुसरी महत्वाची चर्चा राईट टू एज्युकेशनच्या संदर्भात झाली. या सभागृहामध्ये हे दोन विषय एकत्र करावयास नको होते असे मला वाटते. राईट टू एज्युकेशन या विषयावर स्वतंत्र चर्चा व्हावी अशी माझी अपेक्षा होती. माझी तशी इच्छा असली तरी शेवटी जसा प्रस्ताव होता त्यावर आपण चर्चा केलेली आहे. या निमित्ताने याबाबत प्राथमिक चर्चा झ ााली असे आपण समजू या. पुढच्या अधिवेशनामध्ये बारकाव्याने हा विषय घ्यावा लागेल हे मी नाकारत नाही. पुढच्या शिक्षणाच्या दृष्टीने हा एक महत्वाचा निर्णय आहे हे मी नाकारत नाही. आपल्या राज्यघटनेमध्ये जे मार्गदर्शक तत्व दिलेले आहे त्यामध्ये सहा वर्षाच्या होणाऱ्या प्रत्येक मुलाला 14 वर्षापर्यंत मुक्त शिक्षण आणि कंपल्सरी शिक्षण दिले पाहिजे अशा प्रकारचे मार्गदर्शक तत्व आहे आणि त्याला लवकरच हक्कामध्ये रूपांतरित करावे असे म्हटले आहे. आपण 2002 मध्ये राज्य घटनमध्ये बदल केला आणि त्याला हक्कामध्ये रूपांतरित केलेले आहे. प्रत्येक सहा वर्षाचे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. बाळासाहेब थोरात .....

होणारे मूल शाळेमध्ये गेले पाहिजे आणि 14 वर्षापर्यंत शिकले पाहिजे. त्याला आपण शिक्षणाचा अधिकार म्हणतो. त्या मुलाचा तो शिक्षणाचा अधिकार आहे. त्याला शिक्षणाचा हक्क म्हणतो. त्या मुलाचा तो शिक्षणाचा हक्क आहे. आपण सक्तीचे शिक्षण म्हणतो त्यामध्ये सक्ती कोणावर आहे ? ती सक्ती मुलावर नसून सरकारवर आहे, समाजावर आहे, पूर्णवेळ शिक्षकांवर आहे तसेच आपणा सगळ्यांवर आहे. त्या मुलाची काळजी घेतली पाहिजे आणि तो शिकला पाहिजे अशा प्रकारचा अधिकार देणारा तो निर्णय आहे. 2002 मध्ये त्याचे हक्कामध्ये रुपांतर झाले. तो हक्क देण्यात आल्यानंतर 2009 मध्ये त्याचे कायद्यामध्ये रुपांतर करण्यात आले. 1 एप्रिल 2010 रोजी माननीय पंतप्रधानांनी स्वत: रेडियो आणि दूरदर्शनवर फार सुंदर भाषण करुन हे संपूर्ण देशाने स्वीकारावे आणि यामध्ये सहकार्य करावे, देशातील प्रत्येक सहा वर्षाच्या होणाऱ्या मुलाची जबाबदारी देशाने घ्यावी अशा प्रकारचे आवाहन केले.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगेन की, आपण एका टप्प्यापर्यंत शिक्षणाच्या बाबतीत क्रांती केली असली तरी शिक्षणाच्या क्षेत्रात दुसरी महत्वाची क्रांती शिक्षणाच्या हक्काच्या निमित्ताने आपण करीत आहोत. यामध्ये सर्वांवर एक जबाबदारी आलेली आहे. सहा वर्षाचे होणारे प्रत्येक मूल शाळेमध्ये गेलेच पाहिजे. आपली दुसरी जबाबदारी अशी आहे की, त्या शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलाने 14 वर्षेपर्यंत शिकत गेले पाहिजे. त्यांची गळती व्हावयास नको. तिसरी जबाबदारी अशी आहे की, कोणी शाळा सोडून गेल्यामुळे गळती झाली तर त्यांने पुन्हा शाळेमध्ये आले पाहिजे आणि त्याला शिकविले गेले पाहिजे, त्याला चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणजे त्याला शाळेमध्ये आणणे, टिकविणे आणि शिकविणे असे याचे स्वरुप आहे. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एक गैरसमज मला पहावयास मिळतो. यामध्ये आठवीपर्यंत परीक्षा नाही अशा प्रकारची चर्चा होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ प्रथम श्री.बरवड 16:15

श्री.बाळासाहेब थोरात....

बरेच सन्माननीय सदस्य किंवा मोठी नेते मंडळी असतील, ग्रामपंचायतीचे सरपंच असतील ते सुध्दा असे म्हणू लागले आहेत की, आता काय चालू केले आहे, आठवीपर्यंत परीक्षाच होणार नाही. आता कसे व्हायचे ? यामध्ये परीक्षा आहे. परंतु कशा प्रकारची परीक्षा असेल ? आतापर्यंत ओरिएण्टेड शिक्षण होते. परीक्षेला केंद्रीभूत मानले होते. वार्षिक परीक्षेला सर्वस्व मानले होते. त्यादृष्टीने प्रयत्न करणे म्हणजे शिक्षण असे आतापर्यंत लक्ष्य मानले होते. आता राईट टू एज्युकेशनमध्ये मुलभूत बदल केलेला आहे. त्यांनी परीक्षेला केंद्रीभूत मानलेले नाही, ध्येय मानलेले नाही. त्यादृष्टीने विद्यार्थ्याला घडविणे आवश्यक आहे. तो ज्ञानाच्या दृष्टीने घडला पाहिजे, प्रॅक्टीकली घडला पाहिजे. हा प्रयत्न यामध्ये आहे. या शिक्षण पध्दतीचा नेमका अर्थ काय आहे याबद्दल मी एका माहीतगाराला विचारले होते. त्यांनी मला फार सोपे उत्तर दिले होते. त्यांनी असे सांगितले की, पोहणे या विषयावर सुंदर निबंध लिहिता येतो. नदी सुंदर आहे, पाणी सुंदर आहे, पाणी खोल आहे. पोहताना या काठावरुन त्या काठावर गेलो. निबंध लिहिण्यासाठी काही अडचण येत नाही, पण पाण्यात टाकल्यावर पोहता येते का नाही हा खरा प्रश्न असतो. तशाप्रकारे आतापर्यंतच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निबंध लिहिला गेला, पण तो प्रॅक्टीकली राहून गेला. आता होणा-या बदलामध्ये विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविले जाणार आहे, ते परिपूर्ण व्यक्तिमत्व कसे घडेल, तो समर्थ नागरिक कसा बनेल हे स्वप्न यामध्ये पाहिलेले आहे हे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो. परीक्षा होणार नाही म्हणजे काय ? नवीन पध्दतीनुसार निरंतर अशी मूल्यमापनाची पध्दत असेल. यामध्ये खूप विचारांती गोष्ट केलेली आहे. 2002 मध्ये त्यांनी हक्काचे शिक्षण असे रुपांतर केल्यानंतर कायदा करण्यात आला. त्यानंतर सरकारे बदलत गेली. त्यामध्ये सर्व सरकारांचा समावेश आहे. आपण पाहिले तर सगळयांनी खूप विचारांती निर्णय घेतल्याचे लक्षात येईल. शिक्षण कशा पध्दतीचे व्हावे यादृष्टीने विचार करीत असताना त्यांनी त्याला निरंतर शिक्षणाची जोड दिलेली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, शिक्षकांनी सुध्दा त्याच्या दिवसाचा पहिला भाग हा मुलांना शिकविण्यासाठी घालवावा आणि नंतरचे काही तास त्यांच्यात रमले पाहिजे. म्हणजे सकाळी जे शिकविले आहे ते त्या मुलाला समजले की नाही हे त्या शिक्षकाने समजून घ्यायचे आणि त्या

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.बाळासाहेब थोरात....

मुलांना बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. त्यांना निरनिराळया प्रॅक्टीकली पध्दतीने शिकविण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. तसेच दर आठवडयाला किंवा पंधरा दिवसांनी त्यांचे मूल्यमापन चालू राहणार आहे. त्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या दृष्टीने घडविण्याचा प्रयत्न त्यामध्ये आहे. मूल्यमापन करीत असताना गूण नसले तरी अ, ब, क, ड, ई अशा ग्रेड त्यामध्ये असणार आहेत. इ ग्रेडचा मुलगा असेल तर तो नापास झाला असे समजू शकतो, परंतु तो पुढच्या वर्गात जाईल तेव्हा त्याला इ ग्रेडमधून डी ग्रेड मध्ये कसे नेता येईल, डी मधून सी ग्रेड कसे नेता येईल यादृष्टीने त्यामध्ये प्रयत्न केला जाणार आहे. या पध्दतीमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

शाळाबाहय मुलांना मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. प्रत्येकाला शिक्षण मिळाले पाहिजे. अपंगांच्या शिक्षणाची सुध्दा काळजी घेतली पाहिजे. 18 वर्षापर्यंत त्याच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे. सहा वर्षाच्या वयोगटातील कोणतीही मुले शाळेच्या बाहेर राहू नये यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. प्रत्येक खेडयातील शाळेच्या बाहेर जी मुले असतील त्यांना शाळेत आणण्याची जबाबदारी घ्यावी लागणार आहे. राईट टू एज्युकेशन या संकल्पनेबाबत कोणालाही विचारले तर ती संकल्पना चांगली आहे असे म्हणू शकेल. पण त्याची योग्य कार्यवाही व अंमलबजावणी करणे महत्वाचे आहे. संकल्पना चांगली असली तरी जोपर्यंत त्याची अंमलबजावणी चांगली होत नाही तोपर्यंत त्या संकल्पनेला अर्थ नाही ही वस्तुस्थिती सुध्दा मी मान्य करतो. म्हणून सर्वांनी पुढे येऊन ही संकल्पना पुढे नेणे आवश्यक आहे असे मला वाटते. त्यामध्ये त्या गावाचा सहभाग कसा घेता येईल, प्रत्येक मुलाला शाळेमध्ये आणण्यासाठी व्यवस्था कशी करता येईल, तेथील ग्राम शिक्षण समित्या असतील किंवा पालक, शिक्षक संघ असतील त्यांचा सहभाग कसा घेता येईल. हा सगळा विचार यामध्ये केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:20

(श्री.बाळासाहेब थोरात...

यामध्ये अनेक चांगल्या गोष्टी आहेत. राज्यात अनेक शाळा आहेत. 6 वर्षाच्या मुलाच्या मुलाखती घेऊन त्याला प्रवेश देणा-या देखील शाळा आहेत. या राईट टु एज्युकेशनमध्ये असे म्हटलेले आहे की अशा त-हेने मुलांची स्क्रुटीनी करता येणार नाही. मुलांना शाळेत प्रवेश द्यायचा असेल आणि असलेल्या जागांपेक्षा जास्त अर्ज आले असतील तर चिठ्ठया टाकून प्रवेश द्यावा. केन्द्र शासनाने अतिशय चांगला असा निर्णय घेतलेला असून तो कायदा म्हणून लागू करण्यात आलेला आहे. या कायद्याची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी शिक्षण विभागा मार्फत आणि राज्य शासना मार्फत करणार आहोत. राईट टु एज्युकेशनच्या संदर्भात राज्यात काय स्थिती आहे हे सांगत असताना मी केरळ राज्यातील स्थितीचा उल्लेख करणार नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, अन्य कोणत्याही राज्यातील स्थिती पेक्षा आपल्या राज्यातील राईट टु एज्युकेशनच्या संदर्भातील स्थिती चांगली आहे. राईट टु एज्युकेशन स्वीकारल्या नंतर सर्व शिक्षा अभियान सुरु केले. त्या माध्यमातून अनेक गोष्टी केल्या. शाळातून मध्यान्ह भोजन योजना सुरु केली. त्याचा परिणाम असा झाला की ग्रामीण भागातील शाळेतील गळतीचे प्रमाण जे 27 टक्के होते ते 7 टक्क्यापर्यन्त आपण खाली आणू शकलो. या सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत अपंग मुलांच्या औषधोपचाराची आणि ऑपरेशनची काळजी घेण्यात आलेली आहे. सर्व शिक्षा अभियान हक्क म्हणून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये शिक्षणाचा हक्क राबवित असताना प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, राज्यात एकूण 76 हजार शाळा आहेत. तसेच शाळेसाठी विद्यार्थ्याला 1 कि.मी.पेक्षा दूर जावे लागू नये म्हणून 100 लोकवस्ती असलेल्या ठिकाणी दोन शिक्षकी शाळा राज्यात झालेल्या आहेत.

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय मंत्री महोदय सांगतात त्याप्रमाणे राज्यात स्थिती नाही हे मी त्यांना दाखवितो. तेव्हा मंत्री महोदय देत असलेल्या उत्तराच्या संदर्भात त्यांच्यावर विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव आणता येईल...

श्री. बाळासाहेब थोरात : ही योजना राज्यात मोठ्या प्रमाणात राबविलेली आहे हे नाकारता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी जेथे कुठे अशा प्रकारची शाळा नाही हे दाखविले तर तेथेही शाळा सुरु करु. हा शिक्षणाचा हक्क पुढे कसा नेता येईल या दृष्टीने प्रयत्न करावयाचा आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात...

त्यामध्ये सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. राज्य शासनाने जे काही जी.आर. काढलेले आहेत त्यासंदर्भात नियम केले जातील आणि ते सभागृहापुढे आणले जातील. 1 एप्रिल 2010 ला राईट टु एज्युकेशन लागू झाल्यानंतर त्यादृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी केलेल्या आहेत.

....नंतर श्री. भोगले...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ...

त्यातील बारकावे आणि नियम सभागृहापुढे आणले जातील याची ग्वाही या निमित्ताने मी देऊ इच्छितो. शिक्षणामध्ये अनेक चांगल्या गोष्टी आहेत त्या बरोबर घेऊन महाराष्ट्रातील तरुण पिढीला आपल्याला चांगल्या प्रकारे घडवावयाचे आहेत. शिक्षण क्षेत्रातील ही दुसरी क्रांती आहे असे मी मानतो आणि त्यामध्ये आपल्या सर्वांकडून अपेक्षा करतो व माझे भाषण येथेच थांबवतो.

----------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सुंदर असे स्वप्न रंजन केलेले आहे. माननीय मंत्रीमहोदय, आम्हाला स्वप्नांच्या दुनियेमध्ये घेऊन गेले. ज्या ठिकाणी 100 लोकांची वस्ती आहे अशा ठिकाणी दोन शिक्षकी शाळा आहेत असे त्यांनी आम्हाला सांगितले. परंतु महाराष्ट्रात अशी किती तरी गावे आहेत की, ज्यांची लोकसंख्या 1000 असतांना सुध्दा त्या ठिकाणी एक शिक्षकी शाळा सुध्दा नाही. अकरावीच्या ॲडमिशनच्या बाबतीत माझे मूलभूत दोन प्रश्न आहेत. आयसीएसईच्या विद्यार्थी सातविषयांपैकी 5 विषयामध्ये पास झाले तरी त्यांना ॲडमिशन दिले जाणार आहे. परंतु अशा विद्यार्थ्यांना सायन्स फॅकल्टीमध्ये ॲडमिशन देतांना फिजिक्स, केमिस्ट्री,बायोलॉजी व मॅथ हे विषय पाहिले जाणार आहेत काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सीबीएसई व आयसीएसई मध्ये ग्रुप 1, ग्रुप-2 आणि ग्रुप 3 असे असते त्यामुळे यासंदर्भात आपण काय करणार आहात ? अकारावीच्या मुलांना ॲडमिशन देतांना आपले जे ऑनलाईनचे सॉफ्टवेअर आहे त्यामध्ये आपल्याला बदल करावे लागणार आहे त्यामुळे अशा प्रकारचा बदल आपण कधी पर्यंत करणार आहात ? आपण बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात सॉफ्टवेअर तयार केलेले आहे त्यामुळे आयसीएसई आणि सीबीएसईच्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा असेल तर त्यासाठी लागणारे वेगळे सॉफ्टवेअर आपण किती दिवसात तयार करणार आहात ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ॲडमिशनच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात जे काही निदेश दिलेले आहेत त्या प्रमाणे ॲडमिशन होतील. सुप्रीम कोर्टाने आयसीएसईच्या मुलांना दोन पर्याय दिलेले आहेत. पहिल्या गटात 6 पैकी 5 विषय बेस्ट ऑफ फाईव्हमध्ये ते निवडू शकतात. या विद्यार्थ्यांना बेस्ट ऑफ फाईव्ह नको असेल तर सातही विषयाचे पर्सेंटेज काढून प्रवेश प्रक्रियेला त्यांना सामोरे जावे लागणार आहे व त्यासाठीच आपण प्रवेश प्रक्रियेसाठी दोन दिवस मागून घेतलेले आहे. आपल्या सॉफ्टवेअरमध्ये एसएससीच्या विद्यार्थ्यांना मार्क्स भरण्याची आवश्यकता नसते. विद्यार्थ्याने त्याचा केवळ नंबर भरला तर त्या विद्यार्थ्यांचे मार्क्स आपोआप भरले जातात. आयसीएसई व सीबीएसईच्या विद्यार्थ्यांचे मार्क्स मॅन्यूअली भरावे लागत असतात. त्यामुळे आवश्यक तो बदल करुन 16 जुलै पासून प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली जाणार आहे.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या कारणामुळे 16 लाख विद्यार्थ्यांना मन:स्ताप सहन करावा लागला, शासनाची बदनामी झाली व राज्याचे नुकसान झाले अशा ॲडव्होकेट जनरलचा आपण राजीनामा मागणार आहात काय ? एसएससी बोर्डाची आणि मंडळाची नव्या अभ्यास क्रमाच्या संदर्भात पुनर्रचना कधी केली जाणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एसएससी बोर्डावर शासकीय सदस्य असतात. या ठिकाणी ज्या जागा रिक्त होतात त्या जागा भरण्याची पध्दत त्या ठिकाणी आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे ती तपासून पाहण्यात येईल. हायकोर्टात आपल्याला जे अपयश आले होते त्याबाबत सन्माननीय सदस्य, ॲडव्होकेट जनरल यांना दोषी धरत आहेत परंतु माझे मत तसे नाही. आम्ही समर्थपणे बाजू मांडण्याचा प्रयत्न हायकोर्टात सुध्दा केला होता असे माझे स्वत:चे मत आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, गेल्या 10 वर्षापासून राज्याचे शैक्षणिक धोरण वेळोवेळी बदलले गेले आहे. नवीन शिक्षण मंत्री आल्या बरोबर त्यांनी त्यांचे स्वत:चे धोरण आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी...

प्रा.रामकृष्ण मोरे यांनी ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी यायला पाहिजे म्हणून इयत्ता पहिली पासून इंग्रजी विषय शिकविण्याची मांडणी केली होती. त्यानंतर शिक्षणमंत्री म्हणून प्रा.पुरके आले. त्यांनी नवीन फॉर्म्युला काढला. ते गेल्यानंतर श्री.राधाकृष्ण विखे-पाटील आले. त्यांनी आपला नवीन फॉर्म्युला काढला आणि आता शेवटचा बेस्ट ऑफ फाईव्हचा फॉर्म्युला श्री.बाळासाहेब थोरात आपण आणलेला आहात. बेस्ट ऑफ फाईव्हच्या सूत्रासंबंधी आपण उच्च न्यायालयामध्ये हरलो आहोत. कुठल्या तांत्रिक मुद्यावर आपल्याला अपयश मिळाले हा प्रश्न निराळा आहे. योग्य तो अभ्यास न करता आपले मुद्दे हायकोर्टामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला गेला असेल. माझे मित्र श्री.कपिल पाटील यांना ॲडव्होकेट जनरल यांचा राजीनामा हवा आहे. त्याने त्यांचे समाधान होणार असेल तर मला काही म्हणावयाचे नाही. मला ॲडव्होकेट जनरलनी जी बाब सांगितली ती मी काही येथे रेकॉर्ड वर आणू इच्छित नाही. पण त्यांनी सांगितले की, यात काही त्रुटी आहेत. त्यांनी याबाबत शासनाला अवगत केले होते. त्यांनी सांगितले होते की, शासनाचा जो जी.आर. आहे तो हायकोर्टामध्ये टिकणार नाही. कोर्टात कुठलाही जी.आर.टिकत नसतो. या जी.आर.मध्ये देखील दुरूस्त्या झालेल्या आहेत. त्या ऐवजी आपण जर अध्यादेश काढला असता आणि त्याचे रूपांतर कायद्यामध्ये केले असते तर ते योग्य झाले असते. आपण ते का केले नाही ? या वादात जाऊ इच्छित नाही. सर्वोच्च न्यायालयाने कायम स्वरूपी स्थगिती दिलेली नाही. आपली प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने ही स्थगिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने प्रवेश प्रक्रियेमध्ये कुठल्याही प्रकारचा अडथळा आणलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. उद्या अडथळा येऊ नये म्हणून आपण प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी आपल्या राज्याचे धोरण हे पक्के असले पाहिजे. पक्क्या आधारावर धोरण असले पाहिजे. राज्याचे धोरण हे वस्तुनिष्ठ असले पाहिजे. कायम असले पाहिजे. यासाठी आपण शिक्षण क्षेत्रातील जी प्रमुख मंडळी आहेत, तज्ज्ञ मंडळी आहेत त्यांची परिषद घेतली पाहिजे व त्या परिषदेमध्ये बेस्ट ऑफ फाईव्हवर विचारविनिमय करावा. बेस्ट ऑफ फाईव्ह सूत्राला कोणतीही अडचण येणार नाही यासाठी पूर्व तयारी करण्याची आपली मानसिकता आहे काय ? एवढेच मी या निमित्ताने विचारू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 2-3 गोष्टी एकत्रितपणे सांगितल्या आहेत. शैक्षणिक धोरण वेगळे असते आणि आपण घेतलेले निर्णय हे वगळे असतात, हे आपण प्रथम पाहिले पाहिजे. शैक्षणिक धोरण बदलणे ही निरंतर प्रक्रिया शिक्षण क्षेत्रात सुरू असते. काळाच्या ओघामध्ये, बदलत्या परिस्थितीमध्ये आपण शैक्षणिक धोरण बदलत असतो. सन्माननीय सदस्यांनी बेस्ट ऑफ फाईव्हसंबंधी देखील मुद्दा मांडला आहे. हे सूत्र टिकून राहण्यासाठी सुप्रीम कोर्टामध्ये प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांचे म्हणणे आहे. सुप्रीम कोर्टामध्ये एखादे प्रकरण जेव्हा सुनावणीसाठी येते तेव्हा त्यावर फक्त 15 मिनिटे बाजू ऐकून घेतली जाते आणि त्यावर निर्णय दिले जातात. बेस्ट ऑफ फाईव्हच्या केसमध्ये सुप्रीम कोर्टामध्ये 6 तास सुनावणी झाली. या प्रकरणाची सुनावणी आता ऑक्टोबर महिन्यामध्ये होणार आहे. कोअर सब्जेक्टसंबंधी देखील काही निर्णय सुप्रीम कोर्टाकडून अपेक्षित आहेत. ही परिस्थिती सर्व राज्यांमध्ये वाढणार आहे. त्यामुळे आपल्याला वेगळ्या कायद्याचा देखील विचार करावा लागेल.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या चर्चेमध्ये काल काही महत्वाचे प्रश्न उपस्थित झाले त्यांची उत्तरे घेण्यासाठी मी उभा आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयात आपल्या बाजूने निकाल लागला असला तरी पुढच्या टप्प्यात आपल्या बाजूने निर्णय लागला नाही तरी या संदर्भात कायदा करण्यात येईल असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे आणि मी भाषणात उल्लेख केला होता की, 50 हजार विद्यार्थ्यांसाठी राज्यातील साडेपंधरा लाख विद्यार्थ्यांना वेठीस धरले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय काहीही येऊ दे. आपण "बेस्ट ऑफ फाईव्ह"चा निर्णय करुन विद्यार्थ्यांना पोहण्यावर निबंध लिहिण्यास भाग पाडत आहोत, पोहण्यासाठी नाही. शिक्षण विषय हा कन्करंटमध्ये येतो. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून शिक्षणामध्ये अग्रेसर आहे. आपण शिक्षणामध्ये काही चांगल्या सुधारणा करुन आपला स्वतंत्र कायदा आणू शकतो. तेव्हा असा कायदा आणण्याचा सरकारचा विचार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी माझ्या भाषणात सांगितले होते, पुन्हा एकदा सांगतो की, आपण हा निर्णय घेताना आपल्या डोळ्यासमोर फक्त अकरावीचे ॲडमिशन ठेवले नव्हते. आपला एकसमानीकरण करण्याचा प्रयत्न होता. सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई. बोर्डाचे पाच आणि इतर विषय होते. आपण सुध्दा पाच विषय ठेवून समानीकरण केलेले आहे. एक विषय कठीण गेला तर आपले पर्सेन्टेज जाते हा तणाव विद्यार्थ्यांवर असायचा. आपण हा तणाव दूर केलेला आहे. त्यांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण आपण पाहिले की,तणावाखाली विद्यार्थी आत्महत्या करीत होते. आपल्या विद्यार्थ्यांना एका विषयात सवलत दिलेली आहे. हा निर्णय राज्यातील एस.एस.सी.बोर्डाच्या विद्यार्थ्यांकरिता आहे. हा निर्णय सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई बोर्डाच्या विद्यार्थ्यांकरिता लागू नाही हे मी सांगू इच्छितो. शिक्षण विषय हा कन्करंट लिस्टमध्ये आहे. याबाबत केंद्र सरकार धोरण ठरवित आहे. परंतु आपल्याला सुध्दा एक वेगळे धोरण राबवावे लागेल हे मी नाकरत नाही आणि केंद्र सरकारची सुध्दा त्यास हरकत नाही हे मी येथे सांगतो. आपण इयत्ता 9 वी पासून सायन्स आणि गणित विषयांचे अपग्रेडेशन करीत आहोत. देशामध्ये एकसारखाच विषय असावा यादृष्टीने प्रयत्न होत आहेत. आपण महाराष्ट्राचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

शैक्षणिक धोरण ठरविण्याकरिता एक समिती गठीत केलेली आहे. या समितीवर एकूण 70 सदस्य आहेत. दहा तज्ज्ञ व्यक्तींकडे एक विषय दिलेला आहे. असे एकूण सात विषय आहेत. तज्ज्ञांचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर ते पुन्हा एकत्र चर्चा करुन त्यानंतर मसुदा करणार आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, शैक्षणिक हक्क कायद्यात तरतूद आहे, परंतु त्यासाठी स्वतंत्र अधिनियम केला पाहिजे, तो कधी करणार आहात ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याचे उत्तर मी दिलेले आहे. आम्ही आपल्यापुढे सर्व नियम आणणार आहोत.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील भाग चार कलम 21 नुसार दिनांक 30 सप्टेंबर 2010 पूर्वी प्रत्येक प्राथमिक शाळेत "शाळा व्यवस्थापन समिती" स्थापन करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्रातील अनेक खाजगी प्राथमिक शाळेत इयत्ता पाचवी ते आठवी इयत्तेपर्यंतचे वर्ग आहेत. माझे असे म्हणणे आहे की, खाजगी प्राथमिक शाळांतील "व्यवस्थापन समिती" बरखास्त झाली असे समजायचे काय ? शिक्षणाच्या अधिकाराप्रमाणे समिती ठेवायची की स्कूल कोडप्रमाणे समिती ठेवायची असा महत्वाचा प्रश्न निर्माण होणार आहे. शिक्षणाच्या अधिकाराप्रमाणे जी समिती स्थापन करायची आहे त्यामध्ये 75 टक्के पालकांमधून सदस्य निवडावयाचे आहेत. शिवाय लोकप्रतिनिधी आहेत, 50 टक्के महिला आहेत. तेव्हा स्कूल कोड नियमाप्रमाणे समिती करायची की शिक्षणाच्या अधिकाराप्रमाणे ठेवायची ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 16.40

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, राईट टू एज्युकेशन कायद्याच्या अनुषंगानेच येथून पुढचे निर्णय घेण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मला एक प्रश्न विचारण्याची संधी देण्यात यावी.

**उपसभापती** : या विषयावर पुष्कळ चर्चा झालेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, केन्द्र सरकारच्या शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने राज्य सरकारकडून जे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहेत ते प्राथमिक विभागासाठी लागू करण्यात येत आहेत. आठवीपर्यतच्या विद्यार्थ्यासाठी राज्य शासनाने काही निर्णय घेतलेले आहेत.परंतु आठवीचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले आहेत.शासनाकडून जे शासन निर्णय वा परिपत्रक निर्गमित केले जात आहेत ते फक्त प्राथमिक शाळासाठी आहेत हे शासन निर्णय व परिपत्रके माध्यमिक शाळांसाठी लागू नाहीत असे अधिकारी सांगत आहेत.तेव्हा शिक्षण हक्क विधेयकाच्या संदर्भात जे शासन निर्णय वा परिपत्रके निघतील ते प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील आठवीपर्यतच्या वर्गाना लागू राहतील अशा प्रकारचे निदेश शासन देणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही बाब तपासून पहावी लागेल.

श्री.भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, या चर्चेला माननीय मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे. हे उत्तर देत असतांना त्यांनी समानीकरणासंबंधी एक मुद्दा मांडला असून त्या संदर्भात मला त्यांच्याकडून एक खुलासा हवा आहे. या चर्चेला उत्तर देत असतांना माननीय मंत्री महोदय आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई संबंधी जास्त बोलले आहेत. या दोन्ही बोर्डामुळे विद्यार्थ्याच्या प्रवेशासंबधीचा प्रश्न आपल्यावर लादला गेला आहे. अशा प्रकारे दहावीची परीक्षा घेणारे संपूर्ण देशामध्ये सात बोर्डस् आहेत. या सात बोर्डाच्या शाळा राज्यामध्ये अस्तित्वात आल्यानंतर त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणावर स्पर्धा निर्माण होईल व त्यातून भविष्यामध्ये काही प्रश्न निर्माण होणार आहेत. या निमित्ताने मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, राज्यात या विविध बोर्डाच्या शाळा सुरु झाल्यानंतर भविष्यात काही प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून या सर्वच बोर्डाचा अभ्यासक्रम एकच कसा राहील, त्यांच्या परीक्षा पध्दती एकच कशा राहतील , त्यांच्यामध्ये समानीकरण कसे होईल या दृष्टीने शासन पुढाकार घेणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात येईल.

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल प्रश्न विचारतील.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, अशा प्रकारे देशामध्ये परीक्षा घेणारे सात बोर्ड असतील तर त्यांच्यामध्ये समानता आणण्यात येणार आहे काय ? सातही बोर्डामध्ये समानता आणली आणि परीक्षा पध्दती आणि अभ्यासक्रम एक सारखा राहिला तर विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येणार नाही तेव्हा सातही बोर्डामध्ये समानता आणण्याच्या दृष्टीने शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारला असल्यामुळें त्यांच्या प्रश्नाला उत्तर दिले पाहिजे. देशामध्ये प्रत्येक राज्याचे स्वतंत्र बोर्ड आहेत त्या व्यतिरिक्त हे सात बोर्ड आहेत व त्या बोर्डाकडून विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जातात. त्या ठिकाणी एक सारखाच अभ्यासक्रम सुरु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु झालेली आहे आणि सुरुवातीचे वर्ग सोडून वरच्या स्तराच्या वर्गातील अभ्यासक्रम एक सारखा करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावरुन प्रयत्न सुरु आहेत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मंत्रिमहोदय माननीय सदस्यांनी ज्या सात मंडळांचा उल्लेख केला त्यामध्ये को-ऑर्डिनेशन असावे याकरिता माननीय सदस्यांना चिफ कंट्रोलर म्हणून नेमावे अशाप्रकारचे उत्तर त्यांना अपेक्षित आहे.

अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

-----

**<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>**

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे दिल्ली येथे गेल्यामुळे आजच्या कामकाज पत्रिकेमधील बाब क्रमांक सहावर दाखविण्यात आलेली शासकीय विधेयके पुढे ढकलण्यात यावीत अशी त्यांनी विनंती केली आहे. त्यांनी केलेली विनंती मान्य करुन ही विधेयके पुढे ढकलण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे बाब क्रमांक पाचवर म.वि.प. नियम 97 अन्वये दाखविण्यात आलेली अल्पकालीन चर्चा पुढे ढकलण्यात येत आहे.आता अर्धा तास चर्चेला सुरुवात होईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे येथे मोठया प्रमाणावर दूधात भेसळ करण्याच्या घटना उघडकीस येणे

**मु. शी.** : ठाणे येथे मोठया प्रमाणावर दूधात भेसळ करण्याच्या घटना उघडकीस येणे यासंबंधी श्री.संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" ठाणे येथे मोठया प्रमाणावर दूधात भेसळ करण्याच्या घटना उघडकीस येणे, दूधात केमिकल व इतर शरीराला हानिकारक पदार्थांच्या मिश्रणामुळे दूधात भेसळ करण्याचे काम मोठया प्रमाणावर सुरु असणे, याबाबत ठाणे शहरात अनेक तक्रारी येणे, जिल्हयात हजारो खाजगी छोटे मोठे व्यावसायिक कार्यरत असणे परंतु सदर दूधाची तपासणी यंत्रणाच नसल्याचे उघडकीस येणे, सदर खाजगी छोटे मोठे दूध व्यावसायिकांची शासनाच्या कुठल्याही विभागाकडे नोंद नसणे, प्रादेशिक प्रदूषण नियंत्रण व अन्न भेसळ प्रतिबंधक परवाने नसताना परस्पर दूध विक्री केंद्र चालविणे, ठाणे येथे दूध भेसळ रोखण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येऊनही समितीने दूध भेसळीच्या तक्रारीची तपासणी न करणे, परिणामी भेसळीच्या दूधाचा गुन्हा अजामिनपात्र करण्याच्या शासनाच्या निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणीस मर्यादा स्पष्ट होणे व कायद्याचे रक्षण करण्यास शासन असमर्थ असणे, नागरिक व ग्राहकांमध्ये पसरलेला असंतोष मनामध्ये निर्माण झालेली संतापाची लाट, सदर बाबत करावयाची तातडीची उपाय योजना याबाबत ही अर्धा तास चर्चेची सूचना".

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)**

सभापती महोदय, दूधामध्ये भेसळ करण्याच्या घटना जागोजागी होत आहेत. विशेषत: ठाणे जिल्हयामध्ये, मुंबईमध्ये मोठया प्रमाणात या घटना उघडकीस आलेल्या आहेत. त्यामुळे हा विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा झालेला आहे. दूध ही आज दैनंदिन जीवनावश्यक वस्तू ठरलेली आहे. त्याचप्रमाणे या राज्यातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने देखील महत्वाची बाब आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASS/ MMP/ KGS/

श्री. संजय केळकर...

प्रामुख्याने सन 2007, 2008, 2009 व 2010 मध्ये अशाप्रकारच्या घटना वेळोवेळी घडलेल्या आहेत व त्या उघडकीस आलेल्या आहेत. सभापती महोदय, भेसळ करणारे अर्धे दूध व अर्धे पाणी मिश्रण करुन भेसळ करतात. त्याचबरोबर दूधामध्ये यूरीया, वॉशिंग पावडर, शाम्पू इत्यादी प्रकारचे केमिकल मिसळत असल्याचे उघडकीस आले आहे. या व्यवसायामध्ये छोटे आणि मोठे असे दूधाची विक्री करणारे किती व्यावसायिक आहेत याची शासनाकडे नोंद नाही, व ती नोंद ठेवण्याची पध्दतही नाही. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई, डोंबिवली, कल्याण व ठाणे या ठिकाणी मोठया प्रमाणात भेसळीच्या घटना घडत आहेत. महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सुगंधी दूध दिले जाते, त्या दूधामुळे देखील विद्यार्थ्यांना विषबाधा होण्याचे प्रकार घडत आहेत. दूधामध्ये भेसळ करण्याचे प्रकार प्रामुख्याने झोपडपट्टयांमध्ये सुरु आहेत. या देशामध्ये व राज्यामध्ये महानंदा, आरे, गोकुळ, वारणा, अमूल व मदर डेअरी या मोठया कंपन्यांचे दूध विकले जाते.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

दूधामध्ये वेळोवेळी भेसळ केली जाते. त्यामुळे हा विषय अत्यंत गंभीर असा विषय आहे. दुधाची तपासणी यंत्रणा नसल्याने फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणी प्रयोग शाळा आहेत पण जागोजागी ज्या पध्दतीने तपासणी यंत्रणा पाहिजे ती तपासणी यंत्रणा नाही. जिल्हयामध्ये किती तपासणी यंत्रणा आहेत याची माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती द्यावी. अभ्यास गटाचा अहवाल भयंकर आहे.United states Food & Drugs Administration ने अहवाल दिलेला आहे. त्या अहवालामध्ये दुधाच्या भेसळीमुळे निरनिराळया प्रकारचे रोग कसे झालेले आहेत. दुधाच्या भेसळीमध्ये काय काय मिसळले जाते हे सगळे दिलेले आहे. जिल्हा स्तरावर एक समिती आहे. या समितीचे काम काय आहे? तिची स्थिती काय आहे? ती सध्या अस्तित्वात आहे काय? विशेष करुन ठाणे जिल्हयामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली असलेली समिती अस्तित्वात आहे काय? तिची सध्याची स्थिती काय आहे? कुठल्या प्रकारचे कार्य तिने केलेले आहे? याची माहिती या निमित्ताने मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, जानेवारी, 2008 पासून दुधात भेसळ करणे हा अदखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे.अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे. परंतु एप्रिल,2007 पासून किती धाडी टाकल्या? माझा दावा आहे की, 365 दिवस निरनिराळया ठिकाणी दूधामध्ये भेसळ केली जाते. परंतु धाडी मोजक्या वेळेला टाकल्या जातात. 2007 मध्ये फक्त चारच धाडी टाकण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर आणखी जास्त धाडी टाकल्या असतील. परंतु यामुळे दूधात भेसळ करणाऱ्या घटना कमी झालेल्या नाहीत, हे मला या ठिकाणी निदर्शनास आणावयाचे आहे. त्यामुळे जनतेच्या मनामध्ये दूधाच्या संबंधामध्ये एक साशंकता निर्माण झालेली आहे. वेळोवेळी ज्या घटना घडतात त्याला पायबंद घालण्यामध्ये शासनाला आणि संबंधित खात्याला यश मिळालेले नाही. अपयश आलेले आहे. म्हणून या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकयता आहे. ती अंमलबजावणी केली जात नाही त्यामुळे केवळ अजामीनपात्र गुन्हा दाखल करुन किंवा केवळ अटक करुन काम होणार नाही. याचा बंदोबस्त पूर्णपणे होण्याच्या दृष्टीने सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. सभापती महोदय, दुधातील भेसळ हा अतिशय गंभीर आणि आरोग्याला धोका निर्माण करणारा अशा प्रकारचा विषय आहे. वेळोवेळी अशा प्रकारच्या घटना ठाणे जिल्हयामध्ये आणि

..2..

श्री. संजय केळकर....

ठाण्याच्या परिसरामध्ये व राज्यातील अन्य भागात उघडकीस आलेल्या आहेत. यासंबंधात शासनाने नेमकी काय उपाययोजना केलेली आहे. दुध भेसळीच्या तपास यंत्रणेच्या संबंधामध्ये, दूधात भेसळ करणाऱ्या घटना घडू नयेत म्हणून शासनाने कुठल्या प्रकारची खबरदारी घेण्याचे ठरविलेले आहे? पाश्चराईज्ड दूध चांगले असते असे अहवालात म्हटलेले आहे. त्या दृष्टीने कुठल्या प्रकारचे निर्देश देण्यात येणार आहेत? दुधाच्या तपासणी यंत्रणेची कशा पध्दतीची व्यवस्था आहे? यामध्ये Food & Drug आणि पोलीस यांच्यामधील जे को-ऑर्डिनेशन आहे, हे को-ऑर्डिनेशन आणि त्याची अंमलबजावणी कशा पध्दतीने होणार आहे?याची माहिती मिळणे आवश्यक आहे. अन्यथा दूधाच्या भेसळीचा विषय मागच्या अधिवेशनात आला होता पण तो प्रत्यक्ष चर्चेला आला नाही. दूधाच्या भेसळीचे प्रमाण वाढत जाईल. 46 प्रकारचे रोग दूधातील भेसळीमुळे होतात. मग ती कावीळ असेल, गॅस्ट्रो असेल, डोकेदुखी असेल, पोटदुखी असेल, सांधेदुखी असेल, ताप असेल असे निरनिराळया प्रकारचे रोग लहानापासून ते मोठया माणसांच्या आरोग्याला धोका निर्माण होणारे होतात. त्यामुळे यासंबंधात संबंधित खात्याने आणि संबंधित मंत्र्यांनी माहिती द्यावी अशा प्रकारची मी त्यांना विनंती करतो.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, दूध भेसळ ही छोटी मोठी घटना राहिलेली नसून एका संघटित गुन्हेगारीचा भाग झालेली आहे आणि त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. आम्ही देखील काही लक्षवेधी आणि प्रश्न गेले वर्षभर अधिवेशनात विचारत आहोत. पहिला भाग असा की, ज्या ज्या ठिकाणी शेतकरी दूध आणून देतात तेथे शेतकऱ्यांना कल्पना नसताना भेसळ होते. पारनेर या ठिकाणी एका सोसायटीमध्ये 16 ते 17 हजार लिटर दूध जमा होत होते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच दुधाचे रुपांतर पाचपट दुधात होत होते. एका टँकरचे पाच टँकर होतात याची शेतकऱ्यांनाही कल्पना नव्हती. पण जेव्हा शेतकऱ्यांना कळले त्यावेळी त्या सोसायटीत मक्याची पावडर प्रचंड प्रमाणात आढळून आली तसेच युरिया खताच्या गोण्या आढळून आल्या. रेशनिंगवर वाटप होणाऱ्या पामतेलाच्या पिशव्यांचे खोके त्या ठिकाणी सापडले. पारनेरमध्ये ही घटना आढळून आली त्याच पध्दतीने बारामतीमध्ये तसेच बीड, अहमदनगर जिल्ह्यामध्ये तसेच इतर अन्य भागामध्ये आणि मुंबईमध्ये सुध्दा या घटना सातत्याने घडताना दिसत आहेत. परभणी या ठिकाणी देखील एमआयडीसीमध्ये शासकीय दूध डेयरीमध्ये तेथील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. अमृत शिंदे यांनी दुधामध्ये युरियाची मात्रा कशी मिसळली जाते याच्या वारंवार तक्रारी केल्या. परंतु प्रत्यक्षामध्ये त्यासंदर्भात कारवाई होत नाही. मुद्दा असा आहे की, मुंबईमध्ये तर निशांत नावाच्या दूध फॅक्टरीची मुहूर्तमेढ रोवली गेली पण त्या ठिकाणी संघटितपणे दुधात भेसळ होत होती.

सभापती महोदय, मी या ठिकाणी तीन मुद्दे मांडू इच्छिते. पहिला मुद्दा असा की, असे दूध भेसळीचे किती गुन्हे महाराष्ट्रामध्ये समोर आले ? दुसरी बाब अशी की आपण जे सरकारी वकील देतो ते बऱ्याच वेळा अनेक केसेस हाताळत असतात. त्यामध्ये खून, बलात्कार असतील किंवा सहकारातील गुन्हे असतील किंवा अन्न भेसळीचे गुन्हे असतील. आपण काही एक्स्पर्ट किंवा तज्ज्ञ वकील की जे भेसळीच्याच संदर्भात खास करुन खटले हाताळतील आणि लवकरात लवकर त्या लोकांना जामीन कसा मिळणार नाही याबद्दलचे व्यवस्थित आर्ग्युमेंट करतील अशी यंत्रणा महाराष्ट्राच्या कोणत्याही जिल्ह्यामध्ये नाही. त्यामुळे हे लोक काही दिवसांमध्ये सर्रासपणे

डॉ. नीलम गोऱ्हे ....

जामिनावर सुटलेले दिसतात. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, आम्ही द्रुतगती न्यायालये स्थापन करु. द्रुतगती न्यायालये स्थापन करण्यासाठी पुढे काय हालचाली झाल्या हे आम्हाला कळले पाहिजे. जानेवारी महिन्यामध्ये कॅबिनेटने जाहीर केले की, आम्ही कायदा बदलणार आहोत. कायदा बदलल्यानंतर त्याला केंद्र सरकारची मान्यता मिळून अंमलबजावणी होईपर्यंत वेळप्रसंगी मोक्का लावू असे आपले स्टेटमेंट होते. ते देखील वर्तमानपत्रांनी छापले. किती लोकांना मोक्का लावला ? त्यासंदर्भात नक्की काय केले ? याबद्दल आमची आपल्याला अशी सूचना आहे की, ज्या ठिकाणी कट-कारस्थान केले जाते त्या ठिकाणी जरी मोक्का लावता आला नाही तरी लोकांनी कट-कारस्थान करुन या पध्दतीने संघटित गुन्हेगारी केलेली आहे म्हणून आपण कलम 120(ब) लावू शकतो. निदान काही गुन्ह्यांमध्ये अशा गुन्हेगारांना जोपर्यंत सज्जड अशी शिक्षा होत नाही तोपर्यंत याला आळा बसणार नाही. मी सांगेन की, मनोरा आमदार निवासमध्ये सुध्दा जे दूध दिले जाते त्यामध्ये भेसळ असते. याचा अनुभव अनेक आमदारांना वारंवार आलेला आहे. अनेक लोकांचे पोट सातत्याने मनोरा आमदार निवासमधील चहाने सुध्दा बिघडत असते ही वस्तुस्थिती आहे. विधान भवनामध्ये चहासाठी येणाऱ्या दुधाबद्दल काय परिस्थिती असेल याचा आपण शोध करु शकता. म्हणून यासंदर्भात मुंबई बरोबर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ही जी भेसळ केली जाते त्याबद्दल आपण एखादी तरी मोहीम हातामध्ये घेऊन अशा काही गुन्हेगारांना सहा महिन्याच्या आत शिक्षा झालेली असेल अशा पध्दतीची काही पावले यापूर्वीच उचलावयास हवी होती परंतु यावर आता आपले ठोस असे उत्तर मिळावे अशी आमची अपेक्षा आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/ SBT/ KTG/

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी महाराष्ट्रातील एका संघटित गुन्हेगारीच्या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांच्या मांडणीचा सर्व रोख ठाणे आणि मुंबईच्या परिसरात होणारी दुधातील भेसळ असा असला तरी वस्तुनिष्ठ बोलावयाचे झाले तर महाराष्ट्रामध्ये ही सार्वत्रिक चाललेली संघटित गुन्हेगारी आहे हा महत्वाचा मुद्दा मी या ठिकाणी मांडत आहे. ज्या सांगली-कोल्हापूर परिसरामध्ये मी वावरतो किंवा मी ज्या ठिकाणचा रहिवाशी आहे त्या सांगली जिल्ह्यामध्ये, कोल्हापूरमध्ये, साताऱ्यामध्ये सुध्दा प्रचंड टीम्स ॲक्टीव्ह झालेल्या आहेत. या टीमने अत्यंत सावधपणाने सहकारामध्ये असलेले सर्व दूधसंघ सुध्दा मोडीत काढले आणि दूधसंघामध्ये असलेल्या मंडळींनी आपल्याच बगलबच्च्यांच्या सगळ्या खाजगी यंत्रणा ॲक्टीव्ह करुन प्रचंड पैसे मिळविले आहेत. त्यांचे संघटित असणे आपण समजू शकतो पण त्यांना आपले फूड ॲंड ड्रग इन्स्पेक्टर वगैरे सर्व मॅनेज झालेले आहेत, खालपासून वरपर्यंत सगळ्या यंत्रणा मॅनेज झालेल्या आहेत आणि सर्वसामान्य माणसांच्या भवितव्याशी, जीवनाशी खेळणारी यंत्रणा वाढलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

या दुधाचे केव्हा तरी सॅम्पल तपासावे. मुंबईला नगरहून येणारे टँकर असतील, पुण्याहून येणारे टँकर्स असतील, सांगली, कोल्हापूरहून येणारे टँकर्स असतील या टँकर्सची एखाद्या रात्री तपासणी करावी. जसे देवीचा रोगी दाखवा व एक हजार रुपये मिळवा असे म्हटले जाते. या म्हणीप्रमाणे भेसळ नसलेला दुधाचा टँकर दाखवा आणि पैसे मिळवा अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे. पूर्वी दुधात पाणी मिसळले जात होते आता पाण्यात दूध मिसळले जाते. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी म्हटल्याप्रमाणे मनोरा आमदार निवासातील दुधात भेसळ असते त्याप्रमाणे आकाशवाणी आमदार निवासामध्ये सुध्दा वेगळा अनुभव नाही. ज्याला शुध्द दूध म्हणता येईल, पूर्वीचा आक्री दूध हा प्रकार नामशेष होत चालला आहे. दुधाच्या व्यवसायातील जी मंडळी आहेत ती या क्षेत्रात येण्यापूर्वी त्यांची सांपत्तिक स्थिती कशी होती याचा शोध घेतला पाहिजे. बाप लेकाने मिळून मागील 50 वर्षात मिळविली नाही इतकी संपत्ती या क्षेत्रात आलेल्या लोकांनी केवळ 5 वर्षात मिळविल्याची उदाहरणे आहेत. मागील 4-5 वर्षामध्ये या लोकांनी सरकारी यंत्रणेला मॅनेज केलेले आहे. ही सर्व यंत्रणा शासनाने उखडून काढण्याची आवश्यकता आहे असे मी यानिमित्ताने सांगतो आणि येथेच थांबतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी महत्वाचा प्रश्न मांडला आहे. दूध हा महत्वाचा पदार्थ आहे. लहानापासून मोठया माणसापर्यंत, गरीबापासून ते श्रीमंतापर्यंत सगळयांना आवश्यक असणारी ही बाब आहे. ही गोष्ट खरी आहे की, ठाणे जिल्हयामध्ये दूध भेसळीच्या शासनाकडे तक्रारी आल्या होत्या. त्या अनुषंगाने सन 2009-10 या वर्षात दुधाचे पॅकिंग करणा-या डेअरीतून 98 तसेच किरकोळ विक्रेत्यांकडील 54 असे एकूण 142 दुधाचे नमुने घेण्यात आले. त्यापैकी 89 नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाला असून 63 नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. प्राप्त अहवालापैकी 80 नमुने प्रमाणित आढळले आहेत व 9 नमुने अप्रमाणित आढळले आहेत. अशाप्रकारे ठिकठिकाणी शासनाने कारवाई केलेली आहे. जे नमुने अप्रमाणित आढळले आहेत त्या संबंधित व्यक्तींवर शासनाने कारवाई केलेली आहे. या गुन्हेगारीला आळा बसावा म्हणून वेळोवेळी विशेष मोहिम राबविली आहे. ठाणे जिल्हयामध्ये मोठमोठया 108 वाहनांची तपासणी करुन दुधाचे 24 नमुने घेतले आहेत. वाहनांची संख्या 108 असली तरी एकेका कंपनीची 5-6 वाहने असतात. या 24 नमुन्यांपैकी 23 नमुने प्रमाणित व 1 नमुना अप्रमाणित आढळला आहे. ठाणे जिल्हयामध्ये 208 व्यवसायिकांकडे अन्न पदार्थ विक्रीबरोबर दूध विक्रीचा परवाना मिळालेला आहे. या सर्वांकडील दुधाचे नमुने तपासलेले आहेत. त्यातून 16 लोकांवर कारवाई केलेली आहे, त्यापैकी 14 लोकांना अटक केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, दुधाची तपासणी करण्यासाठी व्यवस्थित यंत्रणा नसते. सध्याच्या यंत्रणेमध्ये आणखी वाढ केली पाहिजे. मी याबाबत सांगू इच्छितो की, दुधाची तपासणी करण्यासाठी राज्यात एकूण 17 प्रयोगशाळा आहेत. या 17 प्रयोगशाळांच्या माध्यमातून दुधाच्या नमुन्यांची तपासणी केली जाते. या यंत्रेणेमार्फत मागील 4-5 वर्षात 2,176 नमुने तपासण्यात आले, त्यापैकी 1,856 नमुने प्रमाणित आढळले व 620 नमुने अप्रमाणित आढळले आहेत. 369 व्यक्तींविरुध्द खटले दाखल केले आहेत. 251 कर्मचाऱ्यांविरुध्द प्रशासकीय कारवाई केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश बागवे...

दूध भेसळीचे प्रकार वारंवार होऊ नयेत, त्याना निर्बंध धालण्यासाठी अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये बदल करण्यात आला आहे.या कायद्याच्या कलम 20 मध्ये सुधारणा सुचविण्यात आलेली आहे. अन्न भेसळीचे सर्व गुन्हे हे अजामीनपात्र आणि दखलपात्र करण्याबाबत केन्द्राला शिफारस केलेली आहे. भेसळ करणा-या गुन्हेगारांना विनावॉरण्ट अटक करण्याचे अधिकार पोलिसांना देण्यात आलेले आहेत. त्यासाठी भा.द.वि. कलम 272 आणि 276मध्ये सुधारणा केलेली आहे. तसेच या गुन्ह्याच्या शिक्षेमध्ये वाढ केलेली आहे. हा गुन्हा करणा-यांना जरब बसावी म्हणून जन्मठेपेची शिक्षा देखील प्रस्तावित केलेली आहे. दूध भेसळीचे प्रकार होऊ नयेत म्हणून सहायक आयुक्त आणि सिनिअर आयपीएस अधिकारी यांचे भरारी पथक केलेले आहे. हे भरारी पथक ठिकठिकाणी धाडी टाकून दुधामध्ये भेसळ होते का याची तपासणी करतात आणि भेसळ केल्याचे आढळले तर कारवाई करतात. अशा त-हेने कलम 120 अंतर्गत भेसळ करणा-यावर कारवाई केलेली आहे. मी आपणास सांगू इच्छितो की महाराष्ट्रामध्ये सन 2009-2010 या कालावधीत 772 नमुने तपासले. त्यापैकी 568 प्रमाणित आणि 204 अप्रमाणित निघाले आणि 157 खटले दाखल केले. सन 2008-2009 या कालावधीत 730 नमुने तपासले. त्यापैकी 571 प्रमाणित आणि 169 अप्रमाणित आढळून आले. तसेच 90 खटले दाखल केलेले आहेत. राज्यातील प्रमुख शहरातील प्रत्येक जकात नाक्यावर येणारे दुधाचे टँकर तपासण्यासाठी तपासणी पथक ठेवलेले आहे. ज्या टँकरमधील दूध अप्रमाणित असेल त्या टँकरला शहरात प्रवेश दिला जात नाही आणि संपूर्ण दूध जप्त करण्यात येते. तालुका आणि जिल्हा दूध उत्पादक संघ, दूध संकलन केन्द्रे, शीत केन्द्रे यांची भरारी पथकाच्या माध्यमातून नियमित तपासणी करण्यात येते. दूध भेसळीला आळा घालण्यासाठी राज्य स्तरावर आणि तालुका स्तरावर समित्या नेमण्यात आलेल्या आहेत. राज्य स्तरावर सचिव, पशुसंवर्धन व दुग्धविकास यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्या नेमलेल्या आहेत. या समितीच्या वेळोवेळी बैठका घेऊन दुधात भेसळ करणा-यावर कारवाई केली जाते.

सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांना मी सांगू इच्छितो की, अन्न व औषधे प्रशासन विभाग आणि गृह विभाग या दोन्ही विभागांचा कार्यभार माझ्याकडे आहे. दूध भेसळीला आळा घालण्यासाठी एक विशेष पथक स्थापन करुन गुन्हेगारांवर कायद्याच्या सुधारित कलमानुसार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश बागवे...

कडक कारवाई केली जाईल. आमदार निवासामध्ये दुधात भेसळ होत असल्याचे आढळून आले तर तेथील प्रबंधकाचे लायसन्स रद्द करण्यात येईल. दुधात भेसळ असल्याचे आढळले तर नोकरा ऐवजी मूळ मालकावरच केस दाखल करण्यासंबंधीची तरतूद नवीन कायद्यामध्ये केलेली आहे.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 17:10

श्री.रमेश बागवे........

अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांच्या कृत्यांना आळा घालता येईल अशा तऱ्हेने विभागाची यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांच्या मौलिक सूचना असतील तर त्याबाबत देखील विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे आणि श्री.भाई जगताप यांनी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याबाबत विनंती केली आहे. फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करुन सहा महिन्याच्या आत खटल्याचा निकाल देखील लागेल.

श्री.संजय केळकर : अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना जन्मठेप व इतर शिक्षेची तरतूद कायद्यात प्रस्तावित केली आहे. जानेवारी, 2008 मध्ये शासनाने कायद्यात अशा प्रकारची तरतूद केली आहे. या तरतुदीबाबत केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे का?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, माननीय राष्ट्रपती महोदयांच्या अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव दिनांक 8.3.2010 रोजी सादर केला आहे. त्याबाबत पाठपुरावा करुन लवकर मान्यता मिळविण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आतापर्यंत जे खटले दाखल झाले त्या खटल्यातील आरोपी जामिनावर सुटू नयेत म्हणून तज्ज्ञ वकिलांची नियुक्ती केली आहे का? केली नसेल तर केव्हापर्यंत करणार आहात? कालमर्यादा सांगण्यात येईल काय? अन्यथा आरोपी जामिनावर सुटतात व पुन्हा गुन्हे करण्यास मोकळे होतात.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, कायद्यामध्ये बदल प्रस्तावित केलेला आहे. तज्ज्ञ वकिलांची नियुक्ती करण्याची माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. सन्माननीय सदस्यांच्या मतानुसार तज्ज्ञ वकिलांची नेमणूक करु.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, जे दूध ग्राहक आहेत त्यांच्या बैठका घेणे, लोकप्रतिनिधींच्या भावना समजून घेऊन उपाययोजना करणारी यंत्रणा राबविण्याची आवश्यकता आहे. केवळ काल्पनिक बोलून चालणार नाही. प्रत्यक्ष दूध खरेदी करणाऱ्या ग्राहकांना दूध भेसळीचे प्रकार कुठे चालतात याची माहिती असते. त्यांच्याकडून गाऱ्हाणी समजून घेऊन उपाययोजना करण्यासाठी दूध ग्राहकांचे मेळावे घेऊन समस्या जाणून घेण्यात येतील काय?

श्री.रमेश बागवे : याबाबत जरुर विचार करु.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अतिशय चांगली चर्चा याठिकाणी घडवून आणली आहे. सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला हा प्रश्न आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांकडे सुदैवाने गृह आणि अन्न व औषध प्रशासन ही दोन्ही खाती असल्यामुळे हा चांगला योग जुळून आला आहे. कारवाई करण्याच्या दृष्टीने समन्वय साधण्यास सोपे जाणार आहे. मुंबईसारख्या ठिकाणी यापूर्वी अनेकदा धाडी टाकण्यात आल्या. अनेक आरोपींवर गुन्हे दाखल केले गेले. मंत्रीमहोदयांनी आज जे उत्तर दिले ते समाधानकारक आहे. यापुढे अशा प्रकरणामध्ये नोकरांऐवजी मालकांवर गुन्हा दाखल केला जाणार आहे. मुंबई शहरातील पूर्वीचा ट्रॅक रेकॉर्ड पाहिला तर तेच तेच लोक असा व्यवसाय करीत आहेत. नोकरांची बदली करुन नव्या नोकरांमार्फत त्यांचे व्यवसाय राजरोस सुरु असतात. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी स्वत: धाडी घातल्या होत्या. मुंबईमध्ये यापूर्वी दाखल झालेले खटले लक्षात घेऊन मालकांवर सुध्दा खटला दाखल करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा रास्त आहे. प्रत्यक्षात मी देखील प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. अशा प्रकारच्या गुन्हयामध्ये मालकांऐवजी नोकरांवर गुन्हे दाखल केले जातात. मालकांचे परवाने रद्द केले तरी ते दुसऱ्या नावाने परवाने घेतात. म्हणून या संदर्भात बारकाईने अभ्यास करुनच कायद्यात तरतूद केलेली आहे. यापुढील काळात मालकांवर गुन्हे दाखल केले जातील.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेणे

**मु. शी.** : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई ही शासन मान्य नोंदणीकृत, स्वायत्त संस्था असणे, दिनांक १८ जानेवारी, २००२ च्या शासन निणर्याद्वारे राज्यात सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी शिक्षण परिषदेकडे देण्यात येणे, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमास सन २०१० पर्यंत मंजुरी असणे, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमासाठी १२,३६० पदे मंजूर असणे,त्यापैकी ४०७८ पदे प्रतिनियुक्तीने व ४८३९ पदे कंत्राटी पध्दतीने भरलेली असणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांचा कालावधी १ ते १४ वर्षे असणे, त्यासर्वांनी वयोमर्यादा ओलांडल्याने शासकीय सेवेत त्यांना नियुक्ती मिळण्याची शक्यता नसणे, सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन/जिल्हा परिषदेच्या सेवेत सामावून घेण्याची शिक्षण परिषदेने शिफारस करणे, तथापि, कोणत्याही प्रकारची कार्यवाही न होणे याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष व याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात ही अर्धातास चर्चा उपस्थित केली आहे. या कर्मचाऱ्यांबाबत अनेकदा विधीमंडळामध्ये चर्चा झालेली आहे. याच विषयावर विधानसभेत देखील चर्चा झालेली आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

हिवाळी अधिवेशनात दि. 19 डिसेंबर, 2009 रोजी याच कर्मचाऱ्यांनी प्रचंड मोर्चा विधान मंडळावर आणला होता. त्या मोर्चाचे नेतृत्व आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केले होते. शासनाकडे त्यांनी या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या व्यथाही मांडल्या आणि त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने काय धोरण स्वीकारायला हवे याचा विचार त्यावेळेस झाला होता पण दुर्दैवाने अद्याप कुठलाही न्याय या कर्मचाऱ्यांना मिळाला नाही. आताही एकदोन वेळेला या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांच्या संघटनेने वारंवार शासनाकडे पत्रव्यवहार करुन आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. एक दोन वेळा त्याबाबत मंत्री महोदयांनी बैठक सुध्दा आयोजित केली होती पण ती बैठक होऊ शकली नाही हे दुर्दैव आहे. म्हणून वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या कर्मचाऱ्यांचे जे प्रश्न आहेत त्याच अनुषंगाने अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मी ही चर्चा उपस्थित करीत आहे. या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदय आणि शासनाला सुध्दा माझी विनंती राहणार आहे की, गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला हा कंत्राटी कर्मचाऱ्यांचा विषय तातडीने सोडवावा अशीही माझी विनंती आहे.

महोदय, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ही एक रजिस्टर्ड व स्वायत्त संस्था आहे. ती शासकीय संस्था जरी नसली तरी शासनाच्या अधिपत्याखाली, शासनाचेच काम करणारी एक ॲटॉनॉमस बॉडी आहे. सर्व शिक्षा अभियान योजना ही सुरुवातीला प्राथमिक शिक्षण कार्यक्रम आपल्या राज्यात होता त्याची अमलबजावणी याच संस्थेकडे होती. तो कार्यक्रम सुध्दा केंद्र शासनाचाच होता. तो संपल्यानंतर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम राज्यात सुरु झाला आणि त्या कार्यक्रमामध्ये प्रतिनियुक्तीवर आणि कंत्राटी पध्दतीने जे लोक काम करीत आहेत त्यात दोन प्रकारचे लोक आहेत. कुशल आणि अकुशल स्वरुपाचे लोक वेगवेगळ्या पदांवर काम करीत आहेत. त्यांचे काम तांत्रिक व अतांत्रिक स्वरुपाचे असून त्यांची एकूण संख्या 12360 एवढी असून कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या 4836 एवढी आहे. ही सर्व मंडळी गेल्या बारा ते चौदा वर्षांपासून या संस्थेचे काम करीत आहेत. त्यांना दर सहा महिन्यांनी नियुक्ती पत्र जे दिले जाते ते एक दिवसाची सेवा खंडित करुन दिले जाते. अशा प्रकारे वर्षानुवर्षे हे शासनाचे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

काम ते लोक करीत आहेत. या सर्व शिक्षा अभियान योजनेत काही भाग केंद्रशासन तर काही भाग राज्य शासनाचा आहे. या दोन्हीच्या संयुक्त प्रयत्नांनी ही योजना राज्यात राबविली जाते. ही योजना यशस्वीपणे राबविण्याचे काम हे तांत्रिक व अतांत्रिक कंत्राटी कर्मचारीच करीत असतात. त्यांची संख्या 4800 पेक्षा अधिक आहे. मला माहीत आहे की, ज्यावेळी मी असे म्हणतो की, वर्षानुवर्षे हे कर्मचारी या ॲटॉनॉमस बॉडीमध्ये नियुक्ती देऊन त्यांच्याकडून काम करुन घेतले जाते. परंतु सर्व शिक्षा अभियान योजनेमध्ये, शिक्षण क्षेत्रात अत्यंत चांगल्या प्रकारचे काम करुनही त्यांना सेवेत सामावून घेण्याच्या संदर्भात शासनाचे दुर्लक्ष असणे आणि त्यांना वाऱ्यावर सोडणे हे योग्य ठरणार नाही. आता सर्व शिक्षा अभियान योजना पुढील काळात बंद होणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

आता ही योजना बंद झाल्यानंतर या कर्मचा-यांचे काय होणार ? 4,800 पेक्षा अधिक असलेल्या कर्मचा-यांची 14-14 वर्षे सेवा झाल्यानंतर शासनाने त्यांना त्यांना काढून न टाकता शासकीय सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता आहे. या कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची मी मागणी करेल तेव्हा माननीय मंत्रीमहोदया असे म्हणतील की, आम्हाला सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत, सामान्य प्रशासन विभागाने बॅकडोअर एंट्रीच्या संदर्भात जीआर काढलेला आहे त्यामुळे शासनाला या कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेता येणार नाही. सभापती महोदय, हे सर्व कर्मचारी बॅकडोअर एंट्रीचे नाहीत. जाहिरातीच्या माध्यमातून, निवड प्रक्रियेच्या माध्यमातून व योग्य त्या पध्दतीने या कर्मचा-यांची नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे हे कर्मचारी बॅकडोअर एंट्रीचे आहेत असे आपल्याला म्हणता येणार नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायायालयाचा निकाल या कर्मचा-यांसाठी आपल्याला लावता येणार नाही. वर्षानुवर्षे या कर्मचा-यांनी शासनाची सेवा केलेली असल्यामुळे या कर्मचा-यांना अशा प्रकारे शासनाला काढता येणार नाही. त्यामुळे या सर्व कर्मचा-यांना शासनाने सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे जिल्हापरिषद, शासकीय सेवेत अनेक रिक्त पदे आहेत व या पदांवर सर्व कर्मचारी सामावून घेतले तर शासनाच्या तिजोरीवर कोणताही बोजा येणार नाही, आर्थिक बोजा येणार नाही. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेच्या प्रकल्प संचालकांच्या बरोबर या कर्मचा-यांनी काम केलेले आहे. त्यामुळे या कर्मचा-यांची गरज आणि त्यांचा अनुभव विचारात घेता शिक्षण क्षेत्राला आणि महाराष्ट्र शिक्षण परिषदेला त्यांच्या अनुभवाचा फायदा झालेला आहे. सर्व ठिकाणचे प्रकल्प संचालकांनी सुध्दा सहानुभुतीच्या भावनेतून सर्व कर्मचा-याची दखल घेऊन या कर्मचा-यांना शासकीय सेवेत घेण्याची विनंती शासनाला केलेली आहे. मार्च, 2001 रोजी प्रकल्प संचालकांनी शासनाला अशा प्रकारे विनंती केलेली आहे. प्रकल्प संचालकांनी शासनाला जी विनंती केलेली आहे त्या विनंतीमध्ये त्यांनी म्हटले आहे की, " या कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवेत सातत्य नसल्याने त्यांच्या मनात नेहमी अस्थिरतेची भावना असते, असे असले तरी जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमात व सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मोठया प्रमाणात त्यांनी योगदान दिलेले आहे. त्यांची सेवा उल्लेखनीय आहे. विविध स्तरा्ंवर त्याना

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

प्रशिक्षण मिळालेले असून त्यांना कामाचा चांगला अनुभव प्राप्त झालेला आहे. जिल्हा परिषदेच्या कामाचा सुध्दा त्यांना अनुभव प्राप्त झालेला आहे त्यामुळे या कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेतल्यास शासनाला चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकेल. लातूर येथील भूकंप झाल्यानंतर भूकंप पुनर्वसनाअंतर्गत जे कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते, ती योजना संपल्यानंतर त्यांना शासकीय सेवेत ज्या पध्दतीने सामावून घेण्यात आले होते त्याच पध्दतीने या कंत्राटी कर्मचा-यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घ्यावे" अशा प्रकारची शिफारस राज्याचे प्रकल्प संचालकांनी शासनाला केलेली आहे. ही योजना उद्या बंद झाली आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परेषदेतून कंत्राटी कामगार बाहेर पडले तर त्यांच्या भवितव्याचे काय होणार ? कामगाराचे शोषण झालें तर आपण त्यासंदर्भात आवाज उठवत असतो. ॲटॉनॉमस बॉडीवर काम करणा-या कर्मचा-यांना न्याय द्यावयाचा असेल तर त्यांचे प्रथम शोषण थांबवले पाहिजे. या कर्मचा-यांचे आज सुध्दा शोषण होत आहे. भविष्य निवार्ह निधी व पेन्शन नसल्यामुळे या कर्मचा-यांना रस्त्यावर आपले जीवन जगावे लागेल. खाजगी कर्मचा-यांचे जसे शोषण होते तसेच शोषण या कर्मचा-यांचे झाल्याशिवाय राहणार नाही. ही सर्व मंडळी शिकलेली आहे. तांत्रिक क्षेत्रातील अभियंते हे अत्यंत क्वॉलिफाईड आहेत. आमचे विषय तज्ञ बीए.बीएड, एमए.बीएड. आहेत त्यांना अनेक वर्षाचा अनुभव आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

कदाचित आपल्याला असे वाटेल की, ही योजना बंद झाली. त्यांनी आता दुसरी नोकरी शोधावी. या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा उलटून गेली आहे. त्यांच्या इथल्या सेवेलाच 12 ते 14 वर्षे झाली आहेत. त्यांच्या वयाचा विचार केला तर त्यांना अन्य कुठल्याही क्षेत्रामध्ये आता नोकरी मिळू शकणार नाही. त्यांना आता एकच पर्याय आहे तो म्हणजे सर्व शिक्षा अभियान संपल्यानंतर त्यांना रोजगार हमी योजनेच्या कामावर जावे लागेल. याच्याशिवाय दुसरा पर्याय त्यांच्या समोर नाही. या कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा विचार करता, पात्रतेचा विचार करता, शासनासाठी वर्षानुवर्षे केलेल्या सेवेचा विचार करता, त्यांच्या अनुभव संपन्नतेचा विचार करता त्यांना शासकीय सेवेत सामावून घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. प्रकल्प संचालक सांगतात की, या कर्मचाऱ्यांच्या अनुभवाचा आणि सक्षमतेचा जिल्हा परिषदेने आणि शासनाच्या शिक्षण विभागाने आज उपयोग करून घेणे आवश्यक आहे. या कर्मचाऱ्यांचे स्टेटस कंत्राटी आहे. एवढाच काय तो त्यांचा दोष आहे. म्हणून या सर्वांच्या सेवा ग्रामविकास किंवा शालेय शिक्षण विभागाच्या रिक्त असलेल्या पदांवर घ्याव्यात. आम्ही या कर्मचाऱ्यांसाठी नवीन पदे निर्माण करा असे सांगत नाही. ग्रामविकास आणि शालेय शिक्षण विभागामध्ये जी जी पदे रिक्त झाली आहेत, त्या त्या पदांवर या कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने सामावून घेण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून मी सन्माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करणार आहे की, ग्रामविकास विभाग आणि शालेय शिक्षण विभाग यांनी एकत्रित बसून चर्चा करून आमच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. मी पुन्हा एकदा उच्चार करतो की, ज्यांनी सर्व शिक्षा अभियानामध्ये, त्यापूर्वी जिल्हा प्राथमिक शिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये अत्यंत मोलाचे काम केले आहे, त्याकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. त्यांच्याकडे आपल्याला कानाडोळा करता येणार नाही. हे सर्व कर्मचारी बॅक-डोअर एन्ट्रीने येत नाहीत. ते सर्व प्रोसिजर फॉलो करून आलेले आहेत. म्हणून त्यांना ग्रामविकास विभागामध्ये किंवा शालेय शिक्षण विभागामध्ये सामावून घेण्यासंबंधी शासनाने योग्य ती उपाययोजना करावी अशी विनंती करतो. या कर्मचाऱ्यांनी प्राथमिक शिक्षण परिषदेमध्ये काम केले आहे. सर्व शिक्षण अभियानाचे काम केले आहे म्हणजे शासनाचे काम केले आहे. त्यांनी केलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सेवेची दखल घेऊन शासनाने त्यांना शासकीय सेवेत घ्यावे अशी विनंती करीत आहे. नियमात बसत नसेल तर एकूण सेवेचा विचार करून सहानुभूतीच्या माध्यमातून या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून विचार व्हावा अशी प्रकारची नम्र विनंती मी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून शालेय शिक्षण विभागाला, ग्रामविकास विभागाला आणि शासनाला करीत आहे. धन्यवाद.

.............

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय श्री.रामनाथ मोते सरांनी एका गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व शिक्षा अभियान आणि त्या अंतर्गत केलेल्या नेमणुका आणि सर्व शिक्षा अभियान आज बंद झाल्यानंतर त्यात असलेल्या कर्मचाऱ्यांचे गांभीर्य आपल्या लक्षात आणून दिलेले आहे. त्यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्याला मी माझे समर्थन देत आहे. ते माझे कर्तव्य समजतो. त्यांनी केलेली मागणी अगदी बरोबर आहे. पण मी त्याही पुढे जाऊन बोलणार आहे. आमच्या राज्य शासनाने थोडेसे अंतर्मुख होणे आवश्यक आहे. सर्व शिक्षा अभियान योजना केंद्र शासनाने आपल्याला पैशासह दिली म्हणून आपण गेली 10-15 वर्षे ती योजना आपण राबविली. आता केंद्र सरकार सदर योजना राज्य सरकारला दत्तक देत आहे. केंद्र सरकारचे म्हणणे आहे की, आता आपण ही योजना राबवावी. यासाठी लागणारा रेव्हेन्यू सरकारला दिलाही जातो. तो तसाच दिला जातो अशातला भाग नाही. इन्कम सोर्सेससंबंधीच्या तरतूदी मूळ योजनेमध्ये आहेत. आता राज्य सरकार सर्व शिक्षा अभियान योजनेला वाऱ्यावर सोडायला निघाले आहे. महाराष्ट्रातील प्राथमिक शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी केंद्र शासनाने निधीसह योजना दिली. आता ही योजना राबविण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. पण ही योजना राबविण्यासाठी राज्य पूर्णपणे उदासीन आहे. ही योजना आम्ही अशीच पुढे चालवू. सदर योजना राबवत असताना त्यातील दोष आम्ही काढून,

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे...

ती पुन्हा चांगल्या पध्दतीने चालवू अशाप्रकारचा कोणताही संकेत राज्य शासनाने दिलेला नाही त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधीत आहे.

दुसरा मुद्दा अतिशय गंभीर आहे. केंद्र सरकारकडून जेवढ्या योजना येतात त्या निधी मिळेपर्यंत चांगल्या पध्दतीने राबविल्या जातात. उदाहरण सांगावयाचे झाले तर निरंतन शिक्षण योजना. ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात राबविली जाते. केंद्र सरकारकडून योजनेचा पैसा आला की ती योजना अतिशय धामधुमीने राबविली जाते. केंद्र सरकारकडून काही कारणाकरिता कधी निधी येण्यास वेळ पाच-सहा महिन्यांचा विलंब झाला तर ती योजना तशीच वा-यावर सोडून देण्यात येते. केंद्र शासनाकडून पुन्हा निधी प्राप्त झाला की परत ती योजना राबवावयाची असे प्रकार सुरु आहेत. खरे म्हणजे केंद्र शासनाकडून निधी येण्यास वेळ लागला तर राज्य शासनाने स्वत:कडील निधी खर्च करुन ती योजना राबविली पाहिजे. परंतु अशाप्रकारची इच्छा शक्ती राज्य शासनाकडून दाखविली जात नाही. राज्य शासनाच्या या उदासीन धोरणामुळे निरंतन शिक्षण योजनेची वाट लागली आहे असे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे.

सभापती महोदय, निरंतर शिक्षण योजनेप्रमाणे एम.सी.व्ही.सी.योजनेच्या बाबतीत झाले आहे. केंद्र सरकारकडून या योजनेस निधी मिळत होता तोपर्यंत एम.सी.व्ही.सी.ची योजना 1995 ते 2000 सालापर्यंत चांगल्याप्रकारे राबविण्यात आली. सन 2000 पासून राज्य शासनाच्या तिजोरीवर बोजा आला म्हणून शिक्षकांना  नियममित पगार नाही, मेटेनन्स ग्रांट नाही, विद्यार्थ्यांना ॲप्रेन्टीसशीपखाली सामावून घेण्याची योजना नाही, विद्यार्थ्यांना डी.एड.ला जाण्याची सुविधा नाही. तेव्हा याकडे लक्ष देण्यात यावे.

सभापती महोदय, गेल्या तीन-चार दिवसांपासून 300 ते 400 शिक्षक आझाद मैदानावर उपोषणास बसले आहेत. महाराष्ट्रातील प्राथमिक शाळांतील एकात्म अपंग शिक्षण योजने अंतर्गत काम करणारे हे शिक्षक आहेत. केंद्र सरकारचा निधी मिळत होता तोपर्यत राज्य सरकारने ती योजना राबविली. एप्रिल 2008 पासून केंद्र सरकारकडून निधी येणे बंद झाले तेव्हा पासून  गेली दीड वर्षे एक पैसा त्यांना मिळालेला नाही. त्या शिक्षकांचे वय 40 ते 45 आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अपंगाना शिक्षण देणारे ते शिक्षक आहेत. एका अर्थाने भगिरथ काम करणारे ते शिक्षक आहेत.  परंतु त्यांची देखील शासनाने दखल घेतलेली नाही. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे...

अशीच बाब अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी काढण्यात आलेल्या केंद्रीय आश्रमशाळांच्या बाबतीत आहे. महाराष्ट्रात साक्षरतेने प्रमाण जास्त आहे म्हणून केंद्र सरकारने निधी देणे बंद केल्यावर राज्य शासनाने 288 केंद्रीय आश्रमशाळा वाऱ्यावर सोडून दिलेल्या आहेत. या आश्रमशाळांतील शिक्षक गेली दहा वर्षे विनावेतन राबत आहेत. केंद्र सरकारच्या ज्या योजना आहेत त्या निधी मिळेपर्यंत चांगल्याप्रकारे राबविण्यात येतात. परंतु केंद्र सरकारकडून निधी मिळणे बंद झाल्यावर राज्य शासन त्या योजना वाऱ्यावर सोडून देते, ही पध्दत बरोबर नाही. राज्य शासनाचे शिक्षणाच्या बाबतीत असलेल्या उदासीन धोरणामुळे अनेक दुष्परिणाम होत आहेत. याचा सर्व शिक्षा अभियानावर प्रचंड परिणाम होत आहे. आता राज्य सरकारने माध्यमिक सर्वशिक्षा अभियान राबविण्याचे ठरविले आहे. ही केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळणार असल्यामुळे ही योजना राबविण्यास राज्य शासनाची तयारी आहे. परंतु शासन प्राथमिक सर्वशिक्षा योजना मात्र वाऱ्यावर सोडण्यासाठी निघाले आहे. आपल्याकडे केंद्र शासनाच्या ज्या योजना राबविण्यात येत आहेत त्याचा निधी प्राप्त झाला नाही तर पर्यायी निधी उभा करुन ती योजना राबविण्याची जबाबदारी शासनाची आहे, ही जबाबदारी सरकारने टाळू नये अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते यांनी सर्व शिक्षा अभियानाखाली काम करणाऱ्या शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या संदर्भातील प्रश्न येथे मांडले आहेत. सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रश्न अतिशय कळकळीने मांडलेले आहेत. त्यांची ही कळकळ अशा लोकांसाठी आहे ज्यांनी शिक्षणाची सेवा केलेली आहे, देश घडविण्याचे काम केलेले आहे. त्यांच्या बाबत शिक्षण क्षेत्रातील लोकांच्या भावना अशाप्रकारच्या राहणे साहजिकच आहे आणि तशी भावना असलीही पाहिजे. इंग्रजीत असे म्हटले जाते की, " There is nothing more noble. There is no exercise better for the heart than reaching down and lifting up the people." सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची जशी भावना आहे तशीच भावना राज्य सरकारची सुध्दा आहे. आम्हाला सुध्दा वाटते की, ज्या लोकांनी प्रदीर्घ सेवा केलेली आहे त्या लोकांच्या अनुभवाचा फायदा शासनाला होऊ शकतो.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान..

या सर्व बाबी विचारात घेतल्या तरी सुध्दा शासनाला कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करावे लागते. कायद्याच्या बाहेर शासनाला जाता येत नाही. त्यामुळे यासंदर्भात कितीही विचार केला तरी आशा आणि आकांक्षातून विचार करु शकत नाही आपले माईंड वापरुनच विचार करणे गरजेचे असते. त्यामुळे 12 हजार कर्मचा-यांपैकी 4 हजार 836 कर्मचारी डेप्युटेशनवर आहेत आणि बाकीचे कर्मचारी कंत्राटी पध्दतीने आहेत. या सर्व कर्मचा-याच्या संदर्भात आमच्या विभागाने सहानुभूतिपूर्वक विचार करुन ग्राम विकास विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता परंतु त्याबाबतीत ग्राम विकास विभागाने नकारात्मक उत्तर दिले होते. यामध्ये सुप्रीम कोर्टाचा निर्णय आड आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी असेही सागितले की, सुप्रीम कोर्टाने जरी निर्णय दिलेला असला तरी ओपन कॉम्पीटीशनमधूनच हया सर्व कर्मचा-यांची निवड झालेली आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या गाईड लाईन्स जर आपण पाहिल्या तर त्या गाईड लाईन्समध्ये सुरुवातीलाच स्पष्ट केले होते की, जे डी.पी.ए.पी.चे कर्मचारी होते व ज्यांनी 1996 पासून काम केले होते त्या सर्व कर्मचा-यांना प्रथम सामावून घेण्यात यावे त्यानंतर जर काही पदे रिक्त राहिली तर मग इतरांना घ्यावे किंवा नवीन पदे निर्माण करावीत.अशा प्रकारे सर्व शिक्षा अभियानाच्या गाईड लाईन्समध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. त्याशिवाय हे सुध्दा स्पष्ट करण्यात आले होते की, हा प्रकल्प तात्पुरत्या स्वरुपाचा होता त्यामुळे या ठिकाणी काम करणारे कर्मचारीसुध्दा तात्पुरतेच होते.त्यांनी सुरुवातीलाच शासनावर असे बंधन घातले होते की,तुम्ही या कर्मचा-यांना कधीच कायम करु शकत नाही. सन्माननीय सदस्यांना जर माहिती हवी असेल तर त्या गाईड लाईन्समधील संबंधित क्लॉज मी या ठिकाणी वाचून दाखवू शकते. त्या ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना फक्त तात्पुरत्या स्वरुपातच किंवा डेप्युटेशनवरच घेऊ शकतो असे स्पष्टपणे त्या गाईडलाईन्समध्ये म्हटले होते. त्यामुळे ही सर्व पदे तात्पुरत्या स्वरुपाची आहेत. त्यांना कायम करण्यात येऊ नये असे म्हटलेले असल्यामुळे या कर्मचा-याना कायम करणे शक्य होणार नाही असे मला वाटते. तरी सुध्दा शालेय शिक्षण विभागाला असे वाटते की, आमच्या विभागाकडून या कर्मचा-यांना कायम केले जात नाही म्हणून ग्राम विकास विभागाला आम्ही लिहिले की, तुमच्या विभागाकडून जर या कर्मचा-यांना

2.

प्रा.फौजिया खान.....

कायम केले जात असेल तर आपण त्यांना कायम करावे परंतु ही बाब कायद्याच्या चौकटीत बसत नसल्यामुळे ग्राम विकास विभागानेसुध्दा नकारात्मक निर्णय घेतलेला आहे . या कर्मचा-यांना कायम करता येत नाही असे कळविलेले आहे.त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेली विनंती शासनाकडून मान्य होण्यासारखी नाही असे नाईलाजाने मला सांगावे लागत आहे. कायद्याच्या चौकटीत राहूनच शासनाला काम करावे लागत असल्यामुळे अशा प्रकारची भूमिका या ठिकाणी मांडत असतांना मला वाईट वाटते एवढेच मी या निमित्ताने सांगते. धन्यवाद

----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

3..

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,केवळ एक दोन कर्मचा-यांचा हा प्रश्न नसून हजारो कर्मचा-यांचा हा प्रश्न आहे. राज्यातील अत्यंत महत्वाच्या क्षेत्रामध्ये ज्या लोकांनी आपले अर्धे आयुष्य खर्ची घातले आहे. त्यांमुळे त्यांना दुसरीकडे कोठेही नोक-या मिळणार नाहीत.अशा
कर्मचा-यांना शासन वा-यावर सोडणार आहे काय ? माननीय मंत्री महोदय या ठिकाणी आम्ही केलेल्या विनंतीचा मान ठेवण्यास तयार नसेल किंवा याबाबतीत त्यांची नकारात्मक भूमिका असली तरीसुध्दा याबाबातीत पुन्हा फेर विचार होण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. ग्राम विकास विभागाचे माननीय मंत्री , शालेय शिक्षण विभागाचे माननीय मंत्री आणि अधिका-यांची एकत्र बैठक घेतली व त्या बैठकीसाठी जर आम्हाला बोलावले तर त्या चर्चेतून काही तरी चांगला मार्ग निघू शकेल .असे मला वाटते त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी अशी बैठक बोलवावी असे मला त्यांना सांगावयाचे आहे. सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाचा निर्णय यामध्ये आड येत आहे असे उत्तर माननीय मंत्री महोदय देतील हे मी सुरुवातीलाच सागितले होते आणि त्यांनी देखील हेच उत्तर सागितले आहे.कंत्राटी कर्मचा-यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून आपल्या दालनात बैठक बोलवावी आणि त्या ठिकाणी झालेल्या चर्चेतून कदाचित वेगळा मार्ग निघू शकेल असे मला वाटते. ग्राम विकास विभाग किंवा वित्त विभागाचे मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत.

नंतर श्री.सरफरे sss

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

या सर्वांबरोबर आपण एकत्रित बैठक घ्यावी. या बैठकीमध्ये वित्त विभागाची महत्वाची भूमिका असल्यामुळे या विभागाबरोबर ग्राम विकास विभाग व शालेय शिक्षण विभागाची संयुक्त बैठक आपल्या दालनामध्ये घेण्यात यावी अशी माझी नम्र विनंती आहे. त्या चर्चेमधून काहीतरी मार्ग निघू शकेल. माझ्या विनंतीचा आपण विचार करावा अशी विनंती करतो.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक घेण्याबाबत विनंती केली आहे. त्याचबरोबर माझ्या विभागामध्ये या संदर्भात बैठक घेण्याची माझी तयारी असून त्याठिकाणी विधी व न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यामधून काही तोडगा निघू शकतो काय? याकरिता माझ्या स्तरावर बैठक घेण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, संबंधित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून आपल्या दालनामध्ये बैठक घेण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.चंद्रकांत पाटील)** : या संदर्भात माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक घेण्यात येईल. अर्धा तास चर्चा संपलेल्या आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 15 जुलै, 2010 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 5 वाजून 41 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 15.7.2010 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही